
# सोनेरी तुरुंगात सहा आठवडे

म. ग्र. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. ८३७

डॉ. हे. द. कोपर्डेकर



RFFBK-0024004

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

16 NOV 1983
4 DEC 1983
1 DEC 1983
25 JAN 1984

( क्र. मा. प. )
१०००-१२-८२

# सोनेरी तुरुंगात सहा आठवडे

लेखक
डॉ. हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर

REFBK-0024004

मंदार प्रकाशन
• पनवेल - रायगड •

प्रकाशक :
श्री. प. र. हेंद्रे
मंदार प्रकाशन,
पनवेल ४१०२०६
जि रायगड

❋

प्रकाशन दिनाक
१५ ऑगस्ट १९८३

❋

© सौ. अनुराधा कोपर्डेकर
कल्पवेल बगला योजनानगर
मु तळेगाव-दाभाडे, जि पुणे

❋

मुखपृष्ठ
श्याम जोशी, मुंबई

❋

मुद्रक
श्री कृ. भि. राऊळ
सत्यसेवा मुद्रणालय
अलिबाग ४०२२०१
जि रायगड

❋

किंमत १८ रुपये

संदर्भ भूप्रवास
६३८
२८००४
१३/१०/८३

## लेखकाचे चार शब्द–

नवनवे प्रदेश, शहर आणि त्याचे भोवताल, पहावे अनेक ओळखी, अनोळखी माणसाना भेटावे आणि काहीतरी नवे अनुभवावे आणि आपल्याला भावलेले इतराना सागावे हा मानवी स्वभाव आहे थोड निरीक्षण, वाचन आणि चितन होत असेल तर अधिक चागल्या तऱ्हेने सागता, लिहीता येत पण ते दर्जेदार झाले आहे की नाही, आपल्या भावविश्वात त्यान भर घातली आहे की नाही हे वाचकच ठरविणार नाहीतरी एका लेखकान म्हटलच आहे की लिहावस वाटणाऱ्यान आपल लिहिण्याच काम कराव, पुढे काय करायच ते वाचक करतातच. असो.

या प्रवासासाठी जस अनेकाच साह्य झालं आहे तस पुस्तक प्रकाशित होण्यातही माझी पत्नी सौ अनुराधा, लेखकमित्र श्री जाईल आणि प्रकाशक श्री. हेंद्रे, चित्रकार श्री श्याम जोशी याच मोलाच साह्य आणि श्री राऊळ व त्याचे सहकारी याचे मुद्रणकार्य यामुळेच हे पुस्तक प्रकाशित होत आहे बरेच दिवस प्रकाशित होणार होणार म्हणून पडून राहिलेल हे लेखन आता पुस्तकाच्या रुपाने वाचकाच्या हातात ठेवताना त्यातला आनदच केवळ मजजवळ राहिला आहे.

**–हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर**

मे १९८३, रत्नागिरी

# : अंतरंग :


१) गमन आणि आगमन — ५

२) वॉशिंग्टनमधील मुक्कामाचा प्रारंभ आणि फेरफटका. — १३

३) रेस्टन नव्या नगराला भेट — २३

४) नयनरम्य नायगारा — २८

५) काही अमेरिकन भारतीय माणसे आणि एक अमेरिकन शहर — ३९

६) स्मारके आणि संग्रहालयांचे शहर वॉशिंग्टन. — ४६

७) न्यूयॉर्ककडे झेप — ५४

८) न्यूयॉर्क म्हणजे एक सफरचंदी आकर्षण — ६७

९) मॅनहाटन बेटाची प्रदक्षिणा. — ७७

१०) द स्पिरिट ऑफ वॉशिंग्टन सिटी अँड अमेरिकन पीपल — ८४

११) लंडनची धावती वारी — ९३

१२) केनियाची सफारी — ९९

१३) नैरोबी आणि नकुरुचा फेरफटका आणि परतीच्या प्रवासाची तऱ्हा — १०८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३५
क्र. प्रवास २४००४
२३।१०।८३
ग्रं. शाखा (स्थळ प्रत)

प्रकरण : १

# गमन आणि आगमन

परदेशचा प्रवास ही काही आता नवलाईची वा अपूर्वाईची गोष्ट राहिलेली नाही बऱ्याच जणांचे जवळचे नातेवाईक वा मित्र परदेशात राहात असतात वा जाऊन आलेले असतात इंग्लड, अमेरिकेत लेकी दिलेलीही कितीतरी कुटुंबे असतात आणि कलकत्ता व दिल्लीहून आगगाडीने चोवीस तासात यावे तशी त्याची मुले, लेक वा जावई २४ तासात लडन वा न्यूयॉर्कहून येऊ शकतात वा आपल्या आईवडिलाना ४–८ दिवसाचा पगार खर्चून तिकिट पाठवून तिकडे नेऊ शकतात जाऊन आलेल्यानी प्रवासवर्णनेही पुष्कळ लिहिलेलीच आहेत मग आपण आपली लेखणी सरसावून पुढे यावे की नाही असा एक प्रश्न माझ्यापुढे उभा रहातो व 'लिहा कीं,' म्हणणाऱ्यांनाच मी तो विचारतो मग आमच्या चर्चेतून उत्तर निघते की, ज्याला पाहावेसे, अनुभवावेसे वाटत असते त्याला सागावेसेही वाटत असते व तसे असले तर वाचणाऱ्यालाही त्यात काहीतरी नवे गवसण्याची शक्यता असते म्हणूनच हा लिहिण्याचा प्रपच करावयाचे ठरवले आहे.

तसा मला स्वतःलाही परदेश प्रवास नवा नव्हता, पण वेगळा प्रदेश पाहायला मिळणार, वेगळी माणसे भेटणार हे विशेषच होते. दुसऱ्याकडून ऐकले–वाचले असले तरी प्रत्यक्ष पाहाणे, अनुभवणे व शक्य तितक्या चागल्या स्वरूपात ते शब्दरूप करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे एकदा मिळालेले अनुभव पुन्हा संकलित स्वरूपात

अनुभवणे व त्याचा चागला–वाईट पुन:प्रत्यय घेणे आपल्यालाही लाभकारक ठरते काही जुन्या मित्राच्या गाठीभेटी आणि नव्याच्या ओळखी होणार म्हणून सधी येताच प्रवासाच्या तयारीला लागलो त्यातच पत्नीस बरोबर नेण्याची सधी असल्याने आपल्या मडळीचे तेथील कौटुबिक जीवन व समाजजीवन पाहायला मिळू शकेल, असाही विचार मनात आला व तेथे गेल्यावर एखादी अनौपचारिक पाहाणी करण्याचेही ठरवून टाकले

जागतिक बँकेच्या आर्थिक विकास सस्थेच्या विद्यमाने विकसनशील देशामधल्या अगदी निवडक अशा २३ देशातल्या २८ जणाच्या सचात आपले नाव अनेक चाळण्यामधून शेवटपर्यंत टिकले तेव्हा तो एक प्रकारचा बहुमान होता आणि इतर अनुभवी, तज्ञ व वेगळ्या पार्श्वभूमीतून आलेल्याबरोबर चर्चा, सहजीवन व एकत्रित काम करणे, अशी एक चागली सधीच चालून आलेली होती 'नगराच्या विकासाचे व्यवस्थापन' म्हणजे प्रशासन, राजकारण, नगरनियोजन, घरबाधणी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इ अनेक क्षेत्राशी जवळचा सबध असलेला एक अवघड खटाटोप आहे शहराच्या अभ्यासाने व विकासाचे आराखडे बनवण्याने फारसे काही साध्य होऊ शकत नाही त्यासाठी विकास कार्यक्रमाची अमलबजावणी करणे हा व्यवस्थापनातला महत्त्वाचा भाग असायला लागतो व तसे करण्यासाठी लागणाऱ्या प्रयत्नात अनेक व्याप–ताप सहावे–सभाळावे लागतात तरच १०० गोष्टी ठरवाल तर दहा घडवून आणू शकाल असे मी अलिकडे माडायला सुरवात केली होती व तसे काही काम करण्याचा प्रयत्नही करीत होतो अशा वेळी जागतिक बँकेतल्या तज्ञाबरोबर व विकसनशील देशामधल्या इतर प्रतिनिधीबरोबर आपल्या कल्पना, विचार याच्यावर वाद, चर्चा व देवाणघेवाण करायला मिळावी, हा एक चागला योगायोग म्हणता येईल

अभ्याससत्राचे असे परिसवादात्मक व खेळीमेळीचे स्वरूप हे एक आणखी आकर्षण होते कलकत्ता-दुर्गापूर येथे नागरी विकासा-

साठी बरेच काम करून काही प्रमाणात यशस्वी ठरलेले श्री. शिवरामकृष्णन आपले वास्तवातले काम सोडून आता थोडे शैक्षणिक, थोडे सल्लागाराच्या स्वरूपाचे असे काम जागतिक बँकेत करीत आहेत. तेव्हा त्याच्याकडून पुष्कळ जाणून घेता येईल हीही आणखी एक जमेची बाजू होती

वॉशिंग्टनला जागतिक बँकेच्या मुख्यालयाजवळ राहायला व परिसवादाना हजर राहायला मिळण्याने त्या बँकेचे स्वरूप, काम व अन्य जागतिक सस्थाचे कामही अनायासे समजणार होते

परदेश प्रवासाची तयारी म्हणजे पासपोर्ट, व्हिसा, फॉरेन एक्सचेंज, इजेक्शने, विमानाची तिकिटे मिळवणे व साभाळणे कस्टम व इतर अवघड गोष्टींची माहिती मिळवणे वगैरे सर्व गोष्टी कितीही वेळा व कितीही जणानी केलेल्या असल्या तरी अडचणी व त्यातून कोणाच्या मदतीने, मार्गदर्शनाने बाहेर पडणे या गोष्टी नेहमीसारख्याच घडत असतात माझे सर्व सुरळीत झाले बुवा, काही त्रास न होता ! असे सागणारा हरीचा लाल एखादाच ! तेव्हा तो सगळा प्रकार लिहून पुढच्या महत्त्वाच्या अनुभवापासून अधिक दूर ठेवण्यात अर्थ नाही असा एक सयुक्तिक व सोपा विचार मी केलेला आहे आणि तो सर्वांनाच आवडेल, असे वाटते

वॉशिंग्टनला सुमारे सहा आठवडे, लडनला १-२ दिवस व नैरोबीत १२-१३ दिवस असा कार्यक्रम साधारणपणे ठरलेला आहे, असे सुरवातीलाच कळलेले होते तो इतराना साग् लागल्याबरोबरच अमेरिकेतले कितीतरी पत्ते व फोन नबर जमा होऊ लागले होते (त्यातले बरेचसे नतर कुचकामी ठरले) ‘ अमेरिकेत आमचा अमका-तमका आहे नुसते त्याला कळवा आणि मग पुढे तुमची सगळी सोय होईल,’ असे सागणाऱ्यापैकी कित्येकाना त्याचा अमका-तमका इतक्या हजार वा शेकडो मैलावर असतो वा त्याला बिल्कूल वेळ नसतो, असे सागावे लागेल हा शोध मलाही वॉशिंग्टनलाच पोहोचल्यावरच लागला

मी आलो आहे असे कळल्यावरच सर्व कामे व आठवड्याची खरेदी व साफसफाईची कामे बाजूस सारून धावत दुसऱ्याच दिवशी बायको व मुलासह येऊन भेटणारा माझा मित्र सतीश भिडे हाही २० मलावर होता फोन मिळताच येऊन व पुढच्या राहाण्या वागण्याबद्दलच्या सूचना, माहिती देऊन त्याने आमचा मुक्काम पुष्कळच सुखाचा करून दिला कोणाला भेटायचे तर उठलो आणि चाललो लोकलने वा बसने, हे येथे शक्य नाही एकतर तुम्हाला ज्याच्याकडे जायचे त्यानीच तुम्हाला न्यावे आणि, परत आणून सोडावे वा त्या बाजूला जाणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अस्तित्वात असलीच तर अनेकाना त्रास देऊन तुम्हाला तिची माहिती, मार्ग, वेळा वगैरे गोष्टी समजून घ्यायला हव्यात व त्या बेताने तुमचा कार्यक्रम आखायला हवा वॉशिंग्टनची नवी कोरी व अत्याधुनिक भुयारी रेल्वे तर रविवारी बदच असते, ही गोष्ट रविवारीही आपल्या भरभरून वाहणाऱ्या लोकल्स पाहिलेल्यांना खरीच वाटणार नाही ! असो

पण इतक्या पुढच्या प्रवासापूर्वीचा, आमच्या प्रवासातला पहिला टप्पाही थोडा सुरस–चमत्कारिक गोष्टीत जमा होण्या-सारखा आहे तो थोडासा सागून मगच वॉशिंग्टनमधल्या प्रवासाला सुरुवात केलेली बरी

सर्व पूर्वतयारी, गाजावाजा, निरोपानिरोपी होऊन एकवीस एप्रिलला आम्ही विमानतळावर कपनीच्या स्वाधीन झालो तर पहिला धक्का मिळाला 'तुमचे नाव यादीत आहे पण सौ चे नाही' मग धावपळ वगैरे होऊन ' वेगवेगळ्या विमानानी कसे जाणार, तसेच 'ओ के' तुम्हीच दोन्ही तिकिटावर कसे लिहिलेत' वगैरे वाद होऊन एकदाचे विमानात बसलो तास दोन तास त्या ७४७ बोईंगची नवलाई व लाईट सपर अनुभवत आहोत तोच सागण्यात आले इजिनात बिघाड आहे आणि मुबईला परतत आहोत सकाळी ६॥–७ वाजता आम्हाला पोचवायला आलेली मडळी घरोघरी जाऊन विश्राती घेत असतील तर आम्ही आपले मुबई-

तच पुन्हा कस्टमवाल्यानी स्वीकारण्याची वाट पहात होतो ३ तास वाट पाहिल्यावर मग बाहेर काढून टॅक्सीत घालून मुबईतल्याच आलिशान हॉटेलामध्ये मुक्कामाला पाठवून दिले विमानवाल्यानी रात्री दहा वाजेपर्यंत मध्ये जेवण मिळाले की नाही, चहा-पाण्याची सोय आहे नाही म्हणून कोणी विचारायला फिरकले पण नाही आणि जवळपास जाण्यासारखे नसल्याने बाहेर पडताही येईना त्यात जागरण व बिघडलेल्या विमानाने निर्माण केलेला ताण होताच अखेर चोवीस तासानी पुन्हा निघालो तसेच नवे विमान आणवले गेले होते, त्यात आपल्या जागा पुन्हा मिळवल्या (आमचे एक मित्र याच्या तीन जागा एकत्र असून वेगवेगळ्या ठिकाणी बसावे लागले होते तेव्हा चपळाई करून त्या आता मिळवायच्याच असा चग बाधून सारेजण विमानाकडे आलेलो होतो त्या मिळवल्यावरच निश्वास टाकला )

पुन्हा पुढच्या विमानोड्डाणाची काळजी करीत करीतच समोरच्या सिनेमाची चित्रे पाहात पाहात आम्ही डुलक्या काढीत होतो येथे आजी आजोबाकडे राहिलेल्या मित्राच्या छोटचा मुलीला प्रथमच अमेरिकेत घरी नेत होते पण माऊ दाखवतो म्हटल्यावर ती जी मला बिलगली ती आईवडिलाकडेही जायला तयार नव्हती आईवडिलाना निदान पहिला दिवस व प्रवास ठीक पार पडतो आहे, आजी आजोबासाठी हट्ट करीत नाही, हा आनद मिळाला त्यातच आपल्या मुलाचा आपण झोपेतच निरोप घेतलेला आहे, ती मावशी, काका, मामी याच्याकडे नीट राहतील की नाही, ही काळजी आम्ही तात्पुरती विसरलो

सकाळी लडनला पोचल्यावर सामान मिळवून पुढच्या विमानाची तरतूद करून घेण्यातच सगळा वेळ गेला व वॉशिंग्टनचे विमान सुटण्याची वेळ जवळ आली तेवढचा वेळात लडनच्या हीथ्रो या प्रचड विमानतळाचे दर्शन घडले सगळेच विराट आहे विमान अगदी इमारतीला चिकटून उभे रहात

असले तरी एका वेळी असख्य विवाने लागण्यासाठी इमारतच एवढा प्रचड करावी लागली आहे की, निरनिराळ्या पॅसेजेस गटस, कॉरिडॉर्स, सरकते पट्टे इत्यादींच्या चक्रव्युहातून पाट्यावरील मार्गदर्शनाप्रमाणे इच्छित स्थळी पोचणे म्हणजे एक दिव्यच वाटते

मुबई ते लडन या प्रवासात, ते विमान सिडनेहून आलेले असल्याने बरीचशी ऑस्ट्रेलियन व युरोपीयन कुटुबे होती पुष्कळसे वयस्क व वृद्ध मायदेशाला भेटायला चाललेले असावेत वा मुलानातवाना भेटून आलेले असावेत पण बहुतेक सगळी वयस्क जोडपी होती. त्याच्या अगदी विरुद्ध टोकाला म्हणजे लडन-वॉशिग्टन या प्रवासात, विमान अगदी लहान व तरुण मुलामुलींनी भरलेले होते बरीच शाळकरी व कॉलेजवाली मडळी होती पूर्वीच्या विमानातले अगदी गभीर व जो तो ज्याच्यापुरता असे वातावरण होते तर या दुपारच्या प्रवासात बरीच मुले, मुली हिडत होती ओळखीच्याशी थट्टा, विनोद, फोटो काढणे, खाद्य-पेयाचा समाचार घेणे असे त्याचे सतत चालू होते मध्ये एक सिनेमा दाखवला गेला तेवढा वेळ थोडे शात बसले होते पुन्हा अमेरिका खड जवळ आल्यावर त्याची गडबड सुरू झाली ब्रिटिश एअरवेजच्या मासिकातली इकडची जाहिरातही तरुणाना आवडणारी विमान कपनी ' म्हणून मुलामुलींच्या फोटोसहित अशीच होती. ऑस्ट्रेलिया ते लडन व लडन ते वॉशिग्टन अशी तेव्हा जाणवलेली वयस्क आणि तरुण अशी दोन जगामधली वाटणी मोठी गमतीदार वाटली युरोप–अमेरिकेत त्यामानाने पर्यटन, व्यापार, उद्योग, शिक्षण या निमित्ताने अधिक देवाणघेवाण होत असते व त्यात तरुणाचा, मुलामुलीचा गट बराच असावा, तसे युरोप आणि पूर्वेकडील देशात तितके नसावे, असे वाटले

वॉशिग्टनच्या डलस आतरराष्ट्रीय विमानतळाचा मनोरा दिसू लागल्यावर आवराआवर सुरू झाली नाही म्हटले तरी

अगोदरचा लांबलेला प्रवास व इतके तास विमानात बसून एक प्रकारची मरगळही आलेली होती. पण प्रवासाचा शेवट जवळ आला की नवीन प्रदेश पाहायचा तो कसा असेल, इच्छित स्थळी पोचायचे कसे वगैरे विचारानी एक प्रकारचा टवटवीत ताजेपणा आपोआपच येतो, त्याचा अनुभव घेत बाहेर पडायच्या तयारीला लागलो.

डलस विमानतळाची देखणी, सुबक व सुटसुटीत इमारत नजरेत भरते मोठी असली तरी सर्व बाजूनी मोकळी जागा, प्रचड वाहनतळ याच्यामुळे तिचा प्रचडपणा नजरेत भरत नाही आत शिरल्याबरोबर चालायला फारसे लागत नाही कारण, इमारत सुटसुटीत आहे व विमाने लाब उभी करून त्याना बस जोडून तीतून प्रवाशाना बाहेर काढल्यावर तीच बस इकडे येऊन इमारतीला खालच्या वा वरच्या पातळीला जोडली जाते. त्यामुळे बरेच चालणे व चढणे--उतरणे वाचते विमानतळावरून पासपोर्ट व आरोग्यप्रमाणपत्र तपासणी आणि कस्टममधून फारच झटपट बाहेर पडायला मिळाले चौकशी करीत बस जेथे उभी राहाते त्या थाब्याजवळ येऊन एका दगडी बैठकीवर टेकलो व तेव्हा आपण आता अमेरिकेत येऊन पोचल्याची जाणीव झाली अनेक गाड्या, टॅक्सीज, बसेस जात--येत होत्या, पण आपले त्यात कोणी नव्हते अमेरिकेतील आत्मकेंद्रित माणसे सबध आल्यास औप-चारिक ‘ हॅलो, ’ ‘ हाय, ’ ‘ थँक्स ’ ‘ यू आर वेलकम ’ म्हणणारी माणसे याच्याबद्दल थोडेफार ऐकले होते त्याचे दर्शन घडायला पहिल्यापासूनच सुरुवात झाली बरीचशी प्रतीक्षा झाल्यावर, रणगाड्याच्या चाकासारखे प्रचड चाके असलेले, पुढे एकच दार असलेले बसचे प्रचड, धूड एकदाचे आले आणि तीनतीनदा खात्री करून घेऊन सामान बाजूच्या पेटीवजा जागेत ठेवून आम्ही एक-दाचे स्थानापन्न झालो. जाताना अमेरिकेतल्या प्रचंड राजमार्गांचे थोडेफार जगलाचे व नतर वॉशिंग्टन शहराचे दर्शन घडत होते.

पण थकवा व विश्रांती आवश्यक असल्याची जाणीव अधिक मोठी होती, हे आता पाहायला मिळणारच आहे हीही भावना होतीच, कसेबसे कोचमधून उतरून, टॅक्सीतून आमच्या 'कर्कॉर्डिया अपार्टमेंटस' या इच्छित स्थळी पोचलो. तेथे दोन कप चहा करून पिण्याची सोय करून ठेवलेलीच होती. त्यामुळे थोडे बरे वाटले, बऱ्याचशा सूचना लेखी देऊन ठेवलेल्या होत्या, जवळच एक ग्रोसरी स्टोअर होते, तेथून जुजबी सामान आणून घेतले प्रथमच श्री राम या भारतीय गृहस्थाची भेट घेऊन त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे वॉशिंग्टनमधली पहिली सध्याकाळ व दुसऱ्या दिवशीची पहिली सध्याकाळ व दुसऱ्या दिवशीची पहिली सकाळ छान पार पडली व स्थिरस्थावर व्हायला चागली मदत झाली त्यातच श्री भिडे या माझ्या मित्राच्या येण्याने पुढचा जम नीट बसून गेल्याचा उल्लेख पूर्वीच आलाच आहे तर अशा रीतीने श्री व सौ कोपर्डेकर महिनाभर गाजत असलेल्या आपल्या अमेरिका भेटीच्या वास्तव्यास सुरूवात करते झाले.


❋ ❋

प्रकरण : २

# वॉशिंग्टनमधील मुक्कामाचा प्रारंभ आणि फेरफटका

किती दिवसांनी भेटलो, प्रवास कसा झाला, अमका कसा आहे, तमका कुठे आहे, वगैरे प्रारंभी खुशाली--कुशलवृत्त सांगून ऐकून झाल्यावर अमेरिकेत कसे काय चालले आहे ? ज्या हेतूने आला त्या दृष्टीने कितपत प्रगती आहे वगैरे प्रश्नाना एकच ठोक उत्तर पहिल्याच भेटीत देऊन श्री सतीश भिडे या माझ्या मित्राने मला गार करून टाकले आणि पुढील सर्व मुक्कामात मी सतत त्याच विधानाचा प्रत्यय घेत राहिलो आणि तो विषय घोळत असल्यानेच माझ्या लिखाणाचे शीर्षकही आपोआप ठरले गेले भिडेंचे म्हणणे म्हणजे, 'अमेरिका हा एक मोठा तुरुगच आहे!' मी म्हटले, 'ते कसे रे बाबा!' 'काय सागू तुम्हाला कोपर्डेकरसाहेब, हेच वर्णन अगदी सुयोग्य आहे फार तर तुम्ही म्हणता तसे आपण त्याला सोनेरी तुरुग म्हणू या हवे तर!' माझे समाधान एवढ्याने थोडेच होणार! मी त्याला आणखी खुलासा विचारू लागलो 'त्याचे काय आहे की रोजच्या व्यवहारात व सामाजिक परि-स्थिती थोडी माहिती झाली म्हणजेच ते पटेल तुम्हाला!' हे त्याचे उत्तर. मीही आणखी विचार करीत राहिलो वरवर थोडा विरोधाभास वाटेल, अमेरिका म्हणजे मुक्त समाज असे समजून सारेच चालतात आणि येथे येतात आणि जाळ्यात अडकल्या-सारखे चिकटूनच राहतात जाता येत असले, जावेसे वाटत असले तरी कोणी परत जात नाही असे आढळत गेले. पैशाचा विचार

केलात तर कितीही मिळवले तरी माणसाला आणखी मिळवावेसे वाटतातच की नाही ? म्हणजे मर्यादा नसली तरी आणखी मिळवत राहावे या विचाराच्या बंधनाने तो अडकलेला असतो मोकळा समाज आहे, हवे तसे राहाता येते आपल्याकडच्या सारखी नाती गोती, मैत्री, देवाणघेवाण संबंध येथे नसतात वा कमी असतात किंवा पाळायची गरज नसते व ती नसल्याने जो मोकळे-पणा असतो तिच्याच पोकळीत गुरफटून माणूस अडकून राहातो आई वडिल, बहिण भाऊ, मित्र कोणी भेटावे असे फारच वाटल तर माणूस जाऊन येतो, बोलावून घेतो, फोन करतो व तेवढ्या वेळेपुरते त्या भावनेतून मोकळा होऊन पुन्हा येथेच रहातो. बर यासाठी लागणारा पैसा त्याला सहज उपलब्ध असतो (खरे तर पैसा कोणी बाळगीतच नाही म्हणा, कारण प्लॅस्टिकचे क्रेडिट कार्ड व खात्याचा क्रमांक बऱ्याचशा व्यवहाराना पुरतात म्हणजे पैशाकडूनही अडचण नसली तरी त्या मोकळीकीचेही एक आकर्षण म्हणजे बंधनच) एकूण काय येथे राहायला आलेला येथेच रहातो अगदी खूप कौटुंबिक जबाबदाऱ्या असणारा माणूसही येथे येऊन कमवून त्या सर्व भागवून सुखात राहू शकतो, ते त्याला भारतात राहून शक्य झाले नसते ही व अशी माहिती मिळत राहिली आणि विचार ऐकत आलो तशी मला भिड्याच्या विधानातली सत्यता पटू लागली फारच थोडेजण परत येतात व आलेले परत जातात ही उदाहरणेही दिसून आली तरीही त्याला तुरुंग कितपत म्हणायचे याबद्दल व्यक्तिश मी साशंक आहे ज्याला बंधनात अडकून न राहता मोकळा विचार करता येतो व जशी परिस्थिती असेल तसे राहतो येथे त्याला वास्तविक या वातावरणाचे आकर्षण व म्हणून बंधन राहायचे कारण नाही, पण हा झाला तात्त्विक विचार व्यवहाराच्या पातळीवर तरी चांगले खायला, प्यायला, हवी ती खरेदी करायला मोकळीक असल्यावर माणूस हे वातावरणच निवडील यात शंका नाही ! असो, या तात्त्विक चर्चेच्या पिंजऱ्यातून आपल्यालाही बाहेर पडून




वॉशिंग्टनमधील अमेरिकन सीनेट-इमारतीतील प्रवेश कक्षातील रोमन शिल्पाकृती

वॉशिंग्टनचा पुढचा प्रवास चालू करायचा आहेच

मुक्कामाच्या दुसऱ्याच दिवशी अभ्याससत्राला आलेल्यासाठी एक अनौपचारिक स्वागत समारंभ होता अजून बहुधा सगळेजण येऊन ठेपलेले नव्हते पण अमेरिकन पद्धतीत उपचारांना फारच महत्त्व असते प्रथम अनौपचारिक स्वागत समारंभ, मग औपचारिक समारंभ, अधून मधून 'गेट टुगेदर' समारंभ, मध्येच सोशल्स, पुन्हा निरोपाचेही तसेच औपचारिक, अनौपचारिक वगैरे वगैरे सत्र सततचे चालू असते अनौपचारिक स्वागत समारंभात, हॅलो ! हाऊ डु यू डु ! वगैरेंच्या पुढे, न विचारताच, नाव जोडता यावे म्हणून लगेच प्रत्येकाच्या नावाची चिकटपट्टी छातीवर बिल्ल्यासारखी चिकटवायची आल्या आल्या, ओळीत उभे राहून पेये घ्यायची आणि इकडे तिकडे फिरत, याला भेट त्याला भेट करीत, सगळ्यांना तोंड दाखवून हस्तादोलने, स्मिते करीत केव्हातरी हळूच काढता पाय घ्यायचा अगदी जवळच्यांचाच समारंभ असला तर, जरा वेगळी रंगत, गप्पा होतात, नाही असे नाही पण सुरुवात तरी अशी औपचारिकच होत असते.

पण त्या समारंभाचा फायदा नाही म्हटले तरी खूपच असतो. माणसे आणि उपचार माहिती होतात. कोणाचा कोण, कोणाकडे, कशाकरता जावे लागेल वगैरे माहिती मिळून जाते आणि शक्य ती कामे व्हायला थोडे सुकर होते, एवढे खरे आमच्या अभ्याससत्राशी नित्याच्या संबंधित असणाऱ्या सगळ्यांचीच ओळख तेथे झाल्याने, कोणाला हॅलो जेरी, ॲनी, लिटा, मोना वगैरे म्हणून कोणत्या प्रकारच्या कामाबद्दल भेटायचे ते तरी कळले आणि या सगळ्याबरोबर काम झाल्यावर थँक्स म्हटले की ते 'यू आर वेल्कम' (खरे तर.. वेल्क असेच काही तरी) अगदी यांत्रिकपणे कसे म्हणून जातात तेही कळले त्या समारंभामुळे.

नतर, दुसऱ्या दिवशी अभ्यासस्त्राची सुरुवातही औपचारिक ओळखी, प्रशासकीय माहिती, अर्थव्यवहाराची पद्धत, कोठे काय आहे, जेवावे कोठे, चहा कॉफी कोठे घ्यावी वगैरे सर्व तपशील समजावून देणे, इत्यादी गोष्टींनी झाली औपचारिक पद्धतीचा एक चागला फायदा हा की, सर्व तपशील लेखी, नकाशावर वा फळ्यावर समजावून मिळाल्याने पुन्हा अडायला होत नाही. आपल्या पद्धतीत अनौपचारिकपणावर व अनुभवाने शिकण्यावर भर असल्याने सर्व स्थिरस्थावर व्हायला वेळ लागतो तेथे सर्व लिहून दिलेले असते वा तास दोन तास एकत्र बसून झाल्यावर सर्व समजलेलेच असते असे समजून वा म्हणून पुढे जाता येते.


त्यानतरचे आठवड्यातले कामाचे सगळेच दिवस गडबडीचे गेले. सकाळपासून सध्याकाळपर्यंत अभ्याससत्रातच वेळ जाई. सध्याकाळी उशीरा बाहेर हिंडू नका, तेवढे सुरक्षित नाही, असे कोणीतरी सागितल्याने, दूरचित्रवणी पाहाणे, सत्राचे वाचन-साहित्य चाळून काढणे, वगैरेत उरलेला वेळ जाई अठ्ठावीस तारखेच्या पहिल्या सुट्टीच्या शनिवारीही वॉशिंग्टन शहरभेटीचा कार्यक्रम–तोही श्री स्प्रीरीगन या प्रख्यात वास्तुविदाच्या मार्ग-दर्शनाखाली असा ठरलेला होता, सुट्टी बुडाली तरी हा फारच मोठा लाभ होता पूर्वी वॉशिंग्टन शहररचना अभ्यासली–शिकवली होती आता तिच्या सदर्भात आजच्या वॉशिंग्टनचा अभ्यास करावयाचा होता

वॉशिंग्टनमधल्या महत्त्वाच्या रस्त्यावरून आमची अद्ययावत बस धावत होती आणि त्या त्या रस्त्यांचे, शहररचनेचे व काही महत्त्वाच्या इमारतींचे वर्णन श्री. स्प्रीरीगन करीत होते, वास्तु-कलेचे, नगररचनेचे विश्लेषण करून सागत होते. मूळ कल्पक नियोजक ल फाँ (मी आपला एल एन्फट असा स्पेलिंगप्रमाणे उच्चार धरून बसलेलो होतो त्यामुळे हा ‘ल फाँ’ कोण ते

चटकन समजले नाही, जरा वेळाने पत्ता लागला, तोच तो फ्रेंच इंजिनीअर, ज्याने वॉशिंग्टनचा मूळ आराखडा १७९१ साली बनवला व ज्याचा ठसा अजूनही त्या शहरावर आहे ) याच्या कल्पक योजनेची–वैशिष्ट्याची माहिती देत होते.

आजची वॉशिंग्टनची लोकसख्या तीस लाखाहून जास्त असली तरी या शहराची सुरुवात व बराच काळपर्यंतची वाढ सावकाशीचीच होती. १८०० साली त्या वेळच्या रक्षक दलाच्या मागण्या पुरवणे अवघड झाले म्हणून फिलाडेल्फिया येथून राजधानी कोलबिया जिल्हा म्हणून ज्याला संबोधले जाते त्या सध्याच्या जागी आणली गेली त्यावेळी १३५ कारकून व काही वरीष्ठ अधिकारी असा सेवकवर्ग होता व एकूण लोकसख्या ८१४४ होती. ती १८६० साली १,४०,००० झाली आणि १९३० साली ५,७२,००० होती. त्यानतरची वाढ मात्र वेगाने झालेली आहे जॉर्ज वॉशिंग्टन या अमेरिकेच्या पहिल्या अध्यक्षानीच ही जागा निवडली होती (त्याचेच नाव नतर शहराला दिले गेले ) फ्रेंच इंजिनीअर ल फाँची निवडही त्याचीच. ल फाँच्या आराखड्याची वैशिष्ट्ये व सौंदर्यपूर्ण रचना आजही स्पष्टपणे दिसून येतात कॅपिटॉल या मुख्य इमारतीमधून उत्तर–दक्षिण, पूर्व पश्चिम अशा रेषांनी (व त्याच्यावर समातर आणि छेदणारे रस्ते) शहराचे चार भाग पाडले आहेत त्यातल्या पूर्व–पश्चिम अक्षावर 'माल' हा आकर्षक हिरवा पट्टा आहे आणि त्याच्या दोन्ही बाजूला सग्रहालये व इतर सास्कृतिक केंद्रे आणि कार्यालयाच्या इमारती उभारल्या गेल्या आहेत

एकदरच अमेरिकन शहरे ही खूप घडामोडींची केंद्रे असतात आणि मोहिनी घालणारी असतात असे मानले जाते त्यात वॉशिंग्टनचे स्वत चे खास असे स्थान आहे अनेक स्मारके आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या इमारती (भारताच्या इतिहासाचा खूपच लहान काळ असला तरी तेवढ्यात जागतिक महत्त्व व



वॉशिंगटनमधील अमेरिकेच्या सीनेट--सभागृहाचे मुख्य प्रवेशद्वार
ग्रीक आणि रोमन वास्तुविद्याचा प्रभाव दाखवणारी इमारत

श्रेष्ठत्व मिळवणाऱ्या राष्ट्राला तीही महत्त्वाचाच) येथे आहेत अमेरिकन शहरात वॉशिंग्टन शहर आठव्या क्रमावर आहे. सध्या केंद्र सरकारचा नोकरवर्गच तीन लाखावर आहे दैनंदिन व्यापार, बांधकाम व मालमत्तेचे व्यवहार, नेहमीच मोठ्या संख्येने असणाऱ्या प्रवासी पाहुण्यासाठी सेवा–सोयी आणि वाहतूक या महत्त्वाच्या आर्थिक घडामोडी आणि रोजगार पुरवणाऱ्या गोष्टी या शहरात एकवटलेल्या आहेत

शहराच्या मुख्य भागात सुमार दोन तृतीयांश लोक कृष्ण-वर्णीय आहेत, गेल्या पंचवीस वर्षात फार मोठ्या प्रमाणावर इकडे स्थलांतर होत आलेले आहे १७८९ पासून केंद्र शासना-चाच अमल यथ होता पण शंभर वर्षांनंतर स्थानिक शासन संस्था स्थापली गेली पण अजूनही तिच्यावर इतर शहराच्या मानाने केंद्राचे बरेच नियंत्रण आहे, तिचे बजेट मंजूर व्हावे लागते अलिकडेच बाजूच्या दोन प्रांताबरोबर (सहा जिल्हे व कितीतरी नगरपालिका मिळून) एक मेट्रॉपॉलिटन कौन्सिल स्थापन करून, महत्त्वाची धोरणे आखली जातात व एकसूत्रीकरण केले जाते तसेच वाहतूक व्यवस्थेसाठीही तसेच एक प्राधिकरणही आहे शहर व त्याचा प्रदेश यांच्या स्वत:च्या भौगोलिक व परिसर-विषयक समस्या आहेत, त्यांना ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे, सामाजिक आर्थिक प्रश्न आहेत. घरबांधणी, नागरी नवीकरण, नागरी सुविधा, महानगरी सुविधा, नियोजन, वाहतूक अशा कितीतरी प्रश्नाचा, प्रकल्पाचा ऊहापोह, व्यवस्थापन, विकास या सर्वांचा विचार चालू असतो प्रकल्प अमलात आणले जात असतात व शहराचे आणि प्रदेशाचे स्वरूप बदलत असते.

पोटोमॅक नदी आणि तिचे उपप्रवाह यांचा उपयोग करून प्रादेशिक प्रवाह व उपवने आणि राजमार्गाची एक व्यवस्थाच अस्तित्वात आणली गेली आहे जॉर्ज टाऊन ही पहिली इंग्लिश वसाहत व तिने आपले युरोपियन स्वरूप अजून बरेच टिकवले

आहे, तीच गोष्ट अलेक्झान्ड्रिया या भागाचीही आहे पेनसिल्व्हानिया मार्ग हा सर्वात पहिला व महत्त्वाचा मार्ग १७९१ च्या फाँच्या योजनेतला आहे त्यावर बरेच चौक व वर्तुळे आहेत याच रस्त्यावर व्हाइट हाऊस व त्या जवळचा प्रेसिंक्ट हा महत्त्वाचा भाग शहररचनेतही महत्त्वाचा बिंदू आहे जवळच्या जुन्या व्यापारी केंद्र भागाचे आता हळूहळू नूतनीकरण केले जात आहे. अमेरिकन शहरातून हे नित्याचेच होत असते. पलिकडच्या बाजूला फेडरल ट्रँगल : मुख्य सरकारी इमारतींचा (वैशिष्टयपूर्ण वास्तूशिल्पाच्या) त्रिकोणी भाग आहे.

तो पाहून आमची बस कॅपिटॉल या मुख्य सरकारी इमारतीला वळसा घालत घालत तिने एक पार्किंगची जागा मिळवली व आम्ही सर्वच कॅपिटॉलमध्ये शिरलो. इमारत अनेक दृष्टीने वैशिष्टयपूर्ण आहे (प्रचंड पायऱ्यावर निदर्शनेही होत असतात) मागच्या सज्जातून सरळसोट माल व इतर त्रिकोणाकृती रस्त व सग्रहालयाचे आणि इतर इमारतींचे दृश्य फारच आकर्षक दिसते काही कमी उंचीच्या टेकड्या व ल फाँनी योजलेले पण न पुरे केले गेलेले मार्गही लक्षात येतात. वायव्येकडील पेनसिल्वझनिया मार्गावर त्या मानाने मानवी प्रमाणाच्या निवासी इमारतींचे विभाग वसलेले आहेत. अनाकोस्टीया नदीच्या पलीकडे एकेकाळच्या ट्रॅममुळें वाढलेले उपनगर पाहावयास मिळत. ते पाहून आम्ही पुन्हा अलिकडे आलो व नॅशनल आर्ट गॅलरीच्या वैशिष्टयपूर्ण इमारत-समूहात जेवण आणि थोडा विसावा घेतला वर कारंजे व त्याच्याच खालच्या उपहारगृहात धबधबा हे लोकाचे आकर्षण होते तेथे

दुपारच्या फेरीत नैऋत्येकडील बदराच्या गुदामाचे आता नूतनीकरण होत असलेला (दुकाने, हॉटेल्स वगैरे) भाग तसेच नदीकाठचा नयनरम्य वनश्रीयुक्त भाग आणि नूतनीकरणाचे वैशिष्टयपूर्ण प्रमाण (मानवी प्रमाण फार उंच इमारती न

बांधता) पाहायला मिळेल पुढे आजची राजमार्ग व्यवस्था महानगराभोवतालचा 'बेल्ट वे' वगैरे पाहून पुन्हा मागे आलो. आणि क्रिस्टल सिटी, पेन्टॅगॉन, अलिंग्टन सिमेटरी व नवे रॉसलीन व्यापारी केंद्र हे महत्त्वाचे भाग पाहात वॉशिंग्टनची त्या दिवसाची फेरी पुरी केली. शहररचना आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी पाहायला आणि ऐकायला मिळाल्या काही इमारती तशाच (पुनर्जन्म देऊन) सरक्षित ठेवल्या जात आहेत. केंद्र सरकारचे सानिध्य व नागरी व्यवस्थापनावर परिणाम (असून अडचण, नसून खोळंबा) ऐतिहासिक वारसा आणि नव्या वास्तुशिल्पाचा प्रभाव यांचा सघर्ष वा साहचर्य, सास्कृतिक व सामाजिक समस्या आणि नागरी विकास अनेक अंगानी हे शहर अभ्यासण्यासारखे आहे,' हे जाणवले आणि उरलेल्या मुक्कामात त्याचे अवलोकन, अभ्यास, चर्चा चालूच राहिले

* *

प्रकरण : ३

# रेस्टन : नव्या नगराला भेट

वॉशिंग्टन शहराची धावती भेट झाली त्याच दिवशी सध्याकाळी रेस्टन या १८ मैलावरच्या नव्या नगरी, श्री. सतीश भिडेंकडे मुक्कामाला जायचे व दुसरा सुटीचा दिवस त्या भागातच घालवायचा असे अगोदरच ठरवलेले होते तीन तीन वेळा, रेस्टनला कसे पोचायचे त्याची माहिती विचारून घेऊन खात्री करून घेतली होती. प्रथम थोडे अतर चालत जाऊन भुयारी रेल्वेचे स्थानक कोठे आहे, तेथे तिकीट कसे घ्यायचे असते वगैरे माहिती घेऊन आदल्या दिवशी संध्याकाळी तिथपर्यंत जाऊनही आलो होतो. भुयारी रेल्वेच्या तिकीट देणाऱ्या यत्राने आमची थोडी धादल उडवलीच व ५० सेंटस फुकटही घालवले पण वेळ थोडा होता कोठे विचारीत बसता म्हणून पुन्हा दुसरे तिकोट घेऊन गेलो ते तिकीट यत्रात दाखवून मगच स्टेशनच्या आत जाता येते. पुन्हा आत ट्रान्स्फरसाठी दुसरे एक तिकीट घ्यायचे ते घेऊन खाली गेलो, तो प्लॅटफॉर्मवर गाडी येऊ घातल्याची खूण सागणारे दिवे लुकलुकू लागले होते. जमिनीच्या पोटात ती अद्यावत, डौलदार स्टेशने व अतिवेगाने धावणारी नवी कोरी गाडी म्हणजे, वॉशिंग्टनचे भूषण ठरणारी आहे तिच्यावर अमाप खर्च केलेला आहे आणि अजून बरीच दूरपर्यंत वाढवली जायची आहे अजून फार लाबपर्यंत जात नाही सर्व सूचना व्यवस्थित दिलेल्या असतात. फलकावर, गाडीवर व प्रत्येक स्टेशनच्या

आधी गाडीत घोषणाही होते आम्हाला पुढच्याच रॉसलिन या स्थानकावर उतरून पुढे बसने जायचे होते तेव्हा गाडीच्या डौलदारपणाचे, वेगाचे, स्वच्छतेचे, नवेपणाचे वगैरे कौतुक आवरते घेऊन आम्ही गाडी थाबून, दारे उघडण्याची वाट पहात राहिलो बाहेर पडताच, थाब्याची चौकशी करीत आहोत (एका पाकिस्तानी माणसाने आमचा नवखेपणा ओळखून आपुलकीने मदत केली) तो समोर आमची बस निघून गेली व पुढे एक तासभर हरिहरि करीत बसायची वेळ आली आजुबाजूला रॉसलिन या नव्या व्यापारी केंद्राच्या बांधकाम चालू असलेल्या उच्च इमारत समूहात, केवळ आईस्क्रीम खात वेळ घालवावा लागला वीकएड जवळ आलेला असला तरी बसला तेवढी फार गर्दी नव्हती अखेर एकदाची बस आली आणि ट्रान्स्फर तिकीट देऊन आम्ही तिच्यात बसलो बऱ्याच जगलातून, राजमार्गावरून ती बसही जोरात धावत होती पुढे नव्या उपनगरामधून जाऊ लागली व शहराच्या पसरत जाणाऱ्या नागरी सरचनेचे दर्शन त्या बसने आम्हाला घडवले नतर टायसन कॉर्नर नवा दुकानाचा भाग लागला. (उद्या तेथे खरेदीला जाऊ असे ठरवून) आम्ही पाऊस कोसळू लागण्याआधी रेस्टनला पोचव अशी बसची मनातल्या मनात आळवणी करीत होतो. बऱ्याच लोकाचे उच्चार इतके वेगळे असतात की कोणाला काही विचारायचे म्हणजे पचाईतच. रेस्टनला उतरवा बर का? असे चालक तथा वाहक असलेल्या बस सारथ्याला आम्ही सांगितले होते. त्यावर तो जे बोलला हो! हो! असे मी समजलो होतो पण त्याने विचारले होते रेस्टनला पुष्कळ थांबे आहेत त्यातला कुठला? मग जरा वेळाने आमच्या लक्षात आले व डायरीतून पत्ता पाहून भिडेंनी सांगितलेल्या खुणा वाचून सांगितले की (इन्फर्मेशन सेंटर स्टॉप) 'ओखे ओखे' करीत त्याने बस आणखी जोरात सोडली प्रवाशांनी टाकलेल्या पैशाचे पृथक्करण करणारे

यंत्रही पुन्हा खरखटू लागले अखेर एकदाच्या सांगितलेल्या खुणा दिसू लागल्या 'नेक्स्ट स्टॉप फर्मेशन सें...र' असे काहीतरी सारथी साहेब लाऊडस्पीकरवर पुटपुटले आणि आम्ही पिशवी सावरीत दाराजवळ जाऊन उभे राहिलो बाहेर पाऊस सुरू झालेला होताच पण कसेबसे इमारतीच्या प्रवेशद्वारात पळत पळत गेलो आणि पाऊस जोरात कोसळू लागलेला दिसला. अजून तसा उजेड होता, पण संध्याकाळचे बाहेर भटकणे रद्दच होणार हे लक्षात घेऊन आम्ही सतीशच्या दारावरची घंटा वाजवतो झालो.

उत्साहाने स्वागत, कुशलवृत्त झाल्यावर मी म्हटले आता बाहेर जाणे रद्दच झाले आहे तर मी आणलेला भीमसेनचा टेप काढतो म्हणजे गप्पा आणखी रंगतील ती कल्पना त्यानाही आवडण्यासारखीच होती. फक्त छोटया सत्यजीतला मात्र रंगीत दूरचित्रवाणीवरचा कार्यक्रम बघायचा होता. आवाज बंद करून त्याला तेही सुरू करून दिले गेले. चित्रविचित्र विदूषकाच्या रंगीबेरंगी गोष्टीची हालती चित्रे, इकडे पूरिया, दुर्गा व मग अभंग, मधूनच गप्पामध्ये विनोद व हास्याचा कल्लोळ व साथीला चवदार भारतीय पद्धतीचे जेवण अशी ती संध्याकाळ घरातच बसूनही मस्तपैकी निघून गेली गप्पा कितीही मारल्या तरी संपत नसतातच म्हणून नाईलाजाने मध्यरात्री तरी झोपावेच लागते, शिवाय दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाचे आकर्षण होतेच.

सकाळ बेटी छान उगवली होती पावसातून स्वच्छ धुऊन काढलेली घरे, हिरवळ, झाडे व रस्ता काचेपलीकडे छानच दिसत होता पावसाचा आता मागमूसही नव्हता. काचेचे दार सरकवून सज्जात उभे राहिल्यावर गारठा मात्र जाणवत होता चला चला लवकरच आवरून बाहेर पडू या, अशी गडबड मी सुरू केली, पण मराठी वळणाच्या सौ स्मिता वहिनी शिरा आणि काय काय खाद्य पदार्थ मांडूनच बसल्या होत्या, तेव्हा आधी पोटोबा व मग रेस्टनोबा असे करणे ओघानेच आले. नंतर घराच्या समूहातून पार्किंग लॉटमध्ये जाऊन गाडीची विचारपूस वगैरे झाल्यावर

आमची रेस्टनची यात्रा सुरू झाली नगराचे आकषण असलेला तळचाकाठचा दुकानाचा भाग, आणि बाजूचे निवासी इमारतींच्या वैशिष्टचपूर्ण समूहाच्या तर बाहेर अगदी नैसर्गिक वातावरण, झाडे, टेकडचा, कालवे, किलबिल करणारे थवे, मधून टेनिस कोर्ट वा व्हॉलिबॉलचे मैदान, तरणतलाव, रस्त्याखालून व वरून जाणारे पादचारी मार्ग अशा नाना तऱ्हेच्या गोष्टी या नव्या नगरात आहेत तळचाभोवतालची दुकाने, कार्यालये, चर्च वगैरेचा समूहही वास्तुशास्त्राच्या दृष्टीने आकर्षक असा आहे. तेथे थोडा वेळ घालवत असतानाच छोटचा सत्यजीतने गुगारा देऊन काही वेळ आम्हा सर्वांनाच अस्वस्थ करून टाकले मग कुठून तरी अकल करीत हाक मारत आला बेटा

नतर गाडीतून इतर निवासी भागाची फेरी करीत करीत भिडेंनी डिझाईन केलेल्या शाळेजवळ आलो सौरशक्ती वापरून व इमारतीच्या आतली उष्णता बाहेर पडू न देता इधन शक्तीची बचत करणारी ती प्रचड शाळा आणि तिची वैशिष्टचपूर्ण रचना पाहाताना आम्ही भिडेंची पाठ थोपटत होतो

रेस्टन हे नवे नगर ७४०० एकर जागेवर वसलेले आहे आणि त्याची स्थापना १९६२ साली झाली आज साधारण ३२,००० लोकसख्या, पूर्ण विकसित झाल्यावर ६७,००० होईल डलस आतरराष्ट्रीय विमानतळापासून अगदीच जवळ असल्याने कार्यालयाबरोबरच, परिषदांसाठीही ते एक आकर्षक केंद्र ठरले आहे. शिवाय वॉशिंग्टनमधल्या बऱ्याच सरकारी अधिकाऱ्यांचे खास आवडते निवास केंद्र तर आहेच दोन चित्रपटगृहे, १५ तरण तलाव, ४५ टेनिस कोर्टस्, दोन गोल्फकोर्स, ५११ एकर खुली जागा, ४० मैल लाबीचे पदपथ व दुचाकीपथ, ७० एकरांचे निसर्ग–केंद्र, १० मैल घोडदौडीचा पथ अशी अनेक आकर्षणे तिथे आहेत घर व कार्यालय या दोन्हीच्या बाबतीत ते बऱ्याच जणाना आकर्षित करीत असते सर्व सोयी जवळच आणि तरीही नैसर्गिक पर्यावरण यामुळे या नव्या नगराने एक वेगळे नागरी

वैशिष्टयपूर्ण विश्व निर्माण केले आहे असे म्हणता येईल.

रेस्टनमधून तसे बाहेर पडावेसे वाटणारे नव्हते पण पुढचा कार्यक्रम होताच व मुक्कामाला परत वॉशिंग्टनला जायचे होते म्हणून टायसन कॉर्नर या दुकानाच्या केंद्राकडे वळलो के मार्ट, वुलवर्थ वगैरे प्रचड डिपार्टमेटल स्टोअर्स पहात पहात आम्ही तेथल्या आकर्षक माळकडे वळलो. जादू–इ –नगरी सारखाच तो आतला भाग आहे. पिझ्झा शॉप दिसल्यावर भूक लागल्याचे जाणवले व पिझ्झाचा शोध लावणाऱ्या इटालियनाना धन्यवाद देत चीज, सॉस, भाज्या इत्यादींनी सजवलेली, शिजवलेली ती पावा-सारखी पोळी घेऊन तिच्यावर ताव मारला. पुन्हा उरलेल्या दुकानाचा फेरफटका पुरा केला या दुकानामधले सगळे व्यवहार तसे खुलेच सगळ्या वस्तू किमतींची लेबले लावून ठेवलेल्या व टोपलीत वा ढकलगाडीत घेऊन जायचे आणि बाहेर पडताना काऊंटरजवळ बिल देऊन बाहेर जायचे काऊंटरच्या मुलींना वस्तूच्या लेबलावरून बिल करताना आपल्यासारखे साधे पाढे व गणित करून हिशोब करायची सवय नसते एका ठिकाणी तीन वस्तू सारख्याच किंमतीच्या होत्या म्हणून मी सतरा त्रिक एकावन्न असे म्हणून ५ डॉलर दहा सेंट पुढे ठेवले तरी हिशोब करणारी मुलगी म्हणाली थाब थाब हे तुला कळलच कस ? मग १–७०+१–७०+१–७० = ५–१० असे यत्रावर कुटकुट करून काढले तेव्हाच पैसे बरोबर म्हणून मानल दुसऱ्या ठिकाणी १० डॉलरमधून दोन डॉलर परत द्यायचे ते सुद्धा यत्राने वजाबाकी करून सागितल्यावरच मिळाले या कॅल्क्युलेटर्सनी सगळ्या अमेरिकनाची साधी गणिते करण्याची क्षमताही घालवून टाकली आहे अशा त्या दुकानाची तेथल्या भरगच्च व आकर्षक वस्तूची व रेस्टन या सुदर नगराची आठवण राहावी असाच तो सगळा अनुभव. त्याची स्मृती जागवत आम्ही सध्याकाळी उशीरा वॉशिंग्टनला परतलो

❋ ❋

प्रकरण : ४

# नयनरम्य नायगारा

तीस एप्रिलपासून सुरू होणाऱ्या अभ्यासात दुसऱ्या आठवड्यात अती गंभीर, किचकट व वादग्रस्त विषय चर्चेला होते. नागरी जमीन, तिच्या किंमती आणि संपादनाच्या समस्या, नागरी भू वापर आणि नियंत्रण नागरी सेवा–सुविधासाठी वित्तपुरवठा, मालमत्ता व इतर कराची वसूली, नागरी विकासाला योग्य दिशा देण्याच्या करपद्धतीचा वापर, नागरी स्थानिक प्रशासनाना सरकारकडून मदत, अनुदाने व कराची वाटणी वगैरे विषयावरच्या चर्चा शेवटी वादविवादांचे स्वरूप घ्यायच्या. रोज खूप वाचूनही यावे लागे आणि इतरानी व्यक्त केलेल्या मतावर आपल्या अनुभवातून मतप्रदर्शन करायचे असे. या सगळ्यानी डोके कलकलून गेले असल्यास नवल नाही. मध्येच बुधवारी दुपारी थोडा वेळ मोकळा मिळाला होता पण त्याने भागण्यासारखे नव्हते या वीकएण्डला काहीतरी चांगला कार्यक्रम–बदल व बाहेरचे वातावरण–कोठेतरी जायला मिळाले पाहिजे असे वाटू लागले होते त्याचवेळी पुण्याचे श्री व सौ ढमढेरे भेटावेत आणि आम्ही श्री दामले याच्या गाडीतून नायगाऱ्याला जायचा विचार करतो आहोत, येताय का ? असे त्यानी विचारावे म्हणजे दुधात–साखर–केशर सगळेच काही घालून पुढे यावे असे वाटू लागले नायगाऱ्याच्या फेसाळ प्रवाहाची व फार पूर्वी पाहिलेल्या चित्रपटातल्या विविध दृश्याची मालिका डोळ्यासमोर तरळून गेली


आणि चटकन होकार दिला.

आठवड्यातले उरलेले सत्रभाग जोरात चालू होते व रोज घरी संध्याकाळी उशीरा परतत होतो तर इकडे सौ कोपर्डे-कर आणि सौ ढमढेरे दिवसभर संग्रहालये पाहून (आज पेंटिंग्ज, उद्या शिल्पकला, परवा इतिहास) 'फर्स्ट अमेरिकन लेडीजचे पुतळे आणि त्यांच्या राहाण्याच्या खोल्यांचे नमुने किती छान होते नाही' वगैरे स्वरूपाच्या चर्चा रोज करायच्या व 'चालून चालून पाय दमले बाई' म्हणत 'मग नायगाऱ्याच्या सहलीची तयारी काय करायची,' असे आम्हाला विचारायच्या अमेरिकन ग्रोसरी स्टोअरमधून आणलेल्या छान छान भाज्या, चीज, चॉक-लेटस्, योगर्ट (म्हणजे आपले दही) आईस्क्रीम वगैरेंवर ताव मारत आम्ही म्हणायचो इथे सगळीकडे सगळे मिळते फारसे काही न्यायला नको, फार तर थोडे सँडविचेस करून घ्या. तिकडे श्री. दामलेही ऑफिसच्या कामासाठी ३ दिवस टूरवर जाणार होते. त्याआधी आपला फ्रीज विविध वस्तूंनी गच्च भरून टाकून गेले होते एकदरीत ट्रिपची मानसिक आणि पोटार्थाची तयारी चांगली होत होती शुक्रवारी इन्स्टिटयूटमधून येताना पासपोर्ट आणायला विसरू नका, ही श्री ढमढेरे यांची सूचना फारच मोलाची ठरली कारण आम्ही पासपोर्ट वगैरे मूल्यवान वस्तू इन्स्टिटयूटच्याच हवाली केलेल्या होत्या शुक्रवारचे कर-पद्धतीवरचे सकाळचे सत्र आणि दुपारचे शुक्रवारचे टाईम व्हॅल्यू ऑफ मनी' वरचे सत्र म्हणजे डोक्याला शिणवण्यात अगदी कळस झाल्यासारख वाटले. इकडे प्रवासाला जायच्या व वेळ वाचवण्याच्या कल्पनाचा विचार, तर वाह्यात वेळेची किंमत कशी काढावी आणि 'कॉस्ट बेनिफिट अॅनालिसीस अँड टाईम व्हॅल्यू' वर अती गांभीर्याने चर्चा चालू होती वेळ म्हटल तर संपत नव्हता आणि म्हटले तर पळत होता अशी स्थिती झाली होती.

अखेर चार मेच्या शुक्रवारच्या दुपारच्या सत्राची वेळ

एकदाची सपली आणि सारेच बाहेर जवळजवळ धावतच निघालो. अपार्टमेंटसकडे इतराचेही न्युयॉर्क वा अन्य ठिकाणाचे कार्यक्रम होतेच मी घरी पोचतो तोच श्री ढमढेरेही आपले बँकेतले जलसिंचनाच्या योजनांचे कॉस्ट बेनिफिटच्या आकडेमोडीचे काम सपवून घरी पोहोचले व थोडे चहापाणी करून फॉगी बॉटम या भुयारी रेल्वेच्या स्थानकाकडे निघालो मागच्या अनुभवाने शहाणे झालेलो असल्याने रेल्वेचा प्रवास व लगोलग धावत बस गाठण्याचा प्रयोग चागलाच जमला. बसच्या सारथ्याला 'ली हायवे, पाईनस्प्रिग' वगैरे सागितल्यावर परत अपार्टमेंट का पार्क असा प्रतिप्रश्न त्याने केलाच! श्री ढमढेरे यानी तो घराचा भाग पाहिलेला असल्याने अडचण आली नाही. व ७–७॥ च्या सुमारास आम्ही श्री दामले याच्या घरी बरोबर पोहोचलो. सागितलेल्या ठिकाणाहून किल्ली मिळवून घरात विश्राम करते झालो श्री. दामले परत येईपर्यंत गप्पाचा एक चागला अड्डा जमला व त्यातूनच शिवाजीला मुलगी होती का नव्हती आणि गायकात श्रेष्ठ कोण वगैरे दोन–तीन वाद काढले व पुढच्या प्रवासात आणि नतरही मोठ्या हिरीरीने ते लढवले श्री. दामले घरी आल्यानतरचा गप्पाचा दुसरा डावही रगला. महाराष्ट्रातल्या सर्व थोर व्यक्ती, ग यक, मते शहरे मराठी माणसाला बाहेर पडायला नको हे एक टोक व पडल्यावर दिग्विजय गाजवण्याचा सोस असल्याचे दुसरे टोक असे अनेक विषय येऊन गेले. अमेरिकेतील लोकाची जीवनपद्धती आणि आपली तसेच सोनेरी तुरुगाची कल्पना, यावरही भरपूर चर्चा झाली मध्यरात्रीला उद्या लवकर उठून जायचे आहे ही जाणीव होऊन गप्पाष्टक आवरते घेतले व झोपेच्या आधीन झालो

सकाळी उठून सगळेच भराभर तयार झाले. प्रथम श्री दामले गाडी ठाकठीक अ हे ना ते पाहून आले व मग पिशव्या उचलून सगळेजण गाडीत स्थानापन्न झालो गाडीत घरासारखे सामान



नयागाऱ्याचा नयनरम्य परिसर : कॅनडाच्या बाजूकडून दिसणारे
विहगम दृश्य

टाकायला भरपूर जागा होतीच शिवाय प्रवासाच्या म र्गदर्शना-साठी नकाशाचा गठ्ठा श्री दामले यानी आणून घेतला होता अमेरिकन राजमार्गाची व्यवस्था इतक छान आहे की, महिने न् महिने चाकातली हवाही चागली राहाते शिवाय टप्प्याटप्प्यावर गॅस (पेट्रोल), खाद्यपेयाचे दुकान, रेस्टरूम वगैरे सोयींमुळे प्रवासाचा त्रास जाणवत नाही. राजमार्गाची व्यवस्थाच अशी की, नेहमी आपण गावाच्या बाहेरूनच जातो नुसते रस्त्याचे व साध्याचे क्रमाक याच्यावर लक्ष ठेवून योग्य वळण घेतली की, कोठेही जाणे नवख्यालाही अवघड नसते वाटेत जगले, पूल, एक मोठा बोगदा वगैरे पाहात पाहात मधूनच विश्राम थाबे घेत आम्ही दुपारी चारच्या सुमारास नयागाऱ्याजवळील (अमेरिकनाचा उच्चार) इच्छित स्थळी पोहोचलो बफेलो शहर पार करून व नदीवरील प्रचड पूल पार केल्यावर २/३ मोटेल्समध्ये चौकशी करून अगदी जवळचे मोटल निवडले व सामान तेथे टाकले

श्री दामले नायगाऱ्याचे अत्यत प्रेमी गृहस्थ असल्याने आता त्याच्यात उत्साह सचारला होता इतकी ६००-६५० मैल गाडी चालवल्यावरही ते अजिबात कटाळलेले नव्हते लगेच कॅनडातल्या मुख्य धबधब्याकडे चालत जाण्याचा कार्यक्रम त्यानी जाहीर करून टाकला आठवडाभर रोज दूरचित्रवाणीवरील हवामानाच्या अदाजाकडे आमचे लक्ष असेच आज किंचित पाऊस व थड वारे असे अनुमान होते पण त्यावेळेला तरी चागली मोकळी हवा होती

श्री दामले यांचा उत्साह मग सर्वांच्यातच सचारला आणि थोडे ताजतवाने होऊन कॅमेरे सरसावून सगळेच बाहेर पडलो अमेरिका–कॅनडाच्या सरहद्दीवर ! या मुक्कामावर फक्त चिचोळी नदी व तिच्यावर पूल आहे त्याच्यावर जाण्यापूर्वी आतरराष्ट्रीय सीमा पार करण्याचा उपचार नायगारा पाहायला तात्पुरते जाणारे प्रवासी म्हणून अगदी चटकन पार पडला या पुलावर

बर्फ पडून त्याच्या वजनाने तो मोडला आहे व अनेक वेळा दुरुस्त केलेला आहे वगैरे हकीकत ऐकत पुढे जाऊ लागलो व लवकरच दूरवरचे नायगाऱ्याचे मनोहर दृश्य डाव्या बाजूला दिसू लागले

प्रथम त्या पुलावरूनच आमच्या छायाचित्रणाला सुरुवात झाली ७—७॥ पर्यंत बऱ्यापैकी उजेड होताच. मध्येच थोडे ढग दाट होऊन पाऊसही शिडकावला, पुन्हा जरा थांबला. पुलावरून, पुढे रस्त्यावरून च नतर व्हिक्टोरिया पार्कच्या दरीजवळच्या काठाकाठाने चालत राहिलो प्रत्येक महत्त्वाच्या वळणावरून आळीपाळीने त्या मनोहारी दृश्याचा फोटो काढून घ्यायचा. मधूनच दामल्याचा मूव्ही कॅमेराही, धबधबा त्याचा आसमंत व इतर दृश्ये टिपायचा. धबधब्याच्या जवळ जाऊ लागलो तसे वर येणारे तुषार अंगावर पडू लागले. पांढरे शुभ्र धुके, खाली दाट, मग विरळ विरळ होत वरवर जाणारे! कापसाचे ढगच जणू ते दृश्य सारखे पाहातच राहावेसे वाटण्या-सारखेच होते खरे कॅनडात शिरल्यावर चहा प्यायचा असे ठरले होते ते आम्ही विसरून गेलो व धबधब्याजवळ जातच राहिलो. गिफ्ट शॉप हा खरे तर सगळ्याचा वीक पॉइंट असतो. पण प्रथम दर्शन नायगाऱ्याचे हाच आमचा बाणा झालेला होता जवळपासचे सर्व पॉइंटस पाहून, लिफ्टने खाली जाऊन अगदी बोगद्यातून पडणाऱ्या पाण्याजवळ दोन ठिकाणी जाता येते तेथे गेलो. पूर्ण रबरी वेष अंगावर चढवून त्यात एकमेकाना ओळखून धबधब्याच्या प्रचंड प्रपाती आवाजाच्या पार्श्वभूमीवर ओरडून बोलण्यात एक वेगळी गमत वाटत होती

या नायगाऱ्याला दरवर्षी ५० लाख प्रवासी भेट देतात पाण्याचा प्रचंड स्रोत उंचावरून सतत पडणारा पाहिल्यावर आपल्याला निसर्गातल्या जिवतपणाचे आणि प्रचंड शक्तीचे दर्शन घडत असतेच पण भेट देणाऱ्या प्रवाशाना इतरही कितीतरी मनोरंजक आणि उद्‌बोधक माहितीही मिळत असते. कॅनेडियन

भागातल्या घोड्याच्या नालाच्या आकाराच्या धबधब्याचा घनगंभीर गर्जना करणारा नाद प्रवासी कधी विसरणार नाहीत व त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी त्या अगदी धबधब्याजवळच्या निरीक्षण सज्जात आणि बोगद्यातून आणखी जवळपर्यंत नेणाऱ्या गॅलरीतच जायला हवे दर मिनिटाला साडेपधरा कोटी लिटर पाणी वरून खालच्या दरीत कोसळताना पाहाणे म्हणजे आयुष्यात एकदा तरी घेण्याजोगा अनुभव आहे. त्या ६७५ मीटर नालाकृती धबधब्याचे सपूर्ण दृश्य पाहताना मनुष्य बाकी सारेच विसरून जातो दरीत कोसळणारे पाणी घुसळत असते पडत असत बाष्पीकृत होत असते, तुषार उडवीत असते ऊन असले तर इद्रधनुष्ये निर्माण करीत असते अतिथडी असली तर पिंजलेल्या कापसासारखा बर्फ ओतीत असते आणि रात्री रगीबेरगी प्रकाशात आणखी काय काय चमत्कार दाखवीत नेत्रसुख देत असते, की काय त्याच वर्णन करावे !

एरी आणि ओटारिओ या दोन प्रचड तळ्याच्या उचींमध्ये १०० मीटर एवढा फरक आहे व तेवढी उची सुमारे ५६ कि मीटर लाबीमध्ये नायगारा नदीने उतरलेली आहे प्रत्यक्ष धबधब्याच्या जागी तिचे दोन भाग झालेले आहेत कॅनडाच्या बाजूच्या नालाकृती धबधब्यातून दर मिनिटाला सुमारे साडेपधरा कोटी लिटर पाणी १४ मीटर उचीवरून पडत असते तर अमेरिकन बाजूला ५४ कोटी लिटर पाणी दर मिनिटाला पडत असते दरीची उची तशी १०८ मीटर आहे आणि खाली पाण्याची खोली ५४ मीटर आहे दरीची अमेरिकन व कॅनेडियन टोके जोडणाऱ्या पुलाचा उल्लेख पूर्वी आललाच आहे. कॅनडाच्या बाजूला टेबल रॉक हाऊस या निरीक्षण प्रागणावरील वैशिष्टचपूर्ण इमारतील दुकाने, उपहारगृह वगैरे दोन भागात आहेत व त्याच्याखाली लिफ्टमधून जाऊन २०० मीटर चालत गेल्यावर प्रत्यक्ष पडणाऱ्या पाण्याच्या अगदी जवळ म्हणजे १० मीटर अतरावर आपण तुषार स्नान करू

शकतो तेथेही दोन निरनिराळ्या गॅलऱ्यातून वेगवेगळे दृश्य पाहाता येते

नायगाऱ्याचे जवळचे दृश्य जसे भारून टाकणारे आहे, तसेच दूरवरचेही आहे पुलावरून दिसणारे दृश्य आपण प्रथमच पाहतो पण आता नतर वर उच मनोऱ्यावरून पाहू शकतो ते अधिक मनोहारी व वेगळ्याच विश्वात नेऊन सोडणारे असते अधार पडण्यापूर्वी तेथे पोहोचून एकदा सपूर्ण परिसराचे विहगम दृश्य पाहून घ्यावे व नतर अधार पडल्यावर विविध रगाचे बदलते प्रकाशझोत टाकलेले पाहात राहावे चावरे थड वारे बोचकारे काढत असतात, तर दृश्य खिळवून टाकत असते शिवाय कॅनडा आणि अमेरिका दोन्ही बाजूला पसरलेला नागरी आणि ग्रामीण भाग, त्यातले प्रकाशमान रस्ते आणि इमारती याची दूरवर पसरलेली पार्श्वभूमी आपल्याला तेथेच उभी राहून पाहाविशी वाटते. म्हटले तर आपण त्या साऱ्याच परिसराचे व परिसरातले असतो, म्हटले तर त्यापासून वेगळे दूर उचीवर उभे असतो आजूबाजूला, निरनिराळ्या देशातून आलेल्या प्रवाशाचा, त्याच्या बोलण्याचा, खरेदीचा, मनोऱ्याच्या सर्व कोपऱ्यातून पाहाण्यासाठी फिरण्याचा व सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून एक कोलाहल चालूच असतो व तो हळूहळू आपल्याला भानावर आणत असतो आपल्याला खाली जायचे आहे, तहानभूक आहे वगैरे जाणीव करून देत असतो नदीच्या वर ७७५ फूट आपण आहोत मध्यरात्रीपूर्वी लिफ्टसाठी राग लावून खाली उतरून खालच्या गिफ्ट शॉपमधली खरेदी उरकून कोठेतरी पोटपूजा करून मुक्कामाला पोचायला पाहिजे, हा अगदी वास्तववादी विचार आता प्रभावी ठरू लागलेला असतो आणि त्यामुळेच पुन्हा पुन्हा मागे वळून पाहात आम्ही रागेत वळलो लिफ्टवरच्या मजल्यांच्या जरा खाली आल्यावर काचेतून दिसणारे निसटते दृश्य पुन्हा एकदा डोळ्यात साठवून घेण्याचा प्रयत्न केला तरी आता आम्ही बरेचसे जमिनीवर–वास्तव पातळीवर उतरलेले होतो

त्या मनोऱ्यापासून रेनबो पुलाजवळच्या उपहारगृहे असलेल्या भागापर्यंत कुडकुडत चालत जाताना मधूनच मागे वळून रंगीत झोतातला प्रपात पाहून घेत होतो. वरून थोडा पाऊसही पडत होता, पण त्याची एवढी मातब्बरी वाटत नव्हती कारण पोटातली भूक आम्हाला पुढेच ओढत होती तरीही जाताना माहितगार आणखी माहिती आपणाला देतच असतात आणि ती आम्ही ऐकत होतो. हे खडक म्हणे ४० ते ५० कोटी वर्षांचे जुने आहेत पण नदी मात्र २०००० वर्षांपूर्वीची तीही आता वापरात नाही उलट नायगारा नदीचे ७५ टक्के पाणी, दोन वेगवेगळ्या बोगद्यातून नेऊन अॅडम व रॉबर्ट मोझेस या दोन विद्युत् जनित्र केंद्राकडे नेण्यात येते व २९२ फूट उंची मिळाल्याने ५ दशलक्ष हॉर्स पॉवर एवढी वीजनिर्मिती केली जाते त्यामुळे धबधब्याच्या क्षेत्रात जमिनीची हानीही कमी होत आहे. संपूर्ण दरीच्या दोन्ही बाजूला इतरही अनेक आकर्षक स्थळे निर्माण केली गेली आहेत काही स्थळे अपघात, जमिनाची धूप, दगडांच्या राशी कोसळणे वा जमा होणे इत्यादींमुळे बंदही करावी लागली आहेत प्रपात क्षेत्रात भूस्तरतज्ञांनी स्थैर्यासाठी काही उपाय करण्याचा विचार केला होता, पण शेवटी निसर्गाच्या शहाणपणावरच विसंबून राहायचे ठरवून तो सोडून दिला येत्या शभर वर्षात अमेरिकन प्रपाताच्या बाजूला दगडांची रास निर्माण होऊन प्रपाताऐवजी पाण्याची उतरडीवरील घसरण असे स्वरूप त्याला येईल असा एक अंदाज आहे आणखी काही वर्षांनी नालाकृती प्रपाताचेही तसेच होऊ शकेल व पुन्हा काही वर्षांनी थोडे मागच्या बाजूला नवे प्रपात निर्माण होऊ शकतील आणि इतर छाती दडपून टाकणारी माहिती ऐकून निसर्गाच्या सौंदर्यापेक्षा विराट शक्तीचे, आकडेवारीचे दडपण आपल्यावर येतेच त्यातच आणि भूक चांगली प्रज्वलित झालेले असे आम्ही उपहारगृहाजवळ पोहोचलो.

दिवसभर दमल्यावर थंडी वाऱ्यात हिंडल्यावर व पायाचे

तुकडे पडताहेत असे वाटू लागल्यावर खाद्यपेयावर तुटून पड-ताना काय समाधान मिळते त्याचा अनुभव आम्ही त्या दिवशी नायगाऱ्याला घेतला तेथे मिळणारा पिझा, सँडविच, केक, कॉफी वगैरे म्हणजे आपले शिरा, वडा, इडली, डोसे काहीही समजून त्यावर ताव मारला भुकेल्या पोटाला सारेच सारखे असते भरल्या पोटी पुन्हा बोचऱ्या थडीत भिजत दरीवरचा पूल पार करून, कस्टमचे नाके पार करून मोटेलवर परतलो, तो जवळ जवळ यांत्रिकपणेच डोळे गपागप मिटत असतानाही पुन्हा काहीतरी पेय हॉटेलमध्ये शोधत होतो कारण थडी व पुन्हा चालण्याने गळाळून गेल्यासारखे झाले होते पण नतर एकदरीत छान झोप लागली

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून पुन्हा दामल्यांच्यातला उत्साह आणि मून्ही कॅमेरामन कोणाला स्वस्थ बसू देत नव्हता अमे-रिकन बाजूकडच्या ' गोट आयलड 'वर जाऊन दोन्ही धबधब्यांचे पुन्हा जवळून दर्शन घ्यायला मिळाले पाऊस नव्हता पण पूर्ण ढगाळ हवा होती व तशा प्रकाशात पाण्याजवळचे फोटो छान येतील हा कयास चुकीचाही नव्हता सकाळी लवकर गेल्याने गाडी पार्क करायला भरपूर जागा होती व मनसोक्त दर्शन घेत फिरता आले

प्रचड बर्फाच्या ५ मैल जाड पापुद्र्याच्या वितळण्यातून ही तळी व नदी निर्माण झाली. बर्फाच्या प्रचड वजनाने बशीच्या आकाराच्या दऱ्या निर्माण होऊन ही प्रचड तळी अस्तित्वात आली त्या बशीच्या आकाराच्या कड्यालाच नायगाऱ्याचा कडा म्हणून ओळखले जाते व त्याचा खडकाळ पृष्ठभाग न्युयॉर्क प्राताच्या उत्तर भागातून ओंटारिओ या दक्षिण भागापर्यंत पसरलेला आहे उत्तरेच्या किनाऱ्याला ह्युरॉन तळे आणि वरचा मिशिगन द्वीपकल्पाचा भाग आहे १९५३ साली पाणी या धबधब्यावर समान तऱ्हेने पडून पृष्ठभागाची झीज कमी व्हावी

म्हणून बाजूला थोडा भाग खणण्यात आला वरून जोरान पड-णाऱ्या पाण्याच्या प्रभाव क्षेत्रात पाणी फारच उसळते असते उन्हाळ्यात त्या भागांत प्रवाशाना घेऊन जाणाऱ्या बोटीला स्थिरपणे चालण्यासाठीं, पूर्ण इंजिनशक्ती लावून जावे लागते तळापाशी १९०५ साली बांधलेले एक विद्युत्गृह आहे

हिंडता हिंडता दुपार होऊ लागल्याचे जाणवले व आपण सहाशे–साडेसहाशे मैलांवर आहोत, उद्यापासून पुन्हा दैनंदिन कार्यक्रम आहेच ही जाणीव झाली आणि पोटपूजा करून परतीच्या प्रवासाला लागलेले बरे! असा ठराव सर्वानुमते मंजूर करून आम्ही नायगाऱ्याच्या मनोहर भूस्थळ दृश्याचा निरोप घेतला

परतीच्या प्रवासात मुद्दाम जरा वेगळ्या रस्त्यांनी जाऊन छोटी गांवे, जंगले, सुप्रसिद्ध 'हॉर्स शू रेल्वे' वळण पहात पहात रात्री ११॥–१२ वाजता वॉशिंग्टनला पोचलो तेव्हा निसर्गाच्या करामती, त्याच्यावर माणसाची थोडीफार करामत व हे सगळे पहाता येणे, शक्य करणारी अमेरिकन राजमार्ग व्यवस्था, मोटारी आणि त्या साऱ्याशिवाय श्री दामले यांच्यातला अथक व उत्साही सारथी आणि कॅमेरामन (नंतर ती फिल्म पहाताना खरोखर धन्य वाटले) या साऱ्यांचा विचार येत होता त्या निमित्ताने व जवळ जवळ दरवर्षी नेमाने नायगाऱ्यास भेट देणाऱ्या श्री दामले याना आम्ही सर्वांनी नायगारा 'प्रेमिकांची संस्था' स्थापून, तिचे तहहयात अध्यक्षपद देऊन टाकले.

※ ※

प्रकरण : ५

# काही अमेरिकन भारतीय माणसे आणि एक अमेरिकन शहर

नायगाऱ्याच्या भेटीनतरच्या आठवड्यात अभ्याससत्रात विविध विषयावर चर्चा होऊन तो कटाळवाणा झाला नाही तसेच पूर्वीची थोडी ओळख असलेले व येथे कामानिमित्ताने राहिलेले, स्थायिक झालेले असे वेगवेगळे लोक भेटण्याचा योग जमून आला त्याच्यापैकी काहीच्या घरीही जाण्याचा योग आला आणि त्या आठवड्यात एकदरीत खूपच विविधता आली नव्या गोष्टी पहायला–ऐकायला–अनुभवायला मिळाल्या. आपल्याकडच्या माणसानी आपले स्वत्व राखून येथील वातावरणात येथल्यासारखे रहाण्याचा प्रयत्न कसा केला आहे तेही पाहायला मिळाले अगदी अमेरिकन नाही तरी भारतीय ओळखीचे काही निमित्त–प्रसग साधून एकमेकाना बोलावून आपली शुक्रवार सध्याकाळ 'वीक एडपूर्वीची' कशी मजेत घालवतात ते अनुभवण्यासारखेच आहे आठवड्यातले कामाचे, गाडी चालवण्याचे दडपण, ताण, वाढत्या महागाईवरची ठराविक चर्चा, हवापाण्याची चर्चा असल्या नित्याच्या ठराविक चर्चा सोडून देऊन ज्या घरात जमलो आहोत त्याच्याकडच्या एखाद्या नव्या वस्तूवरून (बोलायला सुरुवात करायला कॉन्व्हर्सेशन पीस असावा लागतो, ही तिथली एक पद्धत तेथे पडून गेलेली असते) सुरुवात होऊन मग विविध विषयावरच्या चर्चा कशा रगतात ते पहायला या शुक्रवारच्या साय. पार्ट्याच हव्यात

निखळ काव्यशास्त्र विनोदापासून तो एखाद्या माहितीतल्याच खास बातमीपर्यंतचे सगळे विषय यत असतात एखादा विनोदी गृहस्थ स्वतःची व आपल्या कलत्राची चेष्टा करून वा करवून घेऊन सगळ्याना हसवीत खुलवीत असतो एखादा आपल्या सुटणाऱ्या पोटावर बोलत असतो व त्याला चागले चुगले खाऊ पिऊ घालणारी आपली पत्नीच कशी जबाबदार असते हे सागत असतो नाटके हिरीरीने बसवणारी मडळी एका शहरातले टाय कोटात बदिस्त रहाणारे, जरूर तर किंचितच हसणारे, सरकारी प्रशासक असल्याचे न विसरणारे प्रेक्षक तर दुसऱ्या शहरातले कलेला मनापासून दाद देणारे—उत्तेजन देणारे प्रेक्षक याच्याबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया रगून सांगत असतील तर त्या पार्टीच्या गप्पात खाद्यपेयावर मनापासून ताव मारणारे, आपली फिगर जपायची म्हणून तोलून मापून तुकडे बशीत घेणाऱ्या स्त्रियांची प्रच्छन्न स्तुती वा हसत हसत टिंगल करणाऱ्या अशा हरतऱ्हेच्या व्यक्ती भेटतात चविष्ट माणसाला खायला मिळते तसे माणसाचे जीवन पहायची आवड असणाऱ्याना मानवी नमुने पहायला मिळतात एखादा तथाकथित आतरराष्ट्रीय तज्ञ व एखादा आफ्रिकेतल्या छोट्या देशाच्या अध्यक्षाचा सल्लागार म्हणून काही दिवस काम केलेला उगाच मोठेपणा मिरवीत, भाव खात, काहीतरी खास सांगत असल्याचा भाव आणून साध्याच गोष्टी बोलत असतो

पार्टी रगत रगत १०।।-११ च्या सुमारास हळूहळू मोडू लागते दुसऱ्या दिवशी कोणाला घराभोवती 'लॉन मोंअिग' करायचे असते, कोणाला साप्ताहिक धुलाई, डिशवॉशिंग, तर सगळ्यानाच शॉपिंग करायचे असते आणि एखाद्या करमणुकीच्या कार्यक्रमासही जायचे असते. जाणाऱ्यांपैकीच एखादा यजमानाला (आमच्यासारख्या बिनकारवाल्या पाहुण्याला पोचवायची जबाबदारी घेऊन) डिशवॉशिंगमध्ये बायकोला मदत

करायला सागतो. एकदरीत त्या मोकळ्या वातावरणाने व छानदार पार्टीने आपणही खूष होऊन साऱ्याचा निरोप घेतो

अशा पार्ट्या क्वचित वीक एंडला वेळ नसला तर थोडक्या स्वरूपाच्या मधल्या वारीही मोजक्याच्याच उपस्थितीत होतात पण क्वचितच कारण २५ ३० मैलांवरून माणसे यायची आणि जायची मधल्याच वारी म्हणजे तितके कठीण पडते

लोकांच्या दूर दूर रहाण्याने आणि प्रत्येक नव्या ओळखीच्या वेळी उपचार साजरे करण्याची गरज पडत असल्याने व पुन्हा आपणहून फोन केल्यास आमक्याने नाव, नबर दिलेला, मला काही मदत नकोय पण जमल्यास भेट मात्र हवीय, काम खरेच नाही, माझी सगळी सोय आहे वगैरे पटवून देत बसायचे म्हणजे नको ती कटकट वाटायची पण अशा पार्टीतून अनौपचारिकपणे ओळख वाढून एखादे आमत्रण मिळायचे, समान धागे जुळायचे वा हवी असलेली माहिती मिळून जायची माझी सुरुवातीची औपचारिक पाहणी जरी बारगळली तरी येथल्या भारतीय कुटुबाची अशी अनौपचारिक पाहणी खूप होऊन गेली त्यात मराठी, कारवारी, बिहारी, म्हैसूरी, गुजराथी वगैरे निरनिराळे भेटले एका इडियन स्टोअर्सच्या मालकानी (येथे पी एच्डी साठी आले ते सोडून आता दोन दुकानाचे मालक बनले ) दुकानापुरता खरेदीविक्रीचा व्यवहार न ठेवता, अशीच समान ओळख निघाल्यावर, तीन वेळा घरी नेऊन आग्रहाने जेवायला घातले व आणखी वेळा जमले नाही म्हणून नाराजी व्यक्त केली माणसाच्या स्वभावाची हीही एक गमत आहे की, तुम्ही ज्याची ओळख व्हावी, माहिती मिळावी म्हणून धडपडू पहाता, ते काही ना काही कारणाने (वेळ नसणे हे अमेरिकेला अगदीच ठरलेले कारण) दूर राहतात व अकल्पित वेगळेच अधिक जवळ येतात आम्हांला अर्थात आमचे पूर्वीचे मुबईतले, पुण्यातले, कऱ्हाडातले सुद्धा ओळखीचे व आपुलकीने वागवणारे भेटल्याने, सोनेरी

तुरुगातले काही तास फारच छान घालवायला मिळाले व पुढच्याही प्रत्येक आठवड्यात एकतरी असे कुटुंब भेटत राहिलेच

पण या आठवड्यातला हाच एक विशेष होता असे नव्हे तर, अधिकृतपणे तपशीलवार कार्यक्रम आखलेली (व तो पूर्ण फसून ताप झाला तरी खूप चागले पहायला मिळालेली) एक अधिकृत भेट हाही खास नमूद करण्यासारखाच अनुभव होता वॉशिंग्टन महानगरी प्रदेशाच्या सीमेवरचे दुसरे तसे अगदी जुने पण आता नव्याने पुढे येत असलेले बाल्टीमोर शहर आणि त्याची भेट संस्मरणीय ठरावी असाच तो कार्यक्रम झाला भेटीची वेळ दिलेल्या, एक सोडून सर्व व्यक्तींना वेळ नसावा असे व्हावे, आपल्या वेळी महत्वाचे काम निघावे, जेवणासाठी बऱ्यापैकी उपहारगृह न सापडता तगडतोड व्हावी साऱ्या गटाची चुकामूक व पुनर्भेट व थोडा वाद व्हावा वगैरे गोष्टींमुळे मी हे बिल्कूल म्हणत नसून बाल्टीमोर शहराच्या अभ्यासातून जी माहिती मिळाली तिच्यामुळेच केवळ म्हणत आहे

बाल्टीमोर हे अमेरिकेतले एक महत्त्वाचे शहर आहे. २०० वर्षांहून जुने आणि उत्कृष्ट बंदर तसेच लोहमार्गाचे केंद्र आहे वॉशिंग्टनच्या छायेत रहाण्याने आजतागायत त्याची थोडी उपेक्षाच झाली आपल्याकडे पूर्वी अंधेरी, मालाड, ठाणे किंवा अजून कल्याण, अंबरनाथ, वसईची होते तशीच म्हणा ना! गमत म्हणजे ते वॉशिंग्टन–न्युयॉर्क या अत्यंत महत्त्वाच्या मार्गावर बसलेले असून सुद्धा एका वॉशिंग्टन वासियाने सुद्धा चला जरा बाल्टीमोर पाहू या किंवा न्युयॉर्कला जाताना जरा थाबू या तिथे असा विचार केलेला नसतो.

आता वॉशिंग्टनमध्ये गर्दी फार झाली आहे, ऑफिसच्या जागेच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत, असे दिसू लागल्यावर निरनिराळ्या कपन्याचे, सरकारी कचेऱ्याचे लक्ष बाल्टीमोरकडे वळले आहे चार्लर्स सेंटर या त्याच्या मध्यभागात ऑफिस थाट-

ण्याचा विचार ते आता करू लागले आहेत वॉशिंग्टनमध्ये घरे, कार्यालये बांधणारे बिल्डर आता तिकडे वळले आहेत १९३० साली फार तर करमणुकीसाठी एखादा बापुडा तेथे जाई पण आता तिथे दर वर्षाला २,५०,००० चौ. फूट इतकी कार्यालया-साठी जागा बांधली जात आहे गेल्या दहा वर्षांत शहरात बराच फरक पडत चालला आहे पूर्वी वॉशिंग्टन केवळ सरकारी कर्मचाऱ्यांचे–कचेऱ्यांचे शहर होते पण अलिकडे त्यात व्यापारी, कंपन्या, व्यावसायिकांची कार्यालय, मोठी महामंडळे वगैरे येऊन विविधता येऊन खूप गर्दी झाली आहे ऑफिसच्या जागा बांध-णारे, खरेदी करणारे खूप झाले आहेत पूर्वी फक्त बांधायची व सरकारी कचेरीला भाड्याने द्यायची आताच्या या बदलाने कचेऱ्यांच्या जागांची भाडी दर चौ फूटाला वर्षाला १४ डॉलरच्याही वर गेली आहेत तर बाल्टीमोरला अजून दहा डॉलरच्या खाली आहेत सरकारी कचेऱ्यांना आणि इतरांना जागा वाढत्या क्रमाने लागते आहे (काही तज्ञांचे म्हणणे नजि-कच्या भविष्यात दहा लाख चौ. फूट जागा लागेल) वॉशिंग्टन जवळची बाहेरच्या भागातली व्हर्जिनीया व मेरीलँडकडची जागा आता भरत येऊ लागली आहे म्हणूनच शहराच्या मध्यभागी उपलब्धता असलेली बाल्टीमोरची जागा आता आकर्षक ठरत आहे येथे पांढरपेशी मंडळी उपलब्ध आहेत व शहराच्या मध्य भागात जवळ राहणे अजून तेवढेसे महाग पडत नाही शिवाय वॉशिंग्टनशी चार वेगवेगळ्या राजमार्गांनी जोडलेले आहे. वॉशिंग्टनमध्ये इमारतींच्या उंचीवर (दहा मजले) मर्यादा आहे तर येथ वीस मजल्याहून अधिकही बांधता येते

मात्र येथल्या शहराच्या जुन्या व उध्वस्त भागाचे पुनरु-ज्जीवन करताना नियोजकांनी व व्यवस्थापकांनी फारच मोठी कल्पकता दाखवलेली आहे इमारतींच्या वास्तुशिल्पातील वैविध्यापुरतीच ती मर्यादित नसून, विविध भूवापराबाबतीत-लीही आहे जुने गुदामांचे, पडीक इमारतींचे भाग साफ करून

तुरुगातले काही तास फारच छान घालवायला मिळाले व पुढच्याही प्रत्येक आठवड्यात एकतरी असे कुटुंब भेटत राहिलेच

पण या आठवड्यातला हाच एक विषेश होता असे नव्हे तर, अधिकृतपणे तपशीलवार कार्यक्रम आखलेली (व तो पूर्ण फसून ताप झाला तरी खूप चागले पहायला मिळालेली) एक अधिकृत भेट हाही खास नमूद करण्यासारखाच अनुभव होता वॉशिंग्टन महानगरी प्रदेशाच्या सीमेवरचे दुसरे तसे अगदी जुने पण आता नव्याने पुढे येत असलेले बाल्टीमोर शहर आणि त्याची भेट सस्मरणीय ठरावी असाच तो कार्यक्रम झाला भेटीची वेळ दिलेल्या, एक सोडून सर्व व्यक्तीना वेळ नसावा असे व्हावे, आपल्या वेळी महत्वाचे काम निघावे, जेवणासाठी बऱ्यापैकी उपहारगृह न सापडता तगडतोड व्हावी, साऱ्या गटाची चुकामूक व पुनर्भेट व थोडा वाद व्हावा वगैरे गोष्टीमुळे मी हे बिल्कूल म्हणत नसून बाल्टीमोर शहराच्या अभ्यासातून जी माहिती मिळाली तिच्यामुळेच केवळ म्हणत आहे

बाल्टीमोर हे अमेरिकेतले एक महत्त्वाचे शहर आहे. २०० वर्षांहून जुने आणि उत्कृष्ट बदर तसेच लोहमार्गाचे केंद्र आहे वॉशिंग्टनच्या छायेत रहाण्याने आजतागायत त्याची थोडी उपेक्षाच झाली आपल्याकडे पूर्वी अधेरी, मालाड, ठाणे किंवा अजून कल्याण, अबरनाथ, वसईची होते तशीच म्हणा ना! गमत म्हणजे ते वॉशिंग्टन–न्युयॉर्क या अत्यत महत्त्वाच्या मार्गावर बसलेले असून सुद्धा एका वॉशिंग्टन वासियाने सुद्धा चला जरा बाल्टीमोर पाहू या किंवा न्युयॉर्कला जाताना जरा थाबू या तिथे असा विचार केलेला नसतो

आता वॉशिंग्टनमध्ये गर्दी फार झाली आहे, ऑफिसच्या जागेच्या किमती गगनाला भिडल्या आहेत, असे दिसू लागल्यावर निरनिराळ्या कपन्याचे, सरकारी कचेऱ्याचे लक्ष बाल्टीमोरकडे वळले आहे चार्लस सेंटर या त्याच्या मध्यभागात ऑफिस थाट-

ण्याचा विचार ते आता करू लागले आहेत वॉशिंग्टनमध्ये घरे, कार्यालये बांधणारे बिल्डर आता तिकडे वळले आहेत १९३० साली फार तर करमणुकीसाठी एखादा बापुडा तेथे जाई पण आता तिथे दर वर्षाला २,५०,००० चौ. फूट इतकी कार्यालया-साठी जागा बांधली जात आहे. गेल्या दहा वर्षांत शहरात बराच फरक पडत चालला आहे पूर्वी वॉशिंग्टन केवळ सरकारी कर्मचाऱ्यांचे–कचेऱ्यांचे शहर होते पण अलिकडे त्यात व्यापारी, कंपन्या, व्यावसायिकांची कार्यालय, मोठी महामंडळे वगैरे येऊन विविधता येऊन खूप गर्दी झाली आहे ऑफिसच्या जागा बांध-णारे, खरेदी करणारे खूप झाले आहेत पूर्वी फक्त बांधायची व सरकारी कचेरीला भाड्याने द्यायची आताच्या या बदलाने कचेऱ्याच्या जागाची भाडी दर चौ फूटाला वर्षाला १४ डॉलरच्याही वर गेली आहेत तर बाल्टीमोरला अजून दहा डॉलरच्या खाली आहेत सरकारी कचेऱ्यांना आणि इतरांना जागा वाढत्या क्रमाने लागते आहे (काही तज्ञाचे म्हणणे नजि-कच्या भविष्यात दहा लाख चौ फूट जागा लागेल) वॉशिंग्टन जवळची बाहेरच्या भागातली व्हर्जिनीया व मेरीलँडकडची जागा आता भरत येऊ लागली आहे म्हणूनच शहराच्या मध्यभागी उपलब्धता असलेली बाल्टीमोरची जागा आता आकर्षक ठरत आहे येथे पांढरपेशी मंडळी उपलब्ध आहेत व शहराच्या मध्य भागात जवळ राहणे अजून तेवढेसे महाग पडत नाही शिवाय वॉशिंग्टनशी चार वेगवेगळ्या राजमार्गांनी जोडलेले आहे वॉशिंग्टनमध्ये इमारतींच्या उंचीवर (दहा मजले) मर्यादा आहे तर येथ तीस मजल्याहून अधिकही बांधता येते

मात्र येथल्या शहराच्या जुन्या व उध्वस्त भागाचे पुनरु-ज्जीवन करताना नियोजकांनी व व्यवस्थापकांनी फारच मोठी कल्पकता दाखवलेली आहे इमारतींच्या वास्तुशिल्पातील वैविध्यापुरतीच ती मर्यादित नसून, विविध भूवापराबाबतीत-लीही आहे जुने गुदामांचे, पडीक इमारतींचे भाग साफ करून

एका विशिष्ठ वास्तुशिल्प समूहाकृतींचा आराखडा बंदराभावतालच्या जागेसाठी तयार करण्यात आला जमिनी घेऊन इमारती बांधणाऱ्यांनीही कल्पकता वापरली आहे कार्यालये, निवास, करमणूक केंद्र, क्रीडांगणे, उद्योग संग्रहालये, प्रेक्षागृहे, तारागणदर्शक, मत्स्यालय संशोधन केंद्र, उपहारगृहे, हॉटेल्स, परिषदा भरविण्यासाठी भवन वगैरे अनेक तऱ्हेचे भूवापर व इमारती तिथे आणल्या आहेत प्रचंड प्रमाणावर बांधकामे चालू आहेत. शहराच्या केंद्र भागात आणि बाह्यभागातहि बरी बांधकामेहि अद्यावत पद्धतीने होतात, म्हणून पाडापाडी वा बांधकामाचा इतराना त्रास न होता त्या भागातल्या घडामोडी, व्यवहार अप्रतिहत चालू रहात असतात अगदी थोडी सरकारी गुंतवणूक करून खूप मोठी गुंतवणूक खाजगी क्षेत्रातून आकर्षित करण्यात आली आहे. भूवाटपासाठी खास निकष निर्माण करून अंतिम निर्णयासाठी लॉटरी तत्वाचा वापर करण्यात येतो जवळच्या अगदी पडक्या व सांगाडारुपी घराच्या भागाचे वन डॉलर स्कीम ' आखून खाजगी प्रयत्नांनी पुनरुज्जीवन घडवण्यात मोठेच यश मिळवलेले आहे ओसाड व टाकून दिलेले जुनाट विटांचे सांगाडे अशा अनेक इमारती होत्या त्या १ डॉलरला घर घ्या, पांच डॉलरला दुकान घ्या असे देऊ करून तशा दिलेल्यांना स्वतःच्या पैशातून पुनर्रचित करायला लावून (फक्त काही वर्षे पुनर्विक्रीवर बंधन ठेऊन) त्यांचे आकर्षक भागात नूतनीकरण करण्यात आले आहे– येत आहे

वास्तुशिल्प म्हणून आराखडा म्हणून ऐतिहासिक वास्तूचे पुनरुज्जीवन म्हणून कलात्मक इमारती म्हणून अशी विविध प्रकारची पारितोषिके या भागाने १९६४ पासून १९७९ पर्यंत दरवर्षी मिळवलेली आहेत हेही विशेषच म्हणायचे बाल्टीमोरच्या उपनगरातही नगरात नवे नगर सारखे प्रकल्प उभारून नव्या वास्तुशिल्पाकृतींचा समुहाचा, प्रयोग करण्यात येत आहे

अशा अनेक गोष्टी तेथे पाहायला मिळू शकतात. विख्यात विद्या-केंद्रही ते आहेच

ते पाहून वॉशिंग्टनकडे आमची बस परत वळली तेव्हा आपल्या कल्याण, अंबरनाथ, खडकी, तळेगाव, भोर, दौंड सारख्या ठिकाणी आपल्याला असे साधता येईल का कधी? एवढाच विचार माझ्या मनात घोळत राहिला या आठवड्याने आपल्याला माणसे आणि त्यांचे प्रयत्न या प्रांतात कितीतरी दाखवले असे वाटत होते

❋ ❋

प्रकरण : ६

# स्मारके आणि संग्रहालयांचे शहर

वॉशिंग्टन मधली स्मारके आणि सग्रहालये एखाद्याने तपशील-वार पाहायचे ठरवले तर त्याला त्याचा अर्धा जन्म तरी पुरेल की नाही कोणास ठाऊक फार जुना इतिहास नसलेला देश आपला इतिहास स्वत च लिहीत असतो आणि सस्कृती पण स्वत निर्मीत असतो वॉशिंग्टनमधली स्मारके ही तशी फार थोर माणसाची आहेत यात शकाच नाही जॉर्ज वॉशिंग्टन, लिंकन, जेफरसन, केनेडी—वगैरे नावेच पाहा ना पण काही झाले तरी त्याचा इतिहास हा तसा ताजाच आहे पण त्यापुढेही चित्रकला, शिल्पकला, ऐतिहासिक वास्तू, शास्त्रीय शोध, विमान आणि अग्निबाणाच्या युगाचे दर्शन घडवणारे, अशा अनेक वस्तुसग्रहालयाचे मोठे जाळेच वॉशिंग्टन शहरात विणले गेले आहे, जाते आहे. शिवाय अमुक इमारत अमक्या धाटणीची म्हणून तिचा पुनर्जन्म घडवून सरक्षित करण्यात आली आहे वगैरे पाट्या लावलेल्या इमारतीही जागोजाग दिसतातच (घरोघरीहि शोभेच्या वस्तू मोठ्या आवडीने खरेदी करून माडलेल्या असतातच ) म्हणून वॉशिंग्टन हे तसे सरकारी कार्यालयाचे शहर आहे असे म्हणणे अधिक युक्त ठरेल आपल्या पुण्यात माणसे जशी सस्था काढण्यात पुढाकार घेतात तसा येथे अशा सास्कृतिक,कलात्मक वास्तू उभारण्यात घेत असली पाहिजेत अगोदर शहराच्या आराखड्याच्या नियोजकानेच त्याला एक 'क्लासिक' एक आर्ष पार्श्वभूमी निर्माण करून ठेवली आहे.

निरनिराळया रुद रस्त्याच्या छेदन बिंदूवर महत्त्वाच्या इमारती वा सुंदर स्थळे असणे, रुंद मार्गांना खास अभिजात शैलीतल्या इमारतींनी दुतर्फा सजवणे हा त्या आराखड्याचा प्राणच तेव्हा त्या तशा बांधल्या जाणे व नव्या वास्तुशिल्पाने त्याच सरचनेत आपला ठसा उमटवण्याचा प्रयत्न करण ओघानेच आले

आल्यापासून विविध कामात आणि कार्यक्रमात गुतल्याने स्मारके व संग्रहालये जरा सवडीने पाहू असे मी ठरवत आलो होतो. पण निम्मा मुक्काम सरत आला तरी अमुक पाहिलत का? विचारले गेले की अजून नाही बुबा असे सागणे जिवावर येऊ लागले व बाल्टीमोर सहलीनतरचा व त्यानतरचाही शनिवार रविवार त्यासाठी खर्च करायचेच असे ठरवले होते व तसे जमूनही आले

सुरुवात सकाळी ११ वाजता व्हाईट हाऊस, हे अमेरिकेच्या अध्यक्षाचे निवासस्थान, पहाण्यापासून झाली छोटी व सुबक वास्तू आजूबाजूला मोठी प्रचड बाग, आतल्या हिरव्या तांबड्या, निळ्या खोल्या व शिस्तीने एका बाजूने पाहात पाहात दुसऱ्या बाजूने बाहेर पडणे हा सर्व अमेरिकन प्रवाशाचा वॉशिंग्टनला आल्यावर करण्याचा कार्यक्रमच असावा कारण रांगेतले सर्व बाहेरगांवचेच असल्याचे त्याच्या बोलण्यावरून जाणवत होते कॅपिटॉल ही तशी भव्य वास्तू आहे. पण व्हाईट हाऊस तसे फार प्रचड वाटत नाही. त्या मानाने दिल्लीचे राष्ट्रपती भवन केवढे तरी प्रचड आहे पण ते बांधले परकीय सरकारने वसाहतीच्या पैशातून इथे स्वत च्याच पैशातून बांधल्यावर ते उगाच प्रचड कशाला बाधतील हा एकाने केलेला अदाज–खुलासा मला तरी पटला तरीही व्हाईट हाऊसमध्ये १३२ खोल्या, ३१ स्नानगृहे व पुढचा काही भागच प्रवासी पाहू शकतात हे लक्षात घ्यायला हवे. समोरचा लफायट पार्कही पहायलाच हवा असा आहे. कॅपिटॉल या वास्तूपासून साधारणत

वॉशिंग्टनची सहल, प्रवासी सुरू करतात तिच्या बांधकामाचा आणि तिच्यात घडून आलेल्या बदलाचा अमेरिकन लोकशाहीच्या प्रवासाचा इतिहासही मनोरंजक आहे १७९३ साली बांध-कामाला सुरुवात झाली व १८२७ साली पुरी झाली त्यात १८१४ साली लढाईत ब्रिटीश लष्करी शिपायांनी काही भाग जाळलाही होता सध्याही तिच्यात वाढ करणे, जुन्या भागाची दुरुस्ती करणे याबद्दल वाद असून त्यावर निर्णय घेणे कठीण होऊन बसलेले आहे उंच असा लोखंडी २८७ फूट उंच घुमट व त्यावरील 'स्वातंत्र्याचा पुतळा', दोन बाजूचे दोन देखणे व वैशिष्ट्यपूर्ण वास्तुशिल्प असलेले भाग; हे खूप दूरवरून दिसत असतात समोरची सुप्रीम कोर्टाची व लायब्ररी ऑफ काँग्रेसच्या इमारतीही वैशिष्ट्यपूर्ण आहेत व एकेकीत निदान एकेक दिवस तरी घालवावा लागेल नीट पहायचे तर. थोडेसे दूर असलेले लोहमार्गाचे मुख्य स्थानक युनियन स्टेशन व तेथून होणारे कॅपिटॉलचे दर्शन यानाही प्रवाशाने चुकवायचे नसते.

व्हाईट हाऊस जवळचे एपिस्कोपल चर्च हे राष्ट्राध्यक्षांचे चर्च, तर ब्लेअर हाऊस हे शाही पाहुण्याचे निवासस्थान, यांचेही थोडक्यात दर्शन व्हाईट हाऊसला भेट देणारे प्रवासी घेतात. त्याचप्रमाणे जवळची ट्रेझरी बिल्डिंग—विशेषत तिच्यात ठेवलेल्या ५ लाख डॉलरच्या सोन्याच्या चिपाचे दर्शन स्वत च्या हाताने व्हाईट हाऊसची मुद्रा उमटवून नाणे तयार करवून घेण्याची सोय असलेले हे यंत्र व इतर प्रदर्शनीय वस्तूही इतर प्रवाशासारख्या आम्हीही पाहून घेतल्या

तिथून आपण सरळ मागच्या माळाच्या मध्यभागी असलेल्या वॉशिंग्टनच्या स्मारकाकडे आपोआपच खेचले जातो सरळसोट आणि प्रचंड—जितके मानवी प्रयत्नातून उभारणे शक्य आहे तितके—असे उभारलेले हे ५५५ फूट उंचीचे स्मारक म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टनच्या सच्चारित्र्य आणि उच्च आदर्श या गुणाना वाहि-

लेली श्रद्धांजलीच मानली जाते १८३३ तो बांधण्याचे प्रयत्न खाजगीरीत्या सुरू झाले रॉबर्ट मिलने त्याचा आराखडा बनवला होता काम १५३ फुटांवर आल्यावर १८५४ थाबून राहिले, मग सरकारने १८८० साली सुरू करून १८८५ साली पुरे केले. संपूर्ण संगमरवरी दगडाचे असून ११,८७,७१० डॉलर्स त्यावर खर्च झाले होते पूर्वीची वाफेवर चालणारी लिफ्ट काढून आता विजेवर चालणारी बसवलेली आहे ती ७० सेकंदात उंची गाठते त्याला लोखंडी जिनाही असून ८९७ पायऱ्या आहेत आतल्या भिंतीवर व्यक्ती, संस्था शहरे, प्रांत आणि राष्ट्रांचा उल्लेख कोरून ठेवण्यात आला आहे

भेट घ्यायला येणाऱ्याला अर्धा पाऊण तास रांगेत बसावे लागते तिचीही व्यवस्था अशी आहे की प्रथमच आपण एक पुरी प्रदक्षणा स्मारकाला घालतो, ही कल्पनाही मोठी छान आहे. वरून खिडक्यातून दिसणारा संपूर्ण वॉशिंग्टन शहराचा देखावा पाहून आपण अगदी चकित होतो, कारण असा शहराचा मोठा देखावा रस्त्यावर चालताना दहा वा ४–५ इमारतींमधून आपल्याला कधीच पाहायला मिळू शकत नाही सार्‍या वैशिष्ट्य-पूर्ण इमारती व त्यांचे समूह, महत्त्वाचे रस्ते, प्रयत्नपूर्वक वाढ-वण्यात येत असलेली झाडे, वळणे घेत जाणाऱ्या पोटोमॅक व अना-कोस्टिया नद्या आणि त्याच्यावरचे अनेक पूल व एकूणच परि-सर याचे उंचावरून घडणारे दर्शन अगदी लक्षात राहून जाते खाली उतरल्यावर आपण कोठेतरी जवळपास सँडविचेस, आई-स्क्रीम यांनी थोडीशी पोटपूजा करतो व जवळपासच्या त्रिकोणा-तल्या सरकारी इमारतींच्या समूहातली आर्काईव्हज वा दुसरी संग्रहालये यांच्याकडे वळतो त्या पाहून पाहून आपण थकून जातो व उत्साह असला तरी घराकडे वळायचेच ठरवतो

इतर स्मारके थोडी दूरवर आहेत व एका दिवसात पहायची तरी गाडीनेच हिंडावे असे आम्ही ठरवले होते सर्व स्मारकाची

भेट गुफणारी एक टूरमोबिलही आहे साडेचार डॉलरचे तिकीट काढलेले असल्यावर कोठल्याही स्मारकापाशी सुरुवात करावी, पुढच्या ठिकाणी उतरावे, मनसोक्त पाहावे, पुढे येणाऱ्या टूरमोबिलने आणखी पुढच्या स्मारकाकडे जावे पण या सोयीवर अवलबून राहाण्यापेक्षा अधिक चागले तर स्वत.जवळच कार असावी आणि तसा योग पुढच्या साप्ताहिक सुट्टीला आलाच पुण्याचा वीरेंद्र रानडे आपल्या आईला घेऊन आपल्या गाडीतून आमच्याकडे आला आणि पुढचा सगळा वेळ आम्हाला स्मारके आणि शॉपिंग सेंटर्स याची टूर करायला मोकळाही मिळाला, पावसानही फार अडवले नाही आणि एकदाच सोडले तर प्रत्येक स्मारकाच्या जवळ गाडी उभी करायला जागही मिळत गेल्या

त्या दिवशीची सुरुवात केनेडीच्या स्मरणार्थ उभारलेल्या तीन नाट्यगृहाच्या केनेडी सेंटरने केली ऑन केनेडी सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस हे शिवाय राष्ट्रीय सास्कृतिक केंद्रही आहे त्यासाठी देशातल्या आणि परदेशातल्या कितीतरी व्यक्ती, सस्था, सरकारे यानी देणग्या दिलेल्या आहेत वस्तू दिलेल्या आहेत वर्षभर तेथें कार्यक्रम चालूच असतात निराळी प्रेक्षागृहे आणि वरच्या छपरावरील भेटीसाठी कडक्टेड टूर्सही असतात इमारतीचा दर्शनी भाग थोडासा दिल्लीतल्या अमेरिकन वकिलातीच्या इमारतीसारखा आहे ग्रँड फॉयरमधला केनेडींचा पुतळा, शिल्पकलेत रस असणाऱ्याने पाहायलाच हवा या इमारतीच्या बाहेर पडताच दुसरी एक वैशिष्टचपूर्ण वास्तू दिसू लागत व आपोआपच प्रवासी ती इमारत कोणती, उत्तर येते अहो, तीच प्रसिद्ध वॉटर गेट इमारत ! तिची इतर प्रसिद्धी कशासाठीही असो, इमारतीचे दर्शन तिची अतर्बाह्य रचना खरोखरच वैशिष्टचपूर्ण आहे वलयाकृती आणि सरळ रेषानीही तिची गुतागुत मोठी मजेदारपणे दाखवली आहे

केनेडी सेटर व जवळचा भाग पाहून आम्ही जवळच्याच आर्लिंग्टन मेमोरियल पुलावरून पलीकडे आर्लिंग्टन सिमेटरी व

त्यातली केनेडींची समाधी पहायला गेलो अधिकृत वा खाजगी प्रवासीही येथे त्या थोर, दूरदृष्टीच्या व उच्च आदर्श जपू पाहणाऱ्या अमेरिकन अध्यक्षाच्या मालिकेतल्या केनेडींच्या समाधीला भेट देताच व आपले पुष्पचक्र, फुले वा दोन अश्रू वाहून जातात जवळपास इतर अनेक लष्करी व इतर अमेरिकनांच्या समाध्यांच्या रांगाच्या रांगा आहेत– शिस्तीत मुक्तिदिनाची वाट पाहात पहुडलेल्या ।
आर्लिंग्टनहून बाहेर पडताना एक वळण चुकीचे घेतल्याने, संपूर्ण पेन्टगॉन व इतर जवळच्या भागाला संपूर्ण फेरी घालावी लागून मगच मूळच्या ठिकाणी येता आले अर्थात त्यामुळे अमेरिकन रस्त्यांच्या गुतागुतीच्या रचनेचे व पेन्टॅगॉनसाठी असलेल्या प्रचंड पार्किंग तळाचे दर्शन घडले नंतर तिथून लिंकनच्या स्मारकाकडे आलो

लिंकनचे स्मारक त्या व्यक्तीसारखेच भव्य दिव्य, उदात्त बांधले गेले आहे आर्षकालीन देवळासारखी (ग्रीकांच्या) आयताकृती इमारत आणि तिचे छत्तीस आर्यानिक पद्धतीचे स्तंभ, उंच चढून जायच्या पायऱ्या, त्यावेळच्या छत्तीस प्रांताची नावे, व खालच्या भागावरच्या आजच्या पन्नास प्रांताची नावे, आतली भिंतीवरची त्यांची भाषणे व माणसावर पूर्ण प्रभाव टाकणारा उंचावर बसवलेला तो पुतळा म्हणजे सारेच एक उत्कृष्ट स्मारक आहे यात शंका नाही बाजूच्या बुटक्या वृक्षराजीतून ठोसपणे वर जाणाऱ्या व प्रमाणबद्ध व चौकोनी आकृतीच्या, निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर दिसत राहाणाऱ्या इमारतीकडे पुन्हा पुन्हा पाहावेसे वाटते म्हणूनच आम्ही मोकळ्या जागातून व नदीकिनाऱ्याने थोडे फिरत फिरत आणखी काही वेळ घालवून मगच जेफरसन स्मारकाकडे गेलो, तो नदीकिनारा व पलीकडचा इमारत समूहही मन तेथेच गुतवून ठेवणाराच आहे

जेफरसन स्मारकाची वास्तू गोलाकार व पुढे आयताकृती अशी असली तरी त्याच धर्तीची आहे व आतला संपूर्ण उभा पूर्णाकृती १९ फूट उंच पुतळा व त्याचा आसमंत काही प्रमाणात जेफर-



... ग्रंथ संग्रहालय ...
६३७
प्र. क्र. २४००४३
२३।१०।५३

सनच्या स्वतःच्या डिझाइनच्या कल्पनावर आधारीत आहे म्हणतात· जेफरसन आपला स्वतःचा स्वातंत्र्याच्या घोषणेचा मसुदा वाचत असल्याचे शिल्पही आतल्या बाजूला आहे

या स्मारकाजवळील पाण्याचे तळे, थोडी झाडी व शात रस्तेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत

स्मारकानी भव्य-दिव्य परिणाम घडवल्यावर आम्ही सग्रहालयांच्या भागात शिरलो आणि इतक्या सग्रहालयाना पूर्ण वेळ नीटपणें पाहाणे शक्य नाही या जाणिवेने इतिहास व तत्र सग्रहालय थोडा वेळ पाहून (तेथेही खूपच पाहण्यासारखे असले तरी) मुख्य आकर्षण 'एअर अँड स्पेस म्युझियम' त्याच्याकडे वळलो तीन फेऱ्या मारल्यावर. परत फिरण्याचा विचार करू लागलो तेव्हा दूरच्या भागात गाडी उभी करायला जागा मिळाली

या सग्रहालयात विमानाच्या मूळ सागाड्याच्या इतिहासापासून अद्ययावत् विमानाचे, अग्निबाणाचे, चाद्रयानाचे आणि कितीतरी तत्सम गोष्टीची मॉडेल्स, फोटो,प्रचड चित्रे, दूरवाणीवरून माहिती मिळविण्याच्या सोयी, छोटे मोठे चित्रपट, स्वत हाताळून विमानात बसल्यासारखे वाटणाऱ्या फिरत्या वस्तू अशा कितीतरी वस्तू टागलेल्या, चिकटवलेल्या, उभ्या केलेल्या, खाली ठेवलेल्या आहेत उपाहारगृहातले पदार्थसुद्धा फ्रीझ ड्राईड–कोरडे आईस्क्रीम व अशा गमतीदार वस्तू ठेवते पुस्तके, खेळणी, स्टॅम्प्स, सारे हवा व आकाशाशी सबधित, पतग तर किती तऱ्हेचे विकायला ठेवलेले की, आपण थक्क होतो. विमान समोरून उडत येत असलेले रगीत चित्र तर आपल्याला क्षणभर गुतवून–घाबरवून टाकते, इतके अस्सल आहे तेथला ४५ मिनिटाचा ४० फूटी पडद्यावरचा सबध जग त्यातली गावे, जगले, मानवी व्यवहार वगैरे दाखवणारा खास चित्रपट तर चित्रपट कलेचा उत्कृष्ट नमुना, कळस ठरणारा असाच आहे. या चित्रपटाचे तिकीट आगाऊ २–४ तास काढावे तेव्हाच मिळते. अर्थात तो दिवसभर चालू असतो·

असे हे सुरेख वस्तुसंग्रहालय आणि तो चित्रपट पाहिल्यावर इतर कुठच्या संग्रहालयातून साधी पेंटिंग्ज, पुतळे, स्मारके वगैरे बघण्यातून आपले मनच उडते घरी जाऊन याच संग्रहालयावरती आपण खूप बोलत रहातो, तेथे विकत घेतलेल्या वस्तू, खेळणी, पुस्तके, स्टॅम्प्स आपण पहात रहातो व आपला तो दिवस संपून जातो

वॉशिंग्टन व परिसरात स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूट, हर्शहॉर्न म्युझियम, लिंकन म्युझियम, नॅशनल गॅलरी ऑफ आर्ट, ग्रेट फॉल्स ऑफ द पोटोमॅक, चेसपीक व ओहिओ कॅनॉल, रॉक क्रीक पार्क, कार्टरबॅरन, ॲंफिथिएटर, फ्रॅंकिस्किअन मोनास्टरी, नॅशनल श्राईन ऑफ इम्मॅक्युलेट कन्सेप्शन, वॉशिंग्टन कॅथेड्रल, वॉशिंग्टन टेंपल, नॅशनल झुऑलॉजिकल पार्क, आर्बरेटियम, मरीन कोअर मेमोरिअल, जॉर्ज वॉशिंग्टन मेसॉनिक, नॅशनल मेमोरिअल, माऊंट व्हर्नन, वूडलॅंड, प्लॅंटेशन व इतर कितीतरी गोष्टी पहावयाच्या आहेत व पहाव्या वाटतात केव्हातरी जाता–येता कोणीतरी दुरून दाखवूनही ठेवत असते, पण आपण आता सरळ वर्तमान काळात जगायचे ठरवल्यापैकी शॉपिंग सेंटरमध्ये कपडे, आकर्षक वस्तू धुंडाळण्यात स्वतःला हरवायचे, नाहीतर जॉर्ज टाऊनमधले प्रसिद्ध आईस्क्रीम खात रस्त्यावर भटकायचे आम्ही ठरवले. व खरोखरीच तोच ठराव अंमलात आणून उरलेल्या सप्ताहात मजेत घालवून टाकला.

* *

प्रकरण : ७

# न्यूयॉर्ककडे झेप

वॉशिंग्टनमध्ये अभ्याससत्रासाठी आल्यापासून, इतर काही प्रेक्षणीय स्थळे बघायला मिळतील काय ? या प्रश्नात मुख्य विचार न्यूयॉर्कचा होता लॉस एंजेलीस, सान फ्रान्सिस्को, शिकागो, डेट्रॉईट, फ्लोरिडा व इतर अनेक नावे असली तरी न्यूयॉर्कचा सर्वात अग्रक्रम होता, या अभ्याससत्रात आपण विकसनशील देशाचा विचार करणार आहोत.अमेरिकेत त्यासाठी फार पहायला पाठवणार नाही फारतर जवळचे बाल्टीमोर पहायला मिळेल असे सुरवातीलाच सांगून टाकण्यात आले त्यातच सुट्ट्या अगदी च कमी व लांबच्या ठिकाणी पहाण्यापेक्षा जाण्यायेण्यातच अधिक वेळ लागणारीच सगळी स्थळे होती, तेव्हा स्वतः जाणे थोडे कठीणच होते. पण न्यूयॉर्क तरी त्यानी दाखवावे असे आम्हीं म्हणत होतो पण, मोठी शहरे सगळ्याच देशात आहेत, शहराच्या नियोजनावर, व्यवस्थापनावर न्यूयॉर्कमधल्या प्रयोगाचा कळत न कळत प्रभाव पडत असतो, वगैरे मुद्याना दाद दिली जात नव्हती आणि एक दिवस सांगायला लागले न्यूयॉर्क ही तुमच्या दृष्टीने काशी किंवा मक्का आहे म्हणता ना ! (सगळेच एक सुरात ओरडले होय ! होय ! आता नक्कीच आपली न्यूयॉर्कची भेट ठरवताहेत या आशेने) पण पुढचे वाक्य ऐकून आम्ही गार झालो हे बघा पुण्यक्षेत्री गेल्याचे पुण्य केव्हा मिळते ठाऊक आहे ना, त्यासाठी स्वतः कष्ट करावे, श्रम करावे, स्वतःचा पैसा खर्च

करावा तेव्हाचा! तेव्हा आता तुमची तुम्हीच सहल ठरवा फार तर आम्ही बस, हॉटेल वगैरे ठरवून देऊ हे असे आमच्यावर सोडून दिल्यावर काय होणार कोणी पाहून आलेले, कोणी तेथे नातेवाईक असलेले वा कारने जायची सोय असलेले, कोणी विमानानेच जावे की रेल्वेने असला नुसताच काथ्याकूट करणारे, एकूण काय दोन आठवडे नोटीस लावून ठेऊनही, पुरेशी सख्या जमेना व बस आयोजित करतो म्हणणाऱ्यानीही नाद सोडून दिला व जायचे त्यानी स्वत जावे असे सागून टाकले गेले झाले, ज्या थोडयाफार जणाना जायचे होते त्यानी रेल्वे स्वस्त पडते का बस ? वेळ कसा वाचवता येईल, मित्र, नातेवाईकाकड सोय होईल का वगैरेची चाचपणी सुरू झाली आम्हाला दोन भक्कम आधार होतेच श्री व सौ. गाडगीळ आणि डॉ व सौ मुळगुड याचे त्याच्याशी सपर्क साधून 'लॉग वीकएन्ड'च्या तारखाची निश्चिती कळवून टाकली रेल्वेची तिकीटे मिळाली तर ठीक नाहीतर ग्रेहाऊड बसने जायचे हेहि ठरवून टाकले आणि प्रवासासाठी आणि तेथे काय पहायचे यासाठी सूचना, माहिती गोळा करायला सुरुवात झाली सिर्कन या आमच्या प्राध्यापकानी न्यूयॉर्कवर मोठे थोरले व्याख्यानच दिले, शिवाय एकदोन ताज्या वर्तमानपत्री लेखाच्या झेरॉक्स प्रतीही वाटल्या एकदरीत तयारी जोरदार सुरू झाली होती

वॉशिग्टन ते बोस्टन या अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील अरुद व ७१९ कि मी लाबीच्या किनारपट्टीत केवळ २ टक्के क्षेत्रात अमेरिकेची २० टक्के लोकसख्या सामावलली आहे या पट्टीच्या उत्तर भागात बोस्टनच्या जवळच न्यूयॉर्क वसलेले आहे वरच्या बाजूने पश्चिमेकडे जाणाऱ्या दुसऱ्या अशा मैदानी पट्टयाचा डेट्रॉईट व एरी तळ्यापर्यंत खरा लाभ न्यूयॉर्कच्या जलद वाढीला कारणीभूत ठरलेला आहे. या भागातून न्यूयॉर्कपर्यंत कालवा खोदण्यात (१८२५साली पुरा झालेला) आल्यामुळे त्यातील वाहतूकीच्या सोयीमुळे वाहतुकीचा

खर्च एक दशांशापर्यंत खाली आला पूर्वी बोस्टन आणि फिलाडे-ल्फियापेक्षा लहान व कमी महत्त्वाचे असे न्यूयॉर्क बंदर त्या कालव्या-मुळे व नंतर रेल्वेमुळे महत्त्वाचे ठरले, थेट मिसिसिपीपर्यंत वाहतूक होऊ लागली सुरुवातीला निर्यातच खूप होत, असे म्हणून जहाज कंपन्या परतीच्या प्रवासात कमी दरात प्रवाशांना आणीत त्यामुळेच स्थलांतर करणाऱ्या प्रवाशांचे लोंढेच्या लोंढे न्यूयॉर्क-मध्ये येऊ लागले. न्यूयॉर्क बंदराचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन फिलाडेल्फिया, बाल्टीमोर वॉशिंग्टन येथूनहि अंतर्भागाकडे कालवे सुरु करण्याचे प्रयत्न झाले, फिलाडेल्फियाचा कालवा डोंगरांच्या रांगेपर्यन्त जाऊन अडला मग तेथून रेल्वेची सोय झाल्यावरच, फिलाडेल्फियाचा व्यापार जरा वाढू लागला पण एकूण न्यूयॉर्कने जी घोडदौड सुरु केली, ती इतर कोणालाच शक्य झाली नाही अमेरिकेच्या या भागाला 'मेल्टिंग पॉट', म्हटले जाते व त्यात न्यूयॉर्क हेच महत्त्वाचे ठिकाण आहे वर्षानुवर्षे, अनेक देशातून अनेक प्रकारचे लोक येत राहिले आहेत व त्यांना ठोकून-ठाकून किंवा शिजवून 'अमेरिकन' बनवणारी ती भट्टीच आहे असे मानले जाते

पश्चिमेकडील भागातल्या वाढत्या कारखानदारीच्या आणि सुपीक प्रदेशातल्या पिकाच्या वाढत्या व्यापारानेही न्युयॉर्कचेच महत्त्व वाढते ठेवले डेट्रॉईटमधल्या मोटारी व पिटसबर्गमधले पोलाद न्युयॉर्कच्या वाढत्या महत्त्वाला, गगनचुंबी इमारतींनाच मदत करणारे ठरले


इकडे धार्मिक (परमेश्वराची निर्वेध पूजा करता येईल म्हणून), राजकीय मते इतरांना मान्य नसणारे वा लोकप्रिय नसलेले दारिद्र्याने गांजलेले साहसी, बदमाश, अतिसाधे, सद्गुणी, बाध-कामे कते, खडयाळू असे साऱ्याच प्रकारचे लोक येत राहून त्यांच्यातून अमेरिकन लोक अमेरिकन संस्कृति आणि अमेरिकन राष्ट्र निर्माण होत गेले १८१९ ते १९५५ या काळात चार

कोटीहून अधिक स्थलांतरित येथे आले आहेत व अमेरिकन बनून इतर भागात पसरत गेले आहेत.

याच प्रदेशात न्यूयॉर्क प्रांतात, न्यूयॉर्क शहर वसलेले आहे आणि त्याचा मॅनहॅटन हा महत्त्वाचा बेटाचा भाग, पूर्वीच्या रहिवाशां-कडून केवळ २४ डॉलर एवढ्या किंमतीच्या किरकोळ वस्तूंच्या मोबदल्यात मिळवण्यात आला व आज अमेरिकेच्या अर्थव्यवहाराचे केंद्र बनलेला आहे. या बेटाजवळच बंदराकडे तोंड करून उभार-लेला स्वातंत्र्य देवतेचा पुतळा हा अमेरिकेला, फ्रान्समधल्या स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी '१८८४ साली देणगी म्हणून दिला.' हातात उंच अशी ज्योत धरणारा १५१ फूट उंचीचा व आत १६८ पायऱ्या असलेला हा तांब्याचा पुतळा म्हणजे बोटीतून येणाऱ्या स्थलांतरितांना स्वातंत्र्याची ग्वाहीच देणारा ठरलेला आहे व प्रथम त्याच्या आश्वासनावर अनेक स्थलांतरित येत राहिले (अजूनही थोडे येतात) पण आता स्थलांतरावर काहीना काही बंधने असल्याने आता तो पहायला येणाऱ्यांची संख्या मोठी आहे.

न्यूयॉर्कची आजची लोकसंख्या सवा कोटीच्यावर असेल, त्याच्या सगळ्या सेवा–सुविधा नीट चालवणे, त्या गरजेनुसार वाढवणे व एकंदर शहराचा व्यवहार चालू ठेवण्यातल्या समस्या इतक्या उग्र बनलेल्या आहेत की त्या सोडवणे अशक्यप्राय बनत चालले आहे. हीच स्थिती जगातल्या इतर मोठ्या शहरांची आहे, मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास ही शहरे ही त्याच स्थितीकडे वेगाने जात आहेत वा जवळपास पोचलीही आहेत. या मोठ्या शहरांनी आपली स्वतःची काळजी घ्यावी. इतर भागातला पैसा (म्हणजे खरा कुठला ? देशात संपत्ती निर्माण तरी कोण करीत असतं हा प्रश्नही कोणी तरी विचारायला हवा ? ) तिथे काय म्हणून ओतायचा आणि वाया घालवायचा ? वगैरे सर्व प्रश्न सगळीकडेच विचारले–चर्चिले जातात. न्यूयॉर्क जेव्हा २ वर्षांपूर्वी काळोखात बुडाले होते तेव्हा त्या शहराच्या जबाबदारीचा प्रश्न

अधिक जोराजोरात चर्चिला गेला. त्यावेळी एकस पत्रात एक छोटेसे टिपण मेग ग्रनफील्ड यानी लिहिले होते व त्यात "न्यूयॉर्क शहराची अवस्था आणि तीतून बाहेर पडण्याची शक्यता" हा विषय अत्यंत स्फोटक असा बनलेला आहे असे म्हटले होते पूर्वी न्यूयॉर्कमध्ये राहिलेल्यांना, त्यातल्या त्या सुंदर रहाणीच्या आठवणी असतील पण आज मात्र घाणेरडे, असहाय्य व गोंधळ यानी भरलेली अशीच त्याची प्रतिमा बाहेरच्या लोकांसमोर तरी आहे व त्यामुळेच ते, आपले लक्ष, त्या शहराला पुनरुज्जीवित कसे करता येईल या विचाराकडे फारसे देत नाहीत आणि उलट न्यूयॉर्कमध्ये रहाणारे मात्र सरकार आणि देशाच्या इतर भागाने मदत करून न्यूयॉर्कला सध्याच्या गोंधळातून बाहेर काढलेच पाहिजे असे मत थोड्या उर्मट वाटेल इतक्या आग्रहाने मांडत असतात सरकारवर ते हृदयशून्यता असलेले मूर्खपणा करणार व नागरी-रहिवाशांचा तानुदायक ह्या करणारे अशा तऱ्हेने आरोप करीत असतात वॉशिंग्टन ही राजधानी स्वत ला सांस्कृतिक व कला क्षेत्रातल्या प्रकर्षाचे केंद्र असे मानते आणि न्यूयॉर्क, वॉशिंग्टनच्या या उच्चभ्रू राहणीच्या सोंगाला हसून आपण लीन असल्याने दाखवले एकमेकाना हसणे वा श्रेष्ठत्व दाखवणे हे प्रकार या शहरामध्ये चालूच रहातात आणखी एक गोष्ट की न्यूयॉर्क शहराचे शासन, प्रथमपासूनच साधारणपणे असमर्थ, अक्षम असलेले आणि देशाच्या संसदेतही योग्य ते प्रतिनिधित्व नसलेले असे आहे व त्यामुळेच प्रांताच्या आणि देशाच्या सरकाराकडे धावपळ करून मदतीचा हात पसरणे हा त्याच्या नशिबाचा भाग झालेला आहे न्यूयॉर्क आपल्या वेगळे पणाचेच भांडवल करीत रहाते त्याच्या समस्यांचे प्रमाण वेगळे आहे हे खरे असते पण जवळजवळ सर्वच शहराची— आपल्या समस्या सोडवून घेण्यासाठी धडपडणाऱ्याची स्थिती तीच असते त्या सोडवण्यासाठी जी काही मदत यायला हवी तीत वर उल्लेख केलेल्या निरनिराळ्या प्रवृत्तींनी अडथळाच येत असतो समस्या




न्यूयॉर्कमधील रॉकफेलर सेटर आणि रॉकफेलर प्लझामधील प्रॉमिस्थचा पुतळा

सर्वच मोठ्या कारखानदार–व्यापारी कपन्यानी आपले वैशिष्टच ठसवण्यासाठी गगनचुबी इमारती आणि आगळ्या वेगळ्या जागा निर्माण करायचा प्रयत्न केलेला आहे

फार मोठ्या उग्र असल्यावर, थोडे इथे तिथे मलमपट्टी लावून भागत नसते त्यासाठी दूरगामी उपायच करायला हवे असतात व त्याची सुरवात करणेही, वर उल्लेख केलेला वादविवादात आरोपप्रत्यारोप व मलमपट्टी उपाय करण्याच्या प्रवृत्तीमुळे हा विवाद, टाकले जात असते आणि तीच खरी दुःखाची गोष्ट आहे, दूरवर

न्यूयॉर्कच्या अशा समस्या तरी कोणत्या आहेत आणि खरोखर त्यांची स्थिती काय आहे हेही थोडेतरी माहित करून घ्यायला हवे. तरच आपल्याला म्हणजे मग मुंबई, कलकत्ता व इतर मोठ्या लोकवस्ती घातलेल्या शहरांपुढे काय वाढून ठेवले आहे त्याची थोडी कल्पना येऊ शकेल

'न्यूयॉर्क' हे झपाट्याने 'ओल्डयॉर्क' होत आहे– ते शहर वास्तवात 'जीर्ण' होत आहे असा निष्कर्ष, वॉशिंग्टन येथील अर्बन इन्स्टिट्यूटने काढला आहे त्या संस्थेच्या मते जर न्यूयॉर्कच्या झिजून गेलेल्या सार्वजनिक सेवासुविधांचे नूतनीकरण आणि पुनर्रचना करण्यासाठी करवसुलीच्या गुंतवणुकीत आजच भरपूर वाढ केली गेली नाही तर न्यूयॉर्कला फार मोठ्या समस्यांना लवकरच तोंड द्यावे लागेल. बऱ्याच वर्षांपासून अशा तऱ्हेची आवश्यक तेवढी गुंतवणूक केली जात नसून शहर दिवाळखोरही बनलेले आहे. त्या प्रकारच्या गुंतवणुकीऐवजी निर्णय घेणाऱ्या 'राजकारण्यांनी, नव्या शाळा, अग्निशामकगृहे पोलीस स्टेशन्स व इस्पितळे बांधण्याला प्राधान्य दिले पण गटारांच्या नलिका बदलणे किंवा पुलांना रंग देणे ही कामे मात्र केलेली नाहीत. शहरातले ६००० मैल लांबीचे रस्ते, १३२२ पूल व बोगदे २३० मैलांची भुयारी रेल्वे, आणि सुमारे ६००० मैल लांबीचे पाण्याचे नळ हे दुरुस्ती पलीकडच्या स्थितीत आहेत व १९७४ सालच्या आर्थिक संकटानंतर, भांडवली गुंतवणूक करण्याचे थांबलेले आहे.

बहुतेक सर्व रस्त्यांची खूप मोठी दुरुस्ती करणे आवश्यक आहे आजच्या पुनर्बांधणीच्या गतीने, सर्व रस्ते पुरे करायला १५० वर्षे लागतील वास्तवात २० ते २५ वर्षांत ते काम करणे आव-

श्यक असते, १९७७ सालच्या तपासणीत प्रत्येक दहा पूल व बोगद्यापैकी एकाला मोठ्या दुरुस्त्याची जरुरी आहे व १३ टक्याना तितक्या मोठ्या नसल्या तरी दुरुस्त्याची जरुरी आहे शहरातले सगळे रस्ते व सेवा सुविधाची अचूक माहिती देणारा तपशीलवार एकच प्रमाणित असा आराखडा सुद्धा उपलब्ध नाही प्रत्येक खात्याचा वेगळा नकाशा आपल्या पुरता असतो एखाद्या रस्त्याखाली सहा फूट व्यासाचे पाण्याचे मुख्य नळ पावसाचे आणि सांडपाण्याचे नळ, विजेच्या केबल्स, टेलिफोन आणि टेलेग्राफीच्या तारा, वाफेचे नळ, अग्निशामक दलाच्या घंटेच्या तारा आणि चापदरी भुयारी रेल्वेचे एकाहून अधिक मार्ग अशा कित्येक गुता-गुतीच्या सेवा सुविधा असतात

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या दोन बोगद्याच्या समस्येचा तातडीने विचार करणे आवश्यक आहे सगळे पाणी त्यांच्यातून वहाते व दुरुस्ती देखभालीसाठी त्याच्यापैकी एक बंद करणेही शक्य नसते कारण त्यामुळे अर्धे शहर पाण्याविना तडफडू लागेल पण बंद केल्याशिवाय आतली स्थिती काय आहे हे सांगणेही शक्य नाही गेली ४० वर्षे ते अव्याहतपणे वापरत आहेत तिसरा बोगदा बांधण्यासाठी साठ कोटी डॉलर्स पहिल्या टप्प्याकरिता आणि आणखी तितकेच, तो मॅनहाटन भागापर्यंत वाढवण्याकरता लागतील एवढा निधी उपलब्ध नसल्याने, जो काम पैसा उपलब्ध होईल त्यातून खणलेला भाग सुस्थितीत ठेवणे फक्त शक्य असते. इतर जे छोटे नळ आहेत त्याच्यासाठी प्रतिवर्षी उपलब्ध होणाऱ्या पैशातून काम केले तर दोनशे वर्षे काम चालू राहील

सध्याच्या भांडवली गुंतवणुकीचा निम्मा भाग शिक्षण, वाहतूक आणि प्रदूषण नियंत्रण याच्यावर गेली दहा वर्षे खर्च केला जात आहे भावी काळात हा खर्च दहा टक्यावर आणून साठ टक्के खर्च हा पाणी, सांडपाणी याचे नळ, राजमार्ग आणि पूल याच्या दुरुस्तीवर खर्च केला जावा असे नियोजकानी सुचवलेले आहे

फार मोठ्या उग्र असल्यावर, थोडे इथे तिथे मलमपट्टी लावून भागत नसते त्यासाठी दूरगामी उपायच करायला हवे असतात व त्याची सुरवात करणेही, वर उल्लेख केलेला, वादविवादात आरोपप्रत्यारोप व मलमपट्टी उपाय करण्याच्या प्रवृत्तीमुळे [illegible], टाकले जात असते आणि तीच खरी दुःखाची गोष्ट असते म्हणून, दूरवर न्यूयॉर्कच्या अशा समस्या तरी कोणत्या आहेत आणि खरोखर त्यांची स्थिती काय आहे हेही थोडेतरी माहित करून घ्यायला [illegible] आपल्याला म्हणजे मग मुंबई, कलकत्ता व इतर मोठ्या [illegible] घातलेल्या शहरापुढे काय वाढून ठेवले आहे त्याची थोडी कल्पना होऊ येऊ शकेल

'न्यूयॉर्क' हे झपाट्याने 'ओल्डयॉर्क' होत आहे— ते शहर वास्तवात 'जीर्ण' होत आहे, असा निष्कर्ष, वॉशिंग्टन येथील अर्बन इन्स्टिट्यूटने काढला आहे त्या संस्थेच्या मते जर न्यूयॉर्कच्या झिजून गेलेल्या सार्वजनिक सेवासुविधांचे नूतनीकरण आणि पुनर्रचना करण्यासाठी करावयाच्या गुंतवणुकीत आजच भरपूर वाढ केली गेली नाही तर न्यूयॉर्कला फार मोठ्या समस्यांना लवकरच तोंड द्यावे लागेल बऱ्याच वर्षांपासून अशा तऱ्हेची आवश्यक तेवढी गुंतवणूक केली जात नसून शहर दिवाळखोरही बनलेले आहे त्या प्रकारच्या गुंतवणुकीऐवजी निर्णय घेणाऱ्या राजकारण्यांनी, नव्या शाळा, अग्निशामकगृहे पोलीस स्टेशन्स व इस्पितळे बांधण्याला प्राधान्य दिले पण गटाराच्या नलिका बदलणे किंवा पुलांना रंग देणे ही कामे मात्र केलेली नाहीत शहरातले ६००० मैल लांबीचे रस्ते, १३२२ पूल व बोगदे २३० मैलांची भुयारी रेल्वे, आणि सुमारे ६००० मैल लांबीचे पाण्याचे नळ हे दुरुस्ती पलीकडच्या स्थितीत आहेत व १९७४ सालच्या आर्थिक संकटानंतर, भांडवली गुंतवणूक करण्याचे थांबलेले आहे.

बहुतेक सर्व रस्त्यांची खूप मोठी दुरुस्ती करणे आवश्यक आहे आजच्या पुनर्बांधणीच्या गतीने, सर्व रस्ते पुरे करायला १५० वर्षे लागतील वास्तवात २० ते २५ वर्षांत ते काम करणे आव-

श्यक असते, १९७७ सालच्या तपासणीत प्रत्येक दहा पूल व बोगद्यापैकी एकाला मोठ्या दुरुस्त्याची जरुरी आहे व १३ टक्यांना तितक्या मोठ्या नसल्या तरी दुरुस्त्याची जरुरी आहे शहरातल्या सगळे रस्ते व सेवा सुविधाची अचूक माहिती देणारा तपशीलवार एकच प्रमाणित असा आराखडा सुद्धा उपलब्ध नाही प्रत्येक खात्याचा वेगळा नकाशा आपल्या पुरता असतो एखाद्या रस्त्याखाली सहा फूट व्यासाचे पाण्याचे मुख्य नळ पावसाचे आणि सांडपाण्याचे नळ, विजेच्या केबल्स, टेलिफोन आणि टेलेग्राफीच्या तारा, वाफेचे नळ, अग्निशामक दलाच्या घंटेच्या तारा आणि चापदरी भुयारी रेल्वेचे एकाहून अधिक मार्ग अशा कित्येक गुता-गुतीच्या सेवा सुविधा असतात

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या दोन बोगद्याच्या समस्येचा तातडीने विचार करणे आवश्यक आहे सगळे पाणी त्यांच्यातून वहाते व दुरुस्ती देखभालीसाठी त्याच्यापैकी एक बंद करणेही शक्य नसते कारण त्यामुळे अर्धे शहर पाण्याविना तडफडू लागेल पण बंद केल्याशिवाय आतली स्थिती काय आहे हे सांगणेही शक्य नाही गेली ४० वर्षे ते अव्याहतपणे वापरत आहेत तिसरा बोगदा बांधण्यासाठी साठ कोटी डॉलर्स पहिल्या टप्प्याकरिता आणि आणखी तितकेच, तो मॅनहाटन भागापर्यंत वाढवण्याकरता लागतील एवढा निधी उपलब्ध नसल्याने, जो काम पैसा उपलब्ध होईल त्यातून खणलेला भाग सुस्थितीत ठेवणे फक्त शक्य असते. इतर जे छोटे नळ आहेत त्याच्यासाठी प्रतिवर्षी उपलब्ध होणाऱ्या पैशातून काम केले तर दोनशे वर्षे काम चालू राहील

सध्याच्या भांडवली गुंतवणुकीचा निम्मा भाग शिक्षण, वाहतूक आणि प्रदूषण नियंत्रण याच्यावर गेली दहा वर्षे खर्च केला जात आहे भावी काळात हा खर्च दहा टक्यावर आणून साठ टक्के खर्च हा पाणी, सांडपाणी याचे नळ, राजमार्ग आणि पूल याच्या दुरुस्तीवर खर्च केला जावा असे नियोजकानी सुचवलेले आहे

न्यूयॉर्कच्या दुःस्थितीची कल्पना या माहितीवरून येत असली तरी सध्या ते कसे चालते आहे याची कल्पना येण्यासाठी आणखी थोडी मनोरंजक वाटणारी आकडेवारी पहायला हवी एखाद्या सर्वसाधारण दिवशी, आतापर्यंत आकडेवारीच्या आधारावरून काय काय घडत होत असेल याचा तपशील फ्रेड सी शापीरो यानी न्यूयॉर्कमध्ये प्रकाशित केलेला आहे त्यातला अगदी महत्वाचा असा आहे

३०४ मुले जन्माला आली आणि १७९ जण मृत्यू पावले (पैकी दोन हिंसाचारामुळे) २७५ विवाहाचे परवाने दिले गेले ६५ जोडप्याची लग्ने नगरपालिकेच्या चर्चमध्ये लावली व १४९ घटस्फोटाच्या प्रकरणावर कोर्टात विचार झाला अमेरिकन नागरिकत्वासाठी २१५ अर्ज दाखल झाले शहरात ३ परिषदा (त्यासाठी ३२०० नी नावे नोंदवली) भरल्या. १६ काम थांबवा आंदोलनात १५९० जणानी भाग घेतला ५ व्यक्ति आणि एका महामंडळाने दिवाळे जाहीर केले प्राण्याना क्रूरता न दाखवता दया दाखवावी म्हणून प्रयत्न करणाऱ्या संस्थेने, शहरातल्या रस्त्यांवर १०४ प्राणी ताब्यात घेतले बंदर प्राधिकरणाच्या न्यूयॉर्क व न्यूजर्सीच्या मधील सहा पाररेषा, २४३,२९५ वाहनानी पार केल्या आणि ६४९,६३६ चालकानी टोल भरला, ९१८४३ प्रवासी आणि २०८९ वाहनानी स्टेटन व मॅनहाटन बेटामध्ये ६१ बोटीवरून अदलाबदल केली

३१३३ विमानोड्डाने किंवा अवतरणांतून १२४,९२८ प्रवासी हवाई मार्गाने आले वा गेले (तीन महत्त्वाच्या विमानतळावरून) ८९४ रेल्वे गाड्या शहरात आल्या वा गेल्या व ७०४ लोकल रेल्वे गाड्या धावत होत्या, भुयारी रेल्वेने ३,५१५,९०६ आणि बसने १,९९०,५२६ प्रवाशानी प्रवास केला.

युनोच्या मुख्यालयाला २८०८ जणांनी भेट दिली. शहरातल्या टपाल कचेऱ्यातून ३५,५७२,६१६ एवढया संख्येच्या वस्तू

हाताळल्या कचरा आल्याने ११,२६१ टन घरगुती कचरा गोळा केला १००,०००,००० कि वॅटअवर वीज वापरली गेली तर २४४,६७६,००० घनफूट गॅस आणि १०२,०००,००० पौंड वाफ वापरली गेली

पांच बँक दरोडे आठ माणसांनी घालून ८९४१ डॉलर पळवले, ९ माणसे आणि दोन ट्रक पळवले गेले, १४ बलात्कार झाले, तीन बॉम्ब-भिती दाखवण्यात आल्या, २६६ वाहनें चोरली गेली, ६७४ जणाना कोर्टाच्या आदेशानुसार अटका झाल्या

१७५० आगीच्या वर्दी मिळाल्या व ४३१ आगी विझवण्यात आल्या ११८६ खोटया होत्या १५९ बांधकामाच्या होत्या ४७ शकास्पद होत्या, अग्निशामक दलातल्या नऊ जणांना जखमा झाल्या. याशिवाय करमणुकीचे खेळ, चित्रपट, नाटके, कोर्टातले खटले, वाहतूक कोंडया, रुग्णालयातील उपचार, शाळा कॉलेजातील उपस्थिती, शेअर बाजारातील उलाढाली, वस्तू संग्रहालयाना भेटी, वर्तमानपत्राचे खप (१,९५,९००० प्रती एका पत्राच्या) बँका व इतर ठिकाणच्या बढत्या, नगरपालिकेने दिलेल्या परवान्यांच्या संख्या अशी कितीतरी आकडेवारी देऊन शिपारो म्हणतात शहरात ५० पाहुण्या, सर्वेक्षणे चालू होती माझी धरतीत तर ५१.

शहराच्या प्रचंडपणाचे, गंभीर समस्यांचे दिग्दर्शन वर दिलेल्या माहितीवरून होत असले तरी शहराच्या वाढीच्या इतिहासातल्या एका महत्त्वाच्या टप्प्याकडे लक्ष दिल्याशिवाय त्याच्या मोठेपणाची व स्थितीची खरी कल्पना येणार नाही

न्यूयॉर्कची आजची स्थिती सध्यापेक्षाही फारच वाईट होऊ शकली असती परंतु १९२४ ते १९६८ या काळात रॉबर्ट मोझेस या व्यक्तीने ( अजून ते जिवत असून ९५ वर्षांचे आहेत) न्यूयॉर्क शहरात व शहरासाठी इतक्या गोष्टी केल्या किंवा करवल्या की

इतर कोणताही गव्हर्नर, या मेयर करू शकला नाही या पुढेहि करणे कठीण वाटते सहा गव्हर्नर (त्यातले बरेच प्रसिद्ध व मोठे नावारुपाला आलेले) आणि पाच मेयर (त्यांच्या बाबतीतहि तेच, म्हणता येईल) यांच्या काळात अप्रत्यक्षपणे खरी सत्ता रॉबर्ट मोझेस यांच्या हातात व न्यूयॉर्कला त्यानीच खरा आकार दिला

न्यूयॉर्कच्या किनाऱ्यांची रेषाही त्यानी बदलली पधरा हजार एकर पाण्याखालची जमीन पुनःप्रापित केली शहरातला एकच सोडला तरी बाकीचे सगळे उभे आडवे मोठे रस्ते त्यानीच बाधले (सोळा एक्सप्रेस व, रिव्हर ड्राईव्हरची यादीच देता येईल) न्यूयॉर्क व क्वीन्स ही दोन सागरी क्षेत्रे (बरोज), बेटावर आहेत व इतर चार तशी क्षेत्रे त्या दोघाशी व एकमेकाशी पुलानीच जोडलेली आहेत मोझेस यानी यासाठी सात फार मोठे पुल (काही ७० मजली इमारती इतके उच आहेत) बाधून दिले आहेत काही मोठ्या नागरी नूतनीकरण योजना आखून, लिंकन सेंटर, न्यूयॉर्क कॉलिशीयम व कित्येक घरे त्यानी बाधवली स्टयुव्हेसेंट टाऊन व पीटर कूपर व्हिलेज ह्या दोन मोठ्या घर-बाधणी प्रकल्पातहि त्यांचा हात होता. (युनोचे मुख्यालय बाधण्यातील अडचणी त्यानीच दूर केल्या व बाधकामावर देख-रेखही केली) ६५८ क्रीडागणेही त्यानीच शहर मध्ये निर्माण केली त्यांच्या मार्गदर्शनाखाली ८६ हजार माणसानी काम करून सगळ्या मोठ्या बागांतून–उद्यानातून कितीतरी करमणूकीच्या सोयी उभारण्यात आल्या शहरातल्या कचऱ्याच्या लाबच्या लाब ट्रकच्या रांगानी आजुबाजूच्या दलदलीच्या क्षेत्रात भरणी करून जमिन व हिरवळी निर्माण करून बागा निर्मिल्या गेल्या इतर कोणत्याहि कामापेक्षा १९४६ ते १९५४ या सात वर्षात शाळा, गटारे, ग्रथालये, बदराचे धक्के, इस्पितळे किंवा पाणी साठवून धरणारी तळी अशी अनेक प्रकारची कामे फार मोठ्या प्रमाणावर बांधली गेली ती सारी रॉबर्ट मोझेस यांची मान्यता घेतल्यावरच

आणि त्यासाठी बरेच जुने भाग पाडून पुन्हा बांधले गेले शहरातल्या सर्व बांधकामाचे अग्रक्रम तेच ठरवू शकत होते. त्या चार दशकाच्या काळात शहरातून उपनगरापर्यंत पसरलेले ४१६ मैल लांबीचे पार्कवेही त्याच्यामुळेच झाले. त्यांची कित्येक कामे शहरापासून शेकडो मैल दूर नायगाऱ्यापर्यंतही होती एक मोठ प्रचंड धरण व पॉवरहाऊस आणि कितीतरी करमणुकीची स्थळे त्यांनी बांधवली. संपूर्ण देशभरच्या सरकारी उद्यानाच्या जागेपैकी ४३ टक्के म्हणजेच २५,६७ २५६ एकर एवढी सरकारी उद्याने न्यूयॉर्क प्रांतात १९६२ सालपर्यंत निर्मिली गेली होती ती मोझेस यांच्या प्रयत्नामुळेच १९४९ साली झालेल्या नागरी नूतनीकरण कायद्याचा व त्यासाठी उपलब्ध सरकारी पैशाचा पुरेपूर फायदा मोझेस यांनी न्यूयॉर्कसाठी करून घेतला।

चव्वेचाळीस वर्षे, कोणतेही राजकीय पद भूषवित नसताना शहर व प्रांतातल्या बऱ्याच महत्त्वाच्या बांधकामावर अप्रतिहत सत्ता गाजविता येणे ही मोझेस यांनी केलेली किमया आहे अमेरिकनलाच काय पण जगातला मोठा बांधकामकर्ता म्हणता येईल इतकी बांधकामे त्याच्या प्रयत्नाने प्ररणने—समतीनेच होऊ शकली मात्र त्यांनी अनेक गरिबांना नागरं नूतनीकरण व बांधकाम प्रकल्पासाठी उठवून लावले आपल्या कंपनीच्या व इतर अधिकृत पदावरच्या कामाच्या भरात व वेळात राजकीय सत्ताधीशाकडे दुर्लक्ष केले अधिकाधिक अधिकार मिळवण्याचा व काम करवून घेण्याचा झपाटा चालूच ठेवला व प्रशासन यंत्रणत गैरकारभार होत गेला त्याकडे लक्ष दिले गेले नाही अशा गोष्टींनी १९६२ नंतर १९६८ पर्यंत हळूहळू त्यांची सत्ता व लोकप्रियता दुरावत गेली

तुलना करू नये, कारण परिस्थिती वेगवेगळी आहे पण पॅरिसला तिसऱ्या नेपोलियनच्या काळात हौसमन यांनी शहरसुधारणेसाठी केलेल्या प्रयत्नांनी जे सुंदर रुप दिले (त्यासाठी ते अजूनही

प्रसिद्ध आहे व त्यापायी त्यावेळी झालेली टीका, खर्च व लोकाचे हाल दुर्लक्षिले जातात) त्याचे उदाहरण उद्धृत करता येईल. रॉबर्ट मोझेस यानीही न्यूयॉर्कसाठी इतके प्रचड काम केले आहे की ते आज आहे तसे होऊच शकले नसते असे निश्चित म्हणता येईल ट्रायबतबरो अशी आपली चौथी सत्ता (बाधकाम करणारी कंपनी निर्माण करून त्यानी कामे केली, कायद्यातल्या साऱ्या पळवाटा, इतर प्रशासनात त्या साऱ्या उणीवा याचा त्यानी उपयोग करून घेतला पण कोणाच्या पैशाचे वा कशाचे मिधे नव्हते त्यातच त्यांचे रहस्य आहे

* *

प्रकरण : ८

# न्यूयॉर्क म्हणजे एक सफरचंदी आकर्षण !

न्यूयॉर्कबद्दल माहिती कितीहि मिळाली तरी ते प्रत्यक्ष पाहिल्या वरच त्याचा खरा 'फील' आपल्याला येईल-त्याची नाडी समजेल, निदान ते पहाण्याचे कुतूहल शमले नाही तरी पाहिल्याचे समाधान मनाला वाटेल असे वाटतच राहिले व त्याला भेट देणाऱ्या दिवसाची–तासाची–मिनिटाची प्रतीक्षा सुरू झाली न्यूयॉर्कला 'द बिग ॲपल'– एक मोठे सफरचद का म्हणतात त्याचा मात्र उलगडा होत नव्हता न्यूयॉर्कच्या सर्व प्रवासी साहित्यावर, 'न्यूयॉर्क आय लव्ह यू' असे वाक्य छापलेल्या टी शर्टवरही, ते सफरचदाचे चित्र वा त्याचा उल्लेख हटकून असतोच. आपल्याला एखाद्या ताज्या रसरशीत व मोठ्या सफरचदाचा, प्रत्यक्ष घास घेण्यापूर्वी तोंडाला पाणी कशामुळे सुटत असेल, याचा शोध घेण्याचाच तो प्रकार ठरेल असे वाटत होते आपल्या त्याबद्दल अनेक अपेक्षा असतील– त्याची अचंबा उत्पन्न करणारी आकाशरेषा, हरतऱ्हेची-चवीची उपहारगृहे, हॉटेले, प्रेक्षागृहे, वस्तु-सग्रहालये, प्रेक्षणीय स्थळे, सांस्कृतिक केंद्रे, दुकानें आणि वास्तु-शिल्पाचे (नव्या–जुन्या) असख्य नमुने आणि साऱ्या जगातून मधमाशांसारखें गोळा होणारे लोक इत्यादी पहाण्याचे आकर्षण असतेच व असणारच ! पण आणखी असे म्हणतात की न्यूयॉर्क हे स्फुरण पावणारे, गतिशील, असे जगाचे एक केंद्र आहे की जे आपला चेहरा, रोज बदलत असते रोज ताजी दृश्ये, नवी रुपे,

नवनव्या मनोरजक गोष्टी,आपल्या पाचही नागरी क्षेत्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यातून दाखवीत असते त्या सगळ्यानी एकत्रित गुफळे गेलेले ते एक शहर आहे एक मोठा वेल एक मोठ उत्साहकारक शहर-साऱ्या जगात उठून दिसणारे असे आहे आणि म्हणून त्याला मोठे सफरचद ' म्हणतात म्हणे । आणि खरो-खरच ते साऱ्या प्रवाशाचे भेट देणाऱ्याचे उत्साहाने स्वागत करते आहे असे त्याना वाटायला लावते सफरचदाचे हे गुण असोत अगर नसोत (आपल्याला बुवा ते खायला वा त्याचा रस प्यायला आवडतो म्हणा) पण न्यूयॉर्क हे याचि देही याची डोळा पहाण्याची तेही प्रथम पहाण्याची गोडी न्यारीच आहे यात शक नाही त्या भेटीची वाट पहाता पहाता, एकदाचा तो २५ मेचा दिवस उजाडला त्यादिवशीही तसा भरगच्च कार्यक्रम होता सकाळपासूनच अमेरिकन मदत विभागाच्या नियोजन व गृह-निर्माण विभागाच्या अधिकाऱ्याबरोर चर्चा होती जवळ जवळ ५ वाजेपर्यन्तचा कार्यक्रम ठरलेला होता चर्चाही तशी महत्त्वाची व उपयुक्त असली तरी न्यूयॉर्कला निघणाऱ्या बसच्या वेळाकडेच होते इकडे त्या कार्यक्रमामध्येही काहीतरी गडबड होऊन आम्ही २–२।। लाच मोकळे होण्याची शक्यता निर्माण झाली यायचे होते ते अधिकारी आलेले नव्हते वरवर दिलगिरी व्यक्त करीत, मनापासून धन्यवाद देत आम्ही सारेच ककॉर्डिया अपार्टमेंटस या आमच्या निवासस्थानाकडे घाईनेच निघालो जरा लवकर निघायला तयारीही घाईनेच उरकायला पाहिजे होती, दारातूनच सौ ला सागितले, चला चला, बॅग भरा, जमले तर ४ चीच बस गाठायची आहे आणखी ७–८ जण होतेच त्यानाही फोनवरून स्मरण देत देत, कपडे बिपडे बदलून लिफ्ट मधून खाली, जमायच्या जागेकडे वळलो सगळे जमून, ग्रेहाउन्डच्या बस स्थानकावर टॅक्सीने पोचेपर्यंत, चार वाजत आले होते, सुदैवाने न्यूयॉर्कची तिकीटाची राग लहान होती व भराभर सरकत होती. पण आमच्यातलाच एक पुढे आलेला होता त्यालाच

इतर जसजसे येतील तसतसे खुणेने सांगून दोनाची चार, चाराची सहा, सहाची नऊ तिकिटे काढायला सुचवून, भारतीय बेशिस्तीच्या हुक्काने अमेरिकेतल्या शिस्तीवर मात केली व नऊ तिकीटे घेऊन नऊ जण बसच्या दारात बरोबर सुटायच्या 'टायमाला हजर झालो. पण आता आम्हाला आश्चर्याचा धक्का बसला त्या बसमध्ये आठच जागा शिल्लक होत्या व जादा एक जणाचे काय ? चालक उर्फ वाहकाने लगेच खाबावरच्या फोनवरून कोठूनतरी आदेश मागितला त्याला उत्तर आले, 'त्या नऊ जणाना थाबव, आम्ही वेगळी बस पाठवतो, तुझी पुढे जाऊ दे !' आम्ही म्हणालो, 'धन्य त्या ग्रेहाऊन्डच्या प्रवाशांच्या काळजीची आणि आपल्या व्यावसायिक कार्यक्षमतेची' कारण, आणखी दहाच मिनिटात आम्ही खास बसने वॉशिंग्टन सोडले

वॉशिंग्टनमधले परिचित रस्ते, बेन्टपर्यन्तचा मार्ग व नतर बाल्टिमोरपर्यंतचा भाग तसा वेगळा नव्हता तरी प्रवासाच्या उत्सुकतेने तो वेगळाच भासत होता. आमची जवळजवळ रिकामी बस, बाल्टिमोरमधल्या बस स्थानकावर मात्र पुरती भरून गेली तोंडातल्या तोंडात पुटपुटत वाहक साहेबानी काहीतरी घोषणा केली आणि बस आता मात्र खरोखरच न्यूयॉर्कच्या रस्त्याला लागली थोडे जगल, थोडा वस्त्याचा भाग दूरवर दिसे बस भरारा पळत होती आणि आम्ही सारे सहप्रवासी बरोबर आणलेल्या चॉकलेट-सँडविचेस वगैरेंची अदलाबदल करीत प्रवासाचा वेळ काढीत होतो. बसमध्ये निरनिराळ्या वयाची जोडपी, मुले-काळे-गोरे सर्वच प्रकारचे लोक होते पण आमच्याइतकी न्यूयॉर्कची आस इतरांजवळ नसावी ८-८॥ च्या पुढे तर अधारच झाला (इकडे या दिवसात उशीरापर्यन्त उजेड असतो) आता न्यूयॉर्कचे दिवे, विमानतळ, वगैरे दिसतील, मग दिसतील म्हणून वाटत होते; ते साधारण ८॥ च्या सुमारास दिसू लागले पण लाबवरचे दृश्य तसे आकर्षक नव्हते आणि वातावरण तर फारच धुरकट व अनाकर्षकच होते एकदरीत एका टोलनाक्यावरून



येथे येणाऱ्यांना स्वातंत्र्याचे वरदान आहे असे आश्वासन देणारा
न्यूयॉर्कजवळचा स्वातंत्र्यदेवीचा प्रचंड पुतळा

व मग बऱ्याच दिव्या-दिव्यांच्या रस्त्यांवरून अखेर न्यूयार्क पोर्ट ॲथॉरिटी वगैरे काही पाट्याच्या प्रदेशातून जाऊन जेव्हा बस एका मोठ्या बोगद्यात शिरली तेव्हा कळले की आता एकदम मॅनहाटन बेटावरच्या बस अड्ड्याजवळ पोहोचणार आणि थोड्याच वेळात तो आला पण आम्ही होतो खाली तळघरात, तेथे गडबडीने वर आलो आणि वर पाट्या पाहात पुढे शिरू लागलो. माणसेच माणसे होती सगळीकडे जवळपास लोहमार्गाचेही स्थानक, तसेच बोटींचा धक्का मग सगळीकडून माणसे येत राहाणार नाहीतर काय ! सौ गाडगीळांनी फोनवरून केलेल्या सूचनांचे टिपण मग शोधून काढले आणि आयारनडी लाईन अपटाऊन एए ट्रेन, फॉर्टी सेकंड स्ट्रीट स्टेशन असे घोकत, पाट्या पाहात, विचारत एकदाचे योग्य त्या भुयारी गाडीत पोहोचलो ८६ व्या रस्त्यावर जाते ना, ते तीन तीनदा विचारून खात्री करून मग तिच्यातल्या गर्दीत उभे झालो.

न्यूयॉर्कच्या भुयारी रेल्वेबद्दल, ती अस्वच्छ असते, गर्दी फार असते, चोऱ्यामाऱ्या होतात वगैरे ऐकले होते आता ती जुनी तर आहेच आणि स्थानकाच्या भिंती वा ती गाडी याना रंग दिला जात नाही हेही खरेच, पण ती रंगवली मात्र जाते तिच्यावर लोकांनी आपल्या चित्रकलेची अभिव्यक्ती एवढी करून ठेवली आहे की भुयारी रेल्वेतली चित्रकला म्हणून तिच्यावर परिसवाद व प्रदर्शने भरवली जातात पण एकूण आम्हाला ती बरी वाटली चांगली पळत होती व लोकांना लोंबकळावे लागत नव्हते (दारे बंद झाल्यावरच गाडी चालते मुख्य म्हणजे) व नीटपणे उभे राहाणं व जागा रिकामी झाल्यावर बसणे शक्य होते प्रत्येक स्थानकाच्या आधी घोषणा गाडीतच होत होती व बाहेरही भरपूर पाट्या प्रत्येक स्थानकावर दिसत त्यामुळे आपण बरोबर दिशेने चालल्याची खात्री होती एकदाचे '८६ वा रस्ता ' हे आमचे उतरण्याचे स्थानक आले व चपळाई करून बाहेर आलो. येथून पुढे गाडी जमिनीच्या वर येणार असल्याने

फारसे वर चढावे लागले नाही बाहेर पडल्याबरोबर गाडगीळांचा पत्ताही चटकन् सापडला घरी पोहोचून परिचय, ख्याली खुशाली विचारत, आम्ही आमचे बस्तान टाकले व न्यूयॉर्क या महाप्रचंड शहरात आलो आहोत, ते पाहायचे आहे उद्यापासून, या जाणिवेमध्येच आमचा तेथला गप्पाचा डाव जमवला शिवाय उद्याच्या कार्यक्रमाची आखणी व त्याच्यासाठी तपशीलवार सूचनाही सौ विद्याताईकडून मिळवल्या एका बसने थोडे जाऊन पुढे दुसऱ्या बसने जायचे असल्यास दीडपट भाडे (७५ सेंट) देऊन 'अॅंड अ राईड' तिकीट मागावे वगैरे सूचना त्या देत होत्या आणि इकडे मी युनोची इमारत, फोर्ड फाऊंडेशनची इमारत वगैरे पाहायच्या गोष्टींचा जप जपत होतो; झोपेची आराधना करण्यापूर्वी!

दुसऱ्या दिवशी, दिवाळीला जशी भल्या सकाळच्या प्रहरी, लहानपणी उत्साहाने उठायचे, तसे उठून, भराभर सकाळचे कार्यक्रम उरकले व ८–८।च्या सुमारास बाहेर पडलो. मॅनहाटन बेटाचा तो उत्तरेकडचा भाग बराच निवासी क्षेत्रातला व शनिवारची सकाळ तेव्हा तसा जरा पेंगुळलल्या अवस्थेत डुलक्या घेत असल्यासारखाच पडून होता पण आम्ही घाई घाईने बस स्टॉपवर येऊन बसची प्रतीक्षा करू लागलो होतो मॅनहाटन बेटावरची बस सेवा सुद्धा आम्हाला तरी चागलीच वाटली वॉशिंग्टनच्या मानाने जुनाट बसेस असल्या तरी आपल्याकडच्या किती शहर बस सेवा तर मोडकळीला आलेल्या बसेसवर चालत असतात. ही त्या मानाने चागली अद्यावतच दिसत होती त्या बसने आम्हाला ४२ व्या रस्त्यावर सोडले त्या भागात जलद सेवा–न्याहारी देणारी कितीतरी उपाहारगृह होती त्यातल्याच एकात चीझटोस्ट व कॉफीची गरमगरम न्याहारी घेऊन आमच्या त्या दिवसाच्या कार्यक्रमाची सुवारूत केली. प्रवाशांच्या भेटस्थळाच्या, कार्यालयाच्या व दुकानांच्या विभागात अशी झटपट उपाहारगृहे-तीही विविध चवीचे पदार्थ (पिझ्झा हा फारच लोकप्रिय

पदार्थ) देणारी असल्याने एक फार मोठी सोय असते खाण्यापिण्यात वेळ फार घालवावा लागत नाही (ज्याना घालवायचा असतो त्याच्यासाठी तारांकित हॉटेलातली रेस्टॉरंटस् असतातच) तेथून बाहेर पडून प्रथम व्हिजिटस ब्यूरा शोधून काढले आमच्या प्राध्यापकानी सांगूनच ठेवले होते की न्यूयॉर्कमध्ये सर्वात व्यवस्थित व नीट माहिती देणारी जागा म्हणजे पोलीस खात्याने चालवलेला तो ब्यूरो। तेथे तुम्हाला सर्व प्रकारची माहितिपत्रके, नकाशे व इतर माहिती उपलब्ध असते. ती घेऊन मग तुम्ही हवे तसे कार्यक्रम स्वत अगर बस, बोट, हेलिकॉप्टर वगैरेच्या साह्याने संस्थानी आखलेले कार्यक्रम ठरवू शकता बस मार्गांचे, भुयारी रेल्वेचे नकाशे, महत्त्वाच्या प्रेक्षणीय स्थळांची माहितिपत्रके, वगैरे गोळा करून आम्ही तिथून 'यूनो'च्या मुख्य इमारतीकडे ४२ व्या रस्त्यावरूनच जाणारी बस पकडली

बेचाळीसावा रस्ता हे न्यूयॉर्कमधले एक महत्त्वाचे स्थान आहे तो मॅनहाटन बेटाच्या गजबजलेल्या भागातून आरपार-पूर्व-पश्चिम असा जातो ग्रँड सेंट्रल रेल्वे स्थानक बऱ्याच महत्त्वाच्या इमारती व टाईम स्क्वेअर हा महत्त्वाचा चौक त्याच्या लगतच आहेत एका टोकाला बंदराचा धक्का नंतर बस टर्मिनल तर दुसऱ्या टोकाला युनोच्या इमारती आहेत बस, उंच इमारतींमुळे अरुंद वाटणाऱ्या रस्त्यावरून, एक धावते दर्शन देत आम्हाला पुढे नेत होती शेवटच्या टोकाला उतरल्यावर एकदम युनोची ती सपाटीने उंच जाणारी इमारत एकदम समोर दिसली व 'यूनो' मी ओरडलो, 'युरेका'च्या थाटात ती सरळसोट उंच व बाजूची ग्रंथालयाची आडवी व पुढची सभागृहाची वक्राकार इमारत अशा त्या सगळ्या समूहाला एकदा सगळ्या बाजूनी प्रदक्षिणा घातल्यासारख पाहात पाहात आम्ही मग पलीकडच्या प्रवाशासाठी असलेल्या प्रवेशद्वाराकडे जात राहिलो व तेथली झाडेझुडपे, शिल्पे वगैरे पहात आत शिरलो. परिसर जसा छान

ठेवला आहे तसा अंतर्भागही तिकीटे देऊन गटागटाने सर्व महत्त्वाचे भाग दाखवण्यात येतात. आमच्या गटाला माहिती देणारी मुलगी भारतीय, 'नायर' या नावाची होती, पण तेथील सर्वजण आपल्याला 'यूनो'चेच मानतात निरनिराळी प्रतीके, सभागृहे, तैलचित्रे व एकूण व्यवस्था सर्व प्रेक्षणीयच आहे मात्र मुख्य सचिवालयाच्या उंच इमारतीत वर जायला मिळत नाही याचे वाईट वाटले तसेच मुख्य सभागृहही दुरुस्तीसाठी बंद असल्याने दुरून काचेतूनच पहावे लागले खालच्या तळघरात पोस्ट ऑफिस, पुस्तक विक्रीकेंद्र, स्मरणवस्तू विक्रीकेंद्र, उपाहारगृह या भागात, गटाची सहल सोडून देण्यात येते तेथे थोडा वेळ घालवून काही पत्रे बित्रे टाकून (तेथे युनोचा शिक्का पडतो त्यावर) आम्ही बाहेरचा रस्ता धरला जवळपासच्या उंच, इमारतींच्या जवळून सुट्टीच्या दिवसामुळे शांत असलेल्या रस्त्यावर फेरी टाकली व नंतर एका उपाहारगृहात 'पिझ्झा' घेऊन पोटपूजा केली व नंतर रॉकफेलर सेंटर या पुढच्या आकर्षण केंद्राकडे आमचा मोर्चा वळवला

तेथली ती ऋतूमानाप्रमाणे बदलणारी बाग, थोडा विसावा घेण्यासाठी उसळलेली लोकांची गर्दी, प्रॉमेस्थसचा (ग्रीक पुराणातला, जुलमी व्यवस्थेला मानवासाठी विरोध करणारा) सोनेरी पुतळा, आरसीए या सत्तर मजली इमारतीतल्या महागड्या शॉपिंग सेंटर व अद्ययावत् लिफ्टस्‌मधून आम्ही एक फेरफटका मारला. शहराच्या मध्य भागातला गजबजलेला भागच तो, सुट्टी असूनही फुललेला होता नुसता तिथून मग बाहेर येऊन, न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररी या विख्यात संदर्भ ग्रंथालयात एक धावती फेरी टाकली इतर उंच इमारतींच्या मानाने बसकी पण प्रभाव टाकणारी पुढील उंचच्या उंच पायऱ्यांनी आकर्षून घेणारी दगडी इमारत पाहून पुढे न्यूयॉर्कमधल्या सर्वांत महत्त्वाच्या भेटीसाठी न्यू एम्पायर स्टेट इमारतीच्या भेटीसाठी तिच्यामधल्या प्रचंड रांगेत दाखल झालो एरवी तेथे खाली ५० मैल दृश्यमानतेचा

फलक लागलेला असतो, आज पधरा मैलाचाच होता (आणि वर पोचल्यावर काही काळ तर पारच अधारून आले होते), तिकिटे काढून त्या रांगामधून, लिफ्टने वर जाणे हा त्रासदायक वाटणारा भाग होता पण एकदा वर ८६ व्या मजल्यावर पोचल्यावर डोळ्याचे पारणे फिटल्यासारखे वाटते चारी बाजूनी वारा खातही आपण फिरत रहतो १०५० फुटावरून मॅनहाटन बेटावरच्या सर्व इमारती आणि दूरवरचा प्रदेश पहात रहातो अर्थात् काचेच्या आत उभे राहूनही पहाता येते पण निसर्ग आणि मानवी कर्तृत्व पहायला आपल्याला काचेचे बधन थोडेच मानवणार ! पुन्हा तेथही स्मरणवस्तू विक्री केंद्र, उपाहारगृह वगैरे सोयी आहेत त्या टाळून आपण पुन्हा रांगेत उभे राहून १०२ मजल्यावरच्या दुसऱ्या निरीक्षण सज्जासाठी लिफ्टमध्ये शिरतो, १२५० फुटावरून, स्वच्छ प्रकाश असला तर ऐंशी मैलापर्यंतच्या अतरातील सर्व दिसू शकते असे म्हणतात त्या उचीवरून खालच्या इतर इमारती व दूरवरच्या स्पर्धा करणाऱ्या वर्ल्ड ट्रेड सेटरच्या दोन इमारती पाहाण्यासाठी प्रत्येक जणच धडपडत असतो इकडून तिकडे माणसाची धावपळ चालूच असते माहितगार काहीतरी माहितीह देतच असतात आपण थडीने गारठत असतो मधूनच पावसाचे थेंबही येत असतात इमारतीच्या आतल्या भागांवर आरसे लावून दूरवरचे प्रतिबिंब दिसण्याचीही सोय असते आणि तेथे उभे राहून त्या पार्श्वभूमीवर आपला व आपल्या प्रतिबिंबाचा फोटो एखाद्याच्या हाती कॅमेरा देऊन काढून घेऊन तो आगळा अनुभव जतन करून ठेवावासा वाटतो या इमारतीत १९५५ साली आधुनिक जगातल्या सात आश्चर्यात तिची गणना केली गेली होती पण काहीतरी आपण हळूहळू वास्तवात येतो आपल्याला परत जाण्याची आठवण होते व परतायच्या रांगेकडे नाईलाजाने का होईना वळतोच

खाली उतरून बाहेर पडेपर्यंत चागलेच अधारले होते, तरी घाईघाईने काही दुकानातून फेरी टाकायचा आम्ही प्रयत्न करीत

होतो. पण थोड्याच वेळात पाऊसही शिडकावू लागला, मग मात्र वळचणींच्या कडेकडेने आम्ही ४२ व्या रस्त्याच्या कडेच्या भुयारी स्टेशनाकडेच मोर्चा वळवला व त्या दिवशीची न्यूयॉर्कदर्शन सहल आटोपती घेण्याचे ठरवले घरी पोचल्यावर चि गीताबरोबर थोडा सापशिडीचा खेळ, श्री व सौ गाडगीळांबरोबर भोजनासमवेत गप्पांचा अड्डा आणि उद्याच्या कार्यक्रमाबद्दल सूचना घेणे, यात मध्यरात्र केव्हा जवळ आली तिचा पत्ताच लागला नाही.

* *

प्रकरण : ९

# मॅनहाटन बेटाची प्रदक्षिणा

पुढची सकाळ तशी रविवारची म्हणून न्यूयॉर्कचे नागरिक आपल्या साखरझोपेत वा साप्ताहिक कामात मश्गुल असताना आम्ही बसने व मग धावत पळत ४३ व्या रस्त्यावरच्या बोटींचा धक्का गाठण्यासाठी जात होतो मॅनहाटन बेटाभोवतालची तीन तासाची बोटीची सहल हा आमचा त्या दिवसाचा सुरुवातीचा कार्यक्रम होता. मात्र ती धावपळ वायाच गेली, कारण पहिली बोट सुटून गेली, पण त्या दिवशी लोक सारखे येतच राहिल्याने तासाभरातच दुसरी सुटणार म्हणाले. मग तिकीट काढून तिच्या डेकवरच त्या दिवसाची न्याहारी आम्ही उरकली पस्तीस मैलाच्या प्रेक्षणीय सहलीला सुरुवात करायची, सतत कॅमेऱ्याने आणि डोळ्यानी पाहात रहायचे म्हणज थोडी शिदोरी हवीच पोटाला बोटीचा भोंगा आणि तीवरच्या मार्गदर्शकाचे व्याख्यान एकदमच सुरू झाले आपल्या परीने तो खूप माहिती देत होता, विनोद करीत होता. पण लोक सारखे मागचा डेक, पुढचा डेक, खालचा डेक, वरचा डेक, मध्यच जागवर बसून पाहाणे, असे सारखे इकडून तिकडे करीत होते

बोटीने ८३ क चा धक्का सोडून दक्षिणेकडचा प्रवास चालू ठेवला आणि आयुष्यातल्या एका अचबा करीत राहण्याच्या अनुभवातून आम्ही जात राहिलो उच इमारती–आधुनिक वास्तु-शिल्प, त्यातही जुने–नवे, उभ्या आडव्या रेषा, कौतुके सारे जवळ

येई–लाब जाई, असे चालू होते. ८३ वा धक्का ते वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या जुळ्या उंच इमारती या एका टप्प्यातच, मध्यापासून दक्षिण टोकापर्यंतच्या मॅनहाटन बेटाच्या पश्चिम बाजूचे डोळे भरून दर्शन घेत होतो ती कालची एपायर स्टेट, ती रॉकफेलर, ती क्रिसलर वगैरे इमारतीकडे बोटे दाखवीत एकमेकांना सांगत होता व एकदम 'बोट स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याकडे जात आहे होशियार' असा पुकारा झाला १५१ फूट उंचीचा ब्राँझचा पुतळा दुरून, जवळून, उत्तरेकडून, दक्षिणेकडून, पूर्वेकडून, तसेच जवळून दुसरी बोट जाताना अशा निरनिराळ्या कोनातून पाहायला मिळत होता, कॅमेरे क्लिकक्लिकत होते, पुतळ्याचे कौतुक ऐकू येत होते व पुन्हा बोटीने मॅनहाटन बेटाच्या दक्षिण टोकाकडे झेप सुरू केली या पुढचा प्रवास अनेक प्रचंड पुलाखालून जाताना, त्याच्या स्थापत्याबद्दल अचंबा करण्याचा होता तसाच यूनो व इतर इमारती रोज २५० डॉलर खाटेचे दर असलेल्या बेलेव्हयू इस्पितळाची इमारत आणि अशा कितीतरी इमारती तसेच दोन्ही किनाऱ्यावरील करमणुकीसाठी उभारलेल्या बागा, किनारपट्टीचा, स्टेडियम्स इत्यादींनी चक्रावून सोडणाऱ्या दर्शनाचा होता उजव्या बाजूच्या भूभागावरही आकर्षक इमारती, बागा होत्याच अगदी उत्तरेकडच्या बेटाच्या भागाजवळ, घनदाट जंगलासारखी झाडी, नंतर उपनगरी रेल्वेचे मोठे यार्ड व उजवीकडेही, जमिनीखालून वर येऊन तिने खडकातून जाऊन पुढे उपनगरात मारलेली मुसंडी या सगळ्या गोष्टी पाहातच राहिलो होतो बेटाला उत्तरेकडून वळसा झाल्यावर मग मात्र परत उतरायचे वेध लागले व पाहायलाही फार थोडे होते त्या बाजूला जरा, दूरवरच्या भागात काही आकर्षक इमारती दिसत होत्या तेवढ्याच !

दुपारी दीड–दोनच्या सुमारास आम्ही त्या बोटीतून बाहेर पडल्यावर पुन्हा युनोकडे जाणारी क्रॉसटाऊन बस पकडली कारण कालच्या गडबडीत फोर्ड फाऊंडेशनची इमारत पाहायची राहून गेली होती. वास्तुशिल्प वैशिष्ट्यपूर्ण आणि बाजूच्या इमारतींना

धक्का न लावता तिचे बांधकाम पुरे केलेले म्हणून बांधकाम तज्ञातही कल्पकतेत मोडणारी अशी ती इमारत, तशी शोधूनच काढावी लागते कारण एकतर गगनचुंबी इमारतीचे रूप नाही व पाटीही छोटीशीच पण इमारत खरोखरीचीच देखणी आणि स्वत्त्व असलेली आहे आत एन आकाराची, बाहेर काचेने चौकोन पुरा केलेली, मध्ये भरपूर झाडे, वेली, फुले असलेली पुन्हा सगळ्या काचानी दूरवरची प्रतिबिंबे धारण करून वेगळीच मजा आणलेली अशी ती इमारत--जरा जवळून, जरा दुरून, जवळच्या रस्त्यावरून जाणाऱ्या छोटया पुलावरून अशा तऱ्हेतऱ्हेच्या जागातून, कोनातून. ती पाहून घेतली आणि फोटो काढून घेतले

त्यानतर मात्र तिसावा रस्ता ते एकूणसाठावा रस्ता या मधल्या भागात बरीच पायपीट करून ते रस्ते, तिथल्या इमारती, तिथल्या दुकानाची रचना, खरेदी करणाऱ्याची धावपळ, रोजच दिवाळे निघाले म्हणून सेल लावल्याची पाटी लावणारी (आणि तरीही महाग किमतीलाच विकणारी) दुकाने, ठराविक किमतीनाच विकणारी मोठी व छोटी दुकाने, पुस्तकाची, कॅमेऱ्याची, खेळण्याची, घरगुती वस्तूची, गॅजेटसची, हिरेमोत्याची अशी असख्य प्रकारची दुकाने आणि त्यातून हिंडणारी माणसे पाहात ५ वाजेपर्यंत भटकलो पुन्हा टाईम स्क्वेअरजवळ आलो ब्रॉड वे या प्रख्यात रस्त्यादरच्या थिएटराचा व जुगाऱ्याच्या खेळाचा, उपाहारगृहाचा आणि जाहिरातीनी गच्च सजलेला भाग डोळ्या-खालून घातला आता न्यूयॉर्कच्या वातावरणाची झिंग पुरती अंगावर आली होती, पायही दुखू लागले होते, पण पाहायलाही पुष्कळ होतेच तेव्हा एक बस पकडून ८९ व्या रस्त्यावरचे गुगन-हाईम म्युझियम गाठले पण हाय (हॅलो या अमेरिकन अर्थाने नव्हे तर हाय रे दैवा या शुद्ध मराठी अर्थाने) तेथली वेळ सपली होती लिंकन सेंटर दुपारी बाहेरून पाहिले तसे हेही बाहेरूनच पाहावे लागले. फ्रॅंक लॉईड राईट या विख्यात वास्तुविदाची ही न्यूयॉर्कमधली एकमेव इमारत आहे आणि ती खरोखरीच

वैशिष्ट्यपूर्ण आहे आपल्या चढत जाणाऱ्या वक्राकारांनी ती आकर्षून घेते मग जवळच्याच सेंट्रल पार्कमध्ये थोडा विश्राम घ्यायचा योग आपोआपच जुळून आला अनेक वर्षे त्याबद्दल एकले होते शहराच्या मध्यभागात ५९ व्या रस्त्यापासून ११० व्या रस्त्यापर्यंत पसरलेल्या ८४० एकर जागेत करमणुकीच्या अनेक सोयी आणि एक तळेही आहे प्राणी आहेत, स्केटिंग रिंग आहे, मुलांची बाग आहे धावण्याची, चालण्याची, घोड्यावरच्या रपेटीची, टेनिस वगैरे खेळाची अशा अनेक सोयी आहेत आणि दूरवर दक्षिण मॅनहाटनमधल्या उंच इमारतींच्या मनोहर दृश्याची पार्श्वभूमीही आहे, दुर्बिण घेऊन हवेतर पाहात बसावे. थोडा वेळ तेथे घालवून मग उठलो आज मुक्कामाला फ्लशिंग या उपनगरात जायचे होते त्यापूर्वी ८६ व्या रस्त्यावरच्या आमच्या भोज्याला शिवून यायचे होते पुढच्या गाड्यांची नीट माहिती घ्यायची होती

सेंट्रल पार्क ओलांडून सध्याकाळी सातच्या सुमारास आम्ही श्री गाडगीळ याच्या शहाऐंशीव्या रस्त्यावरील घराकडे परतलो व दुसऱ्या दिवसापुरते थोडेसे सामान आणि पुढील प्रवासासाठी सूचना घेऊन लगेचच बाहेर पडलो भुयारी रेल्वे दोन ठिकाणी बदलून जावे का थोडे पुढे जाऊन एक बदलवाला मार्गच पत्करावा या समस्येवर थोडा खल करून, दुसराच स्वीकारला व थेट ५० व्या रस्त्यापर्यंत एए लाईनने जाऊन मध्ये चालत जाऊन जाऊन आयआरटी सेव्हन या भुयारी मार्गासाठी ४२ व्या रस्त्यावरचे स्थानक शोधून काढले मधला जोडणारा बोगदा अगदी लखलखीत व शुभ्र टाईल्सनी स्वच्छ ठेवलेला होता पुन्हा एकदा मेनस्टेशन फ्लशिंगकडे जाणारी गाडीच नाही? अशी तीनतीनदा खात्री करून घेऊन त्या गाडीत बसलो तीन चार स्थानके गेल्यावर, गाडी चक्क भुयारातून वर येऊन आपल्या हार्बर लाईनसारखी कधी वर, कधी जमिनीवरून, अशा मार्गाने पळत होती अंधार पडत चालला होता व उपनगरात घराकडे परतणाऱ्यांची गर्दी खूपच होती रूझव्हेल्ट अॅव्हेन्यूला समांतर

असलेल्या मार्गावरची गाडी अनेक स्थानके घेत घेत आम्ही जात होतो व शी स्टेडियमची प्रचंड इमारत दिसली म्हटले, आता पुढचे स्टेशन उतरायचं बर का ? मेन स्टेशन फ्लशिंगला पोचलो तेव्हा पुरता अंधार झाला होता, पण डॉ मुलगुंदानी फोनवर अगदी तपशीलवार सूचना दिलेल्या होत्या रस्त्याची नावे, त्यावरच्या क्रमाने येणाऱ्या मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्सची नावे व वळायचे ठिकाणी इतर मुख्य खुणा वगैरे सांगितलेले होते. उपनगरात व अंधार पडल्यावर फिरायला, मन जरा धास्तावले होते पण रस्त्यावर ये–जा बरीच दिसल्यावर जीव भांड्यात पडला. मेपल ॲव्हेन्यू आणि त्यानंतर त्याच्यावरची त्याच्या अपार्टमेंटची इमारत सापडून, त्यांच्याकडे बरोबर ठरलेल्या वेळेला ८॥ च्या सुमारास पोहोचलो त्या हसतमुख व उत्साही जोडप्याची आणि त्याच्या छोट्या रोहितची व आमची चांगलीच गट्टी जमली सावपणे गप्पा, जेवण, रंगीत टी व्ही पाहाणे, दोन्ही देशातील सामाजिक–आर्थिक स्थिती आणि राहाणी, समान ओळखीच्याची माहिती इत्यादींची देवाण–घेवाण यात ती सध्या-काळ बुडून गेली, त्यातच उद्याच्या कार्यक्रमाची आखणी पण करून गेली.

सकाळी उठून उपनगरातल्या, सुट्टीच्या दिवशीच्या सकाळचा जीवनक्रम कसा असतो ते पाहाण्यासाठी लवकर बाहेर पडू या असे मी म्हणत होतो, पण दुकाने दहाच्या आधी उघडत नाहीत, लोकही फारसे बाहेर पडत नाहीत, तेव्हा छानपैकी न्याहारी करूनच बाहेर पडायचे ही सौ. वदनाताईंची आज्ञा मानणे प्राप्तच होते रात्री पाऊस पडला होता पण सकाळ उन्हाची व प्रसन्न होती भाज्या, फळे यानी टोपल्या भरून दुकाने उघडत होती मोठ्या स्टोअर्समधला सेलचा शेवटचा दिवस, दुकानदारांनाही साधून घ्यायचा असल्याने त्याचीही तयारी दिसत होती मेमो-रियल डे वीक एंड–लाँग वीक एंड वगैरे गाजत असलेला तीन

सलग सुट्टयाचा, तिसरा दिवस उजाडलेला होता चॉकलेट व्हिटॅमिनच्या गोळ्या, कपडे इथपासून तऱ्हतऱ्हेची अवजारे अशा साऱ्याचेच सेल चालू होते त्यातून येऊ घातलेला 'समर' सुट्टयाचा ऋतू. त्यासाठी कपडे, साहित्य, तऱ्हतऱ्हेची साधने बॅगापासून मासे पकडण्याच्या साहित्यापर्यंत अनेक गोष्टी त्या सर्वांनी दुकाने भरलेली होतीच. पूर्ण निवासी भागात रस्त्यावर नुसत्याच गाड्या उभ्या होत्या पार्क करून ठेवलेल्या व जवळच असल्याने लोक पायीच दुकानांकडे-बाजाराकडे हळूहळू लोटत होते आम्हाला दुपारपर्यंतचाच वेळ असल्याने, साऱ्या मुख्य दुकानातून व त्याच्या काही दालनामधून फेरी टाकली सौ वदनाताईंच्या मदतीने काही खरेदी पुरी केली एक मोठे भारतीय मालकाचे स्टोअरही त्या भागात आहे तेथे साड्या आणि भारतीय पद्धतीस सोयीची २२० व्होल्टची उपकरणे वगैरे गोष्टी मिळत असल्याने सगळे त्या भागाला भेट देतात तिथली भारतीयाची सख्याही मोठी आहे आणि अलिकडेच एक देऊळही बाधले गेले आहे

उपनगराचा आणि दुकानाचा फेरफटका पुरा करून आम्ही घरी येऊन सौ मुळगुदाच्या हातच्या झटपट पण बहुविध प्रकारच्या बनवलेल्या व चवदार स्वयपाकावर ताव मारला. थोड्या गप्पा वगैरे होईपर्यंत ३ वाजून गेले आणि पावसाचा रग दिसू लागल्यावर आता म्हटले, चला, लवकर परतायला हवे न्यूयॉर्कमधला मुक्काम सपत आला आहे, परत जाऊन सामान आवरून वॉशिग्टनची बस गाठायची आहे तिथेही मध्यरात्रीपूर्वी पोचायला हवे हा विचार मनात आल्याबरोबर, न्यूयॉर्कचा अगावरचा प्रभाव एकदम उतरल्यागत वाटू लागले माणसे आपली वाटली तरी आता थोडाच वेळ सहवास ही अस्वस्थ करणारी जाणीव झाली निरोप घेण्याचे मला नेहमीच अवघड वाटणारे काम आणखीच अवघड झाले तुमच्या आईवडिलाना समक्ष भेटून खुशाली अवश्य सागू एवढेच सांगून निरोप घेतला लहान मुलाचा

निरोप घ्यायचे तर फारच कठीण काम, त्याला तर रुसवूनच जावे लागते बहुतेक मुले तशी माणसाची भुकेली लोभसवाणी असतात आणि अमेरिकेतल्या बहुतेक भारतीय कुटुंबातूनही तोच अनुभव आला. असो

पावसाच्या माऱ्यातून कसातरी बचाव करून घेत, फ्लशिंग स्टेशन व तिथून पुढे गाड्या बदलत, ८६ वा रस्ता हे स्थानक गाठले, तिथे ६॥ वाजून गले होते, ७ ची बस नाही गाठली तर पुढे बराच उशीर होणार होता तेव्हा सामान भरून पळापळ करून भुयारी रेल्वेने पुन्हा बस टर्मिनल गाठले व तिकिट काढून खालच्या तळघरात येऊन अक्षरश सुरू झालेली वॉशिंग्टन मार्गे पुढे जाणारी बस की जिच्यात बरोबर २ च जागा होत्या ती गाठली व आत स्थानापन्न झालो.

पुन्हा तो बोगदा व इतर राजमार्ग, दूरवरचा हवाई अड्डा इ सारे वेगाने पळत होते पण आता ते आपले काहीच नव्हते आणि पुन्हा तरी आपण इथे कधी–कशाला येऊ असेही नाही तेव्हा एक आपलेपणा वाटत असला तरी तटस्थपणाचा आव आणणे भाग होते तसे पाहायचेही कितीतरी राहून गेले होते, ती यादीही झट्कन डोळ्यासमोरून जात होती पण विचार केला, आपण नेहमी वावरतो, राहातो, जातो त्या शहरातले सगळे कानाकोपरे तरी आपण पाहिले आहेत का ? जेवढे पाहिले त्याच्या आठवणी तेवढ्या आपल्या (ते आपले नव्हेच केवळ आठवणी) अनुभव तेवढे आपले ! बस्स ! ! तेवढ्यावर समाधान मानावे या धीर-गभीर विचाराने मन सावरले व डुलक्या घेत घेत वॉशिंग्टनला पोचण्याची प्रतीक्षा सुरू केली रात्री ११। वाजता वॉशिंग्टन आणि पधरा मिनिटात टॅक्सीने पुन्हा ककॉर्डिया अपार्टमध्ये दाखलही झालो. तेव्हा मनाने आणि आणि शरीराने फार मोठा प्रवास करून आल्याचे तेवढे जाणवत होते

* *

प्रकरण : १०

# द स्पिरिट ऑफ वॉशिंग्टन सिटी अँड अमेरिकन पीपल

'न्यूयॉर्क'हून परतल्यावर, तसे १०–११ दिवसच वॉशिंग्टन मध्ये रहायचे होते व आमचा कार्यक्रम पुढे लंडन मार्गे नैरोबीला, अभ्याससत्राचा शेवटचा भाग तेथे होता. नैरोबीस जाण्यापूर्वी लंडनहून. माझ्यासारखेच ज्याची पत्नी वा जिचा [illegible] आलेला होता, त्यांना आपापल्या जोडीदाराची घरी रवानगी करायची होती एकूण आवराआवर, प्रवासाची व्हिसा, इंजेक्शने वगैरे तयारी (अर्थात येथे सारे फार सोपे व सुव्यवस्थित आखून दिलेले असते व जरूर तेथे मदत मिळे, काही कामे नुसती फोन-वरूनही होत ) पुरी करायची होती. आठ जूनला परतीचा प्रवास सुरू व्हायचा तर सहा जूनला 'अनअकंपनीड बॅगेजची पार्सले', ताब्यात घेणार होते. त्यापूर्वी भरून वजन करून तपासून ठेवणे आवश्यक होते बरोबर काय न्यायचे, काय थेट पाठवायचे वगैरे खल चालू होता कोणाला निरोप द्यायचे राहिले होते, त्याच्या 'अपॉइंटमेंट्स' मिळवायच्या होत्या (नुसते आपले गेलो, असे अमेरिकेत चालत नाही, भेटायचे म्हणजे साग्रसंगीत, वेळ काढून तेव्हा बहुधा तो कार्यक्रमच होऊन बसतो काही तासांचा) काही पाहायचे राहून गेले होते ते पाहायचे की, सोडून द्यायचे यावरही चर्चा होत होती एकदरीत दिवस धावपळीचे, त्यातूनच एखादी

चागली उपलब्ध दुपार वा सध्याकाळ पावसाने वाया जाई एकदरीत सारीच गडबड–धावपळ होती

त्यातच पहिल्या आठवड्यापासून गाजत असलेली वॉशिंग्टनच्या मेयरची भेट एक जूनला ठरलेली आहे, असे जाहीर झाले एवढ्या मोठ्या राजधानीच्या शहराचा महापौर, नगर व्यवस्थापनाच्या क्षेत्रातले अनुभव काय काय सांगेल, प्रश्न काय विचारायचे वगैरे चर्चा अभ्याससत्रातल्या सहकाऱ्यामध्ये चालू होती वयाने तसे तरुणच मॅरियम बॅरी या काळ्या व्यक्तीची दिनचर्या काय काय असते, आपली मते आग्रहाने ते कशी माडतात वगैरे माहिती दिली जात होती अलिकडेच विरोधी पक्षातून येऊन महापौर झालेल्या मुबईच्या काही तरुण महापौराची व त्यानी सुरू केलेल्या मोहिमाची आणि सरकार–महापालिका सबधातील चर्चाची मला आठवण झाली महापौराना भेटायला जाताना कार्यक्रमात काहीसा गोंधळ झाला, अगोदरची चर्चा मध्येच थाबवून सगळ्याना तातडीने व तेही चालतच निघावे लागले. म्हटले, चला मोठ्या व्यक्तीला भेटायचे तर हीही एक तपश्चर्याच

तेथे पोचल्यावर, एका तरुण व उत्साही सहाय्यकाने सर्वांचे स्वागत केले, शहराची व नागरी प्रशासनाची थोडी माहिती दिली. अतिशय माहितगार व कुशल प्रशासक असावा त्याच्याशीच आणखी बोलायला मिळावे, असे वाटत होते तेवढ्यात वेळ झाली व शांतपणे एक गृहस्थ येऊन टेबलाभोवतालच्या एका रिकाम्या खुर्चीत स्थानापन्न झाले. आपले वाक्य पुरे करून वक्त्याने मान झुकवून ' मिस्टर मेयर, हे जागतिक बँकेत एका अभ्याससत्राला आलेले २३ देशातले अठ्ठावीस उच्च अधिकारी आपल्याला भेटायला आले आहेत, असे म्हणाला, तेव्हा आम्हाला कळले की हेच ते ' मेयर मॅरिम बॅरी व याना मिस्टर मेयर असे सबोधायचे सर्वांनी उठून अभिवादन केले व थोड्याशा औपचारिक बोलण्यानतर मोकळेपणाची चर्चा सुरू झाली

इतर कोणत्याही महानगरात व्हावे अगदी तस्सेच झाले, म्हणजे महापौरांनी, कळकळीने आपली दु:खे आपली काम करण्याची इच्छा पण कायदेकानू, रीतिभाती इत्यादींची नियंत्रणे यांनी आपल्याला कशा अडचणी येतात हीच माहिती दिली आधी बरेच वर्ष केंद्र सरकारचाच अमल तेथे होता, पण अलिकडेच नियुक्त प्रशासनाऐवजी लोकप्रतिनिधींचा कारभार सुरू झाला आहे. पण अजून सरकारी नियत्रणे बरीच आहेत. मुख्य म्हणजे शहराचे बजेट देशाच्या आरच्या सिनेटने मजूर करावे लागते त्यासाठी वेळ लागतो समित्यामधून चर्चा, धावपळ सारे व्हावे लागते पुन्हा सरकारी इमारती जास्त आणि इतरासारखा त्याच्याकडून कर वसूल करता येत नाही एक प्रकारचे अनुदान घ्यावे लगते घरबाधणीचीही जबाबदारी आहे खर्च बराच वाढलेला आहे झेपत नाही, हजारो लोक रोज केवळ शहरात येऊन परत जातात, कर काहीच देत नाहीत. मध्यतरी आपल्या वित्तव्यवस्थत सुधारणा करायला सरकारने सागितली ती केल्याबरोबर आपले अनुदान कमी करून टाकले अशा एक ना दोन अनेक गोष्टी सागत होते कोणी प्रश्न विचारून एखादी बारीक माहिती विचारायचे, एखादा विनोद करून 'मेयर' त्याला बगल द्यायचे. एकदरीत इतरासारखीच या शहराची ही स्थिती आहे येथे पोलीस सेवा स्थानिक शासन पुरवते व इन्कम टॅक्सही नागरी प्रशासन लावते तसा तो केंद्र, राज्य व स्थानिक सगळ्यानाच लावता येतो पण आपल्यासारखा ऑक्ट्रॉय नाही

शहर आणि त्याचा परिसर यातले एकसूत्रीकरणाचे प्रश्नही आहेत, वाहतुकीच्या समस्या मोठ्या व त्यांना लागणारा खर्च बराच आहे अभ्य ससत्रात आम्ही लोक सुरुवातीपासून म्हणत होतो की, विकसित देश आणि विकसनशील देश याच्यात शहरी समस्या आणि त्याच्यावरची उत्तरे याच्या चर्चेपुरता तरी भेद करू नका. आणि आमचे म्हणणे किती बरोबर होते ते वॉशिंग्टनच्या महापौराबरोबरच्या चर्चेत स्पष्ट दिसून आले.

दोन व तीन जून हा आमचा अमेरिकेतल्या वास्तव्यातला अखेरचा सप्त हान्त होता किरकोळ खरेदी, बांधाबांध ही कामे होती व एक दोन राहिलेल्या ओळखीच्याना भेटायचे मनात होते पण वेळ जमत नव्हता त्यातच धो धो पडणाऱ्या पावसाने त्यावर अगदीच पाणी ओतले त्यात एक गोष्ट मात्र फार छान झाली दूरचित्रवाणीवर २–३ सुरेख चित्रपट पाहायला मिळाले एक होता टाईम मशिनवरचा कितीही माणसाने प्रगती केली तरी मूलभूत भावभावना, नातीगोती विचार टाळून चालणार नाही, सपत्तीचा व विनाशकारी शस्त्राचा हव्यास विनाशाकडेच नेईल असे दाखवणारा अतिशय सुदर चित्रपट. दुसरा तर जुना प्रसिद्ध ' स्पिरिट ऑफ सेंट लुईस ' विमानाने प्रथमच न्यूयॉर्क ते पॅरिस हे यशस्वी उड्डाण केले त्यावरचा दूरचित्रवाणी पाहायला आम्हाला वेळ तसा कमी मिळे व त्यावर जाहिरातीही खूप असतात पण मिळे पाहायला ते पाहण्यासारखेच असे, यात शका नाही एक तर जाहिरातीविरहीत चॅनेल आहेच, त्यावर मुलांना सतत खिळवून टाकेल, मोठ्यानाही आवडेल, असे कार्यक्रम असत

रेडिओ लोक फक्त कारमध्येच लावतात, पण त्यावरही काही चागले कार्यक्रम असत रेडिओ, दूरचित्रवाणी यामुळे साऱ्या जगातल्या महत्त्वाच्या घटना व त्यावरचे तज्ञाचे भाष्य आपल्याला घरबसल्या भरवले जात असे वर्तमानपत्रेही खूप व जाड जाड पण जाहिराती फार आणि स्थानिक बातम्याच जास्त परदेशी म्हणजे अमेरिकन हितसबध असतील तर तेवढ्याच बातम्या दिसत इतर देशाचा दिवसचे दिवस उल्लेखही वृत्तपत्रात नसे त्यामानाने आपली वर्तमानपत्रे जागतिक बातम्या खूपच छापतात असे वाटते.

(पण गमत म्हणजे एकदा नैरोबीतल्या नतरच्या मुक्कामात ' टाईम्स ऑफ इडिया 'चा अक बघून आमचे प्राध्यापक उद्‌गारले, 'बघा तुमच्या वृपत्रात अमेरिकेबद्दल काहीतरी मजकूर आहे का? ' मग मी आतले सपूर्ण विदेश वार्तेचे पान आणि अग्रलेखही वर्ल्ड

बँक व इतर जागतिक घडामोडींवरच आहेत हे दाखवून दिले. असो )

वर्तमानपत्राचे मला तेवढे आकर्षण वाटले नाही त्यात एवढे वजन रोज बरोबर कोण घेऊन जाणार (आणि आपल्या सारखा रद्दीला भाव नाही फेकूनच द्यायचे ) पण लोक दोन तीन पत्राचे गठ्ठे कारमध्ये व बसमध्ये वागवीत तेव्हा गमत वाटे रात्रदिवस चालणाऱ्या टी व्ही मुळेच मुले व मोठी माणसे इतकी माहिती मिळवीत असावीत असे वाटे पण बरेचजण वर्तमानपत्रेही काळजीपूर्वक वाचत असत असेही दिसे

तसा कागदाचा वापर व तो वाया घालवणे हे अमेरिकेत अगदी टोकाला पोचलेले आहे, असे दिसते रोजच्या खाद्यपदार्थांच्या पिशव्या, कपबशा, ग्लासेस, वगैरे असख्य गोष्टी कागदांच्या चमचे वगैरे प्लॅस्टिकचे व कॅन्स पत्र्याचे म्हणजे झटपट उपहारगृहे (कॅरी आऊट वा ईट इनवाली) तर सगळा त्याचाच वापर करीत पण रोज कचेरीत जाता-येता कॉफी पिण्याचे ग्लास काग-दाचे, सगळ्यावर पॅकिंग कागदाचे आणि तेही किती सुरेख सुरेख पण सारे फेकून द्यायचे दुकानात खरेदीला जाताना पिशवी न्यायची नाहीच येताना कागदी वा प्लॅस्टीकची आणायची व फेकून द्यायची साठवून ठेवायला लागलात तर थोड्याच दिवसात कपाट भरून जाईल वस्तू जरा नीट लागली नाही की सरळ कचऱ्याच्या पेटीत टाकून दिली जाई एका पार्टीनतर उरलेले उत्तम उत्तम अन्न व फळे अशी टाकून दिलेली पाहून कसेसेच वाटले

अर्थात् अमेरिकनानाही आता असे वाया घालवणे बरे नाही याची जाणीव होऊ लागली आहे पत्र्याचे कॅन्स गोळा करून त्याचे रिसायकलिंग करणारी एक कपनीच आहे पेट्रोलचा तुटवडा पडल्याने, शनिवार, रविवार पप बदच राहू लागले होते. आम्ही असताना पाणी, वीज त्यांची बचत करण्याची वेळ हळूहळू येणारच आहे सध्या पैशाची बचत कशी करावी एवढेच एक सारे अमेरिकन जाणतात

जाहिराती, सेल्स, प्रचार हे सारे वाचविण्यावर केंद्रित असते, हळूहळू 'शक्ती' वाचवण्यावर येऊ लागले आहे पुढे नैसर्गिक व इतर साधनसपत्तीवर पाळी येईल. असो

आणखी एक म्हणजे, प्रदूषणाबद्दल बरीच चांगली जाणीव लोकामध्ये आहे तशीच झाडे, निसर्गसपत्ती याबद्दलही वाढते आहे. निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन सुट्टी घालवण्याचा प्रयत्न बरेच जण करतात सर्वत्र उद्याने, तळे, नदीकाठ, प्राणीजीवन याचे सरक्षण, सवर्धन यावर बराच भर दिला जात आहे. हीही चागली व घेण्यासारखी गोष्ट आहे.

समाजच त्यामानाने फार आत्मकेंद्रित वाटतो वर वर सर्व उपचार पाळतील, चौकशी करतील पण त्यात आत्मिक ओढ असणार नाही, हे जाणवते मुलेही तशी एकलकोंडी वाढायला लागतात बरीचशी नवराबायको नोकरी करणारी असली की, मूल शाळा व 'बेबीसिटर'च्या ताब्यात मग सगळ्यानी एकत्र वावरण्याचा वेळही थोडाच व त्यात उपचारावर खूप भर मुलाना खोलीभरून खेळणी मिळाली तरी आई-वडिलाच्याबरोबर 'मायेचा' वेळ थोडाच मिळत असावा व पुढे स्वत. मोठे झाल्यावर तीही तशी आणखी पुढच्या पायरीने वागणारी असणार, असे एक आपले वाटले. भौतिक प्रगती आणि व्यक्तिगत विकास यात कुठेतरी सांधा जुळायला हवा, नाहीतर सारे फिसकटले असे त्या अमेरिकन कुटुबाचे जीवन पाहून वाटू लागले.

वॉशिंग्टन शहराचे व एकदर अमेरिकनाचे जीवनदर्शन—द स्पिरिट ऑफ वॉशिंग्टन हे असे आहे

त्या शेवटच्या आठवड्यात एकीकडे आपल्या अनुभवांवर, पाहिलेल्या गोष्टींवर विचारमथन चालू होते. आणि दुसरीकडे सामानाची बाधाबाध चालू, निरोपानिरोपीही सुरू होती पाहायचे राहिले होते ते पाहायला पुन्हा कधी येऊ काय असाही विचार येई. फिलाडेल्फिया, शिकागो, लॉस एजेलिस, सान फ्रासिस्को

आणि फ्लॉरिज सारखे प्रदेश पुन्हा येऊन आपण पाहू का ? त्याच्या समस्या अभ्यासायला तिथल्या व्यवस्थापकाशी चर्चा करायला मिळेल का ? तसेच आतापर्यंत मिळालेल्या अनुभवापैकी माहितीपैकी कितीचा आपल्याला, आपल्या परिस्थितीत कसा कसा उपयोग करून घेता येईल असेही विचार सतत येतच असत.

बाधाबाध होत आल्यावर रिकाम्या खिशांनी एकदा सगळ्या मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या फेऱ्या मुद्दामच केल्या तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू, किंमतीची लेबले लावून हारीने माडून ठेवलेली डोळे भरून पाहून घेतली. एकेका प्रचंड स्टोअर्समध्ये छोटे खेडेगाव मावेल एवढी जागा व्यापलेली व भोवती पाच-दहा पट जागा गाड्या उभ्या करण्यासाठी (शहराच्या मध्यभागातली ७-८ मजली दुकाने) एकेका दुकानात एकेक दिवस सहज खर्च होऊन जातो व तेथल्या लोकाचा तोही एक विरंगुळा असतो. आठवड्यातला सोनेरी तुरुगात लोकाना खिळवून टाकणारी ही स्टोअर्स हाही एक महत्त्वाचा भाग आहे

निघण्यापूर्वी एक उपचार म्हणून तरी आपल्या राजदूतावासास भेट द्यावी म्हणून एका दुपारी गेलो इमारत साधीच, जुन्या वळणाची व आत माणसेही बेताचीच, पण आत शिरल्यावर 'हॅलो, काय कस काय ?' असे समोरच्या व्यक्तीला सहज म्हणावे आणि ती व्यक्तीच राजदूत श्री. पालखीवाला असावेत ही गमत वाटली तिथे आणखी एक ओळखीचे अधिकारी श्री पटवर्धन भटले त्याच्या सौ तर पुण्यातल्या व ओळखीच्याच कुटुबातल्या निघाल्या मग घरी जेवायला जाऊन येणे वगैरे सर्व ओघानेच आले

तयारी होता होता आठ जूनचा दिवस उजाडला इन्स्टिटच्यूटमध्ये दुपारपर्यंन्त अखेरची चर्चा, पाठ होतेच, नतर कोणाला पोस्टाची, कोणाला इतर कसली अशी अनेक कामे होती व साडेसहा वाजता बस सगळ्याना घेऊन ककार्डिया अपार्टमेंटस या आमच्या निवासस्थानापासून निघणार होती. धावपळीतच

तोपर्यंत सारे उरकले बरोबर येणार नव्हते त्यांचे भावपूर्ण निरोप झाले दूरच्यांना फोन झाले आणि सामानाची हारी लावून बसपाशी जमले सगळे !

आता तो परिसर परका वाटू लागलाच होता, हवाही ढगाळ होती बस धावू लागली परिचित इमारती, नदीकाठ, त्यावरून धावणारे वा रपेट करणारे अमेरिकन नागरिक, हरतऱ्हेच्या मोटारींनी घराकडे परतणारे ऑफिसवाले व स्टोअर्समधून नोकऱ्या संपवून घराकडे परतणाऱ्या बायका, मुली, शाळेतून परतणारी मुले, घराभोवतालची हिरवळ कापणारे अमेरिकन नवरे म्हाताऱ्याच्या वेगळ्या घरातून राहणारी वृद्ध जोडपी, सगळे सगळे आम्हाला परके होते मनोमन बाय बाय करीत रात्रीच्या वॉशिंग्टन लंडन विमानोड्डाणाच्या विमानतळावर पोचवायला येणाऱ्याचा आम्ही विचार करीत होतो

विमानतळावर पोचलो तेव्हा बसला दोन फेऱ्या मारल्यावर मुख्य गेटपाशी पाच मिनिटासाठी उभे राहायचा परवाना मिळाला. भराभर उतरून सामान आत नेण्याच्या दारापाशी गेलो, तेव्हा पहिला दिवस आठवला त्या दिवशीची उत्सुकता, उत्साह, नावीन्य आज नव्हते आज थोडासा निरुत्साह, निरोपाची दु खद जाणीव व पुढच्या प्रवासाची धाकधुक यानी मनावर एक प्रकारचे मळभ आलेले होते थोड्याच वेळात सगळे सहकारी जमले, पोचवायला आलेले होते सतीश आणि स्मिता वहिनी छोटा सत्यजित ही भिडे मंडळी खूप माणसाचे सिंग कुटुंब हेही जमले आणि पुन्हा कधी भेटू, जरूर या, आमच्याकडे ! पत्र पाठवा ! अमक्याना निरोप द्या ! वगैरे गडबडीत थोड्या वेळासाठी ते मळभ नाहीसे झाले. ते पुन्हा विमानाकडे नेणाऱ्या बसमध्ये बसे-पर्यंत बसनेही लवकर विमानात नेले २–३ दिवसाचा थकवाही अंगावर आला होता विमानात आराम तरी करायला मिळणार होता उद्याच्या कार्यक्रमाची नीट आखणी करायला नतर वेळ

आहे. म्हणून मग जरा डुलक्या तरी घ्याव्यात म्हणून सैलसर बसून खुर्चीवर पट्टा बांधून घेतला व एअर होस्टेस बाईंनी आपल्या घोषणा सुरू केल्या अशा तऱ्हेने अमेरिकेतल्या त्या सहा आठवड्यांच्या वास्तव्याचा शेवट झाला होता सोनेरी तुरुंगातून बाहेर पडलो होतो पण घरी परतण्यापूर्वी आणखी दोन दुसरे छोटे वास होतेच

* *

प्रकरण : ११

# लंडनची धावती वारी

लडनकडे परत जाताना आता आम्ही पूर्वेकडे उडत असल्याने घड्याळापेक्षा, कमी वेळ असणार होती तेव्हा किती वाजले ते पाहायचा नाद सोडून दिला अधून मधून डुलकी लागली तरी प्रशस्त विमानातल्या चिकटून बसलेल्या खुर्च्यांमध्ये झोप नीटशी लागणे शक्य नसते उगाच आपली आराधना करायची एकदाचे सकाळचे ८। वाजत आले असून लडनच्या हीथ्रो विमानतळाकडे जात आहोत ही घोषणा झाली तसा त्या अगोदर ३–४ तास बाहेर सगळा उजेडच होता अगदी जवळ आल्यावर उपनगरातल्या घराच्या रांगा दिसल्यावर म्हटले, चला उठा, आवरा बाहेर पडून लाबचलाब छन्न मार्गातून जातजात सामान जमा होते तेथे जाऊन थाबलो बाकीचे येथे झटपट होत असले तरी सामान मिळायला अक्षम्य उशीर झाला तास दीड तास नुसता फुकट गेला बाहेर कोणी आले आहे का नाही ते पाहायलाही कोणाला जात येत नव्हते व अर्धवट झोपेची पेंगही डोळ्यावर असल्याने सामानाची वाट पाहाणे अगदी वैताग आणणारे ठरले एकदाचे ते आले व ट्रॉलीज मिळवून त्यातून भरून नियमाप्रमाणे सर्व असल्याने मग मात्र पाच मिनिटात ग्रीन चॅनेलमधून बाहेर आलो. बाहेर पडण्याच्या मार्गाला लागून स्वागत करायला आलेल्याची प्रचड गर्दी होती कित्येकाच्या हातात फलक होते, 'फॉर मि ली फ्रॉम कोरिआ', 'मि. मि. अमुक तमूक' वगैरे

म्हणजे चेहराही न पाहिलेल्याना घेऊन जायला आलेले लोक असावेत लडन म्हणजे माणसाच्या आतरराष्ट्रीय देवाणघेवाणीची मोठी पेठच असख्य माणसे तात्पुरती वा कायमची येथे येत असतात त्याना कोणाचा ना कोणाचा तरी आधार तेथे असतोच लडनमधला प्रत्येक परदेशी माणूस महिना दोन महिन्यातून एकदा तरी विमानतळावर स्वागत वा निरोपासाठी येतोच!

असो आम्ही आमच्यासाठी, साठे मडळी दिसतात का पाहात होतो गर्दीत अवघडही होते. एक दोन चकरा झाल्यावर, पत्र मिळाले, नसणार, (लडनला पोस्टाचा सप बहुधा नेहमी असतोच म्हणतात) म्हणून एक्सचेंजचे काम उरकून आम्हाला गावात हॉटेलकडे नेणाऱ्या बसचा शोध करू लागलो बस सापडली पण ड्रायव्हरचा पत्ता नव्हता पुन्हा जवळ जवळ तासभर वाया गेला नतर शहराच्या मध्यभागात पोहोचेपर्यन्त आणखी तास गेला. हॉटेलात सामान टाकून श्री साठे यांचा फोन शोधण्याच्या खटपटीला लागलो, लवकरच सापडला त्याना कल्पना होती पण पत्रच नव्हते मिळालेले! मग म्हटले, तातडीने येथे येऊन आम्हाला न्या आता, मग आपली ख्याली खुशाली बोलू आणि खरेच अर्ध्या तासात सारे साठे कुटुब गाडी घेऊन हजर झाले बऱ्याच काला-वधीनतरची आमची भरतभेट दोघाच्याही बायकाना गमतीदार वाटली

मग श्री. साठे याच्या घरी जाऊन छोटा गप्पाचा व जेवणाचा कार्यक्रम व उरलेल्या १। ते १॥ दिवसाचा कार्यक्रम आखणे, सलील व छोटया सोनियाताईची गट्टी, हे कार्यक्रम अगदी सहजपणे होत गेले उरलेली दुपार जवळचे नवे व मोठे शॉपिंग सेंटर व थोडा उपनगराचा फेरफटका यातच घालवण्याचे ठरले शॉपिंग सेंटर नवे असले तरी खूप लोकप्रिय झालेले आहे व लोकानी तेथे येण्यासाठी आकर्षणेही खूप निर्माण केली गेली आहेत. सर्व तऱ्हेची, मोठी दुकाने, बँक, गाडीतळ, मोठे लखलखणारे कारजे, सगीत व सार्वजनिक सूचना लाऊडस्पीकरवरून देण्याची व्यवस्था, फिरते

जिने, सध्याकाळी उशीरापर्यंत दुकाने उघडी असण्याची सोय वगैरे गोष्टींमुळे ते लोकानी ते लोकानी गजबजून जाते यात नवल नाही मात्र आजुबाजूच्या पूर्वी शात असणाऱ्या भागात त्याच्यामुळे वर्दळही बरीच वाढली आहे व नगरपालिकेला जवळपासच्या रस्त्यात बराच खर्च करून सुधारणाही करावी लागली आहे शॉपिंगच्या फेरफटक्यानतर घरी परतल्यावर थोडा वेळ गप्पाचा अड्डा, मधल्या काळातल्या घडामोडीच्या माहितीची देवाणघेवाण, त्यात इग्लडमधल्या भारतीयाना आलेले चागले वाईट दिवस, वगैरे चर्चा झाली फोटो, स्लाईडस पाहणे झाले व रात्री दहा वाजता पिकॅडली वगैरे मध्य लडनचा फेरफटका मारण्याचा बूट निघाला

आम्ही दोघे व श्री. साठे असे गाडीने रात्रीची लडनची सहल करायला निघालो आठवड्यातला शेवटचा दिवस दुसऱ्या दिवशी रविवार तेव्हा बाहेर खूपच वाहतूक चालू होती व मध्यभागात तर, दुपारी असतो तसा, गजबजाट होता असख्य माणसे मजेत फिरत होती कोणी सिनेमा पाहायला कोणी पबमध्ये कोणी क्लबमध्ये, कोणी जाहिरातीचा चमचमाट थक्क होऊन पाहायला, कोणी कशाला, कोणी कशाला असे लोक फिरत होते आणि लोकाना पाहात आम्हीही फिरत होतो गाडी उभी करायला काही ठिकाणी तर जागाही मिळत नव्हती मिळेल तेथे उभी करून दूरवर चालत जावे लागत होते काही वैशिष्टचपूर्ण जुन्या इमारतींवर मुद्दाम फ्लड लाईटस टाकून सदाच्याच सजवलेल्या असतात त्या पाहात इतर जाहिरातीचा चमचमाट अगावर घेत व लोकाच्या सळसळत्या उत्साहाचा अनुभव घेत आम्हीही बारा-साडेबारापर्यंत फिरत होतो एका चौकात माणसे रस्त्याच्या कडेलाच चित्रकाराकडून स्वत:चे पोर्ट्रेट करून घेत होती. त्यात एक सरदारजी आणि सरदारनी पण बसलेले दिसले दुसरीकडे जुगारी अड्ड्यावर खेळाना ऊत आलेला

होता तिसरीकडे पेय खाद्य पदार्थांवर उपहारगृहातून ताव मा॰ला जात होता एकदरीत जीवनरस फसफसून उतू जात होता धावत्या जाहिरातीतल्या प्रकाशकिरणासारखा उत्साह पसरवून ओसंडून धावत होता न्यूयॉर्क–वॉशिंग्टनमध्ये रात्री थोडी भीती वाटते असुरक्षितता असते पण येथे तिचा लवलेशही नव्हता खूप माणसे–स्त्रिया, पुरुष मोकळेपणे फिरत होते लंडनच्या जीवनाची सकाळ, विमानतळावर एक बाजू पाहिली ही दुसरी अधिक लोभसवाणी होती सकाळची आर्थिक व्यवहाराशी, जीवनकलहाशी निगडीत होती आताची त्या जीवनाच्या मानवी बाजूशी थोडा विसावा घेऊ इच्छिणाऱ्या, मौज करू पाहणाऱ्या नैसर्गिक प्रकृतीशी जुळणारी होती तिचाच विचार करीत, रस्त्यांवरच्या कमी होत जाणाऱ्या गर्दीतून आणि रात्रभर प्रकाशमान राहणाऱ्या दिव्याच्या रागामधून केव्हा घरी परतलो आणि विसावलो ते लक्षातच आले नाही

दुसऱ्या दिवशी सकाळी सौ मीना वहिनींची नाश्त्याची तयारी चालू होती तेवढ्यात जवळच्या खेड्यात नव्याने 'हरे कृष्ण पंथी-यानी कृष्ण आश्रम काढला आहे तो बघून येण्याची कल्पना श्री साठे यानी काढली आश्रमात आता प्रवेश असतो की नाही ते विचारण्यासाठी फोन केला तर पलीकडून हॅलोच्या ऐवजी ऐकू आले, 'हरे कृष्ण ! सगळ्याच औपचारिक शब्दाना हॅलो, गुड डे, वेलकम बायबाय वगैरेंना फाटा देऊन तेथे 'हरे कृष्ण' चा जप होत असतो

आपल्या देवळासारखे एक देऊळ मुख्य दिवाणखान्यात व बाकीच्या खोल्यात, ग्रंथालय, जपाची सोय, सभागार कोठार, राहण्याच्या खोल्या, गोठा व वगैरे सर्व गोष्टी त्या जुन्या 'व्हिल्या' चे रूपांतर करून केल्या आहेत, वातावरण प्रसन्न वाटते पण त्याहून आपल्यासारखेच ढगळ अंगरखे व इतर कपडे घालून, गोऱ्या कातडीचे लोक भजन पूजनात मग्न झालेले पाहून फारच

वेगळा परिणाम आपल्यावर होतो प्रथम तो थोडासा चमत्कारिक वाटणारा प्रकार वाटला तरी आपले आहे ते सोडून हे स्वीकारण्याचे कारण नसतानाही काही ओढीने ते करीत असावेत, असे जाणवल्यावर त्यात काही अर्थ वाटू लागतो आपणही मग नमस्कार करून भेटेल त्याला हरे कृष्ण म्हणू लागतो लंडनमधल्या छोटचा वास्तव्यातला हाही एक नमूद करण्यासारखा अनुभव खचितच होता.

नंतर घरी येऊन सारेच जण लंडनची नेहमीची टूर पण थोडक्याच वेळातली करायला निघालो रात्री पाहिलेले 'सेंट्रल लंडन' आता सुट्टीच्या दिवशीही माणसानी– पण वेगळ्याच गजबजलेले होते त्यात, प्रवासी खूपच होते सेंट जेम्स पार्क, हाईड पार्क आल्बर्ट हॉल, पिकॅडली सर्कस, व्हिक्टोरिया स्टेशन, पार्लमेंट, वेस्टमिन्स्टर, लंडन पूल, राणीचा राजवाडा, पंतप्रधानाचे (नुकताच थॅचरबाईंनी तेथे प्रवेश मिळवलेले) घर, असे सगळे भाग थोड घाईनेच पालथे घातले त्यातल्या त्यात थोडा वेळ शहराच्या मध्यभागातच नव्याने पुनर्बांधित करण्यात आलेला निवासी भाग थोडा अधिक बारकाईने पाहिला इंग्रजाच्या परंपरेस अनुसरून घर व इमारतीनी मध्यभागी तयार केलेला बागेचा भाग पूर्णपणे खाजगी राहावा, इतराना त्यात सहजासहजी प्रवेश करता येऊ नये, यासाठी केलेले प्रयोग, एकदर रचना आकर्षक वाटली वास्तुशास्त्राच्या दृष्टीने त्याची एकदर बांधणी आकर्षक, मनावर ठसा उमटवणारी व नव्या धर्तीची खासच होती

आणखीही कितीतरी पाहण्यासारखे आहेच लंडनमध्ये संग्रहालये आहेत, जुन्या नव्या इमारती आहेत, ओळखीची माणसेही आहेत पण आम्हालाच वेळ नव्हता दुपारची वेळ टळून गेली होती. घरी जाऊन जेवायचे, हॉटेलवर जाऊन सामान बांधायचे व विमानतळावर जाण्याच्या बससाठी सहा वाजता हजर राहायचे म्हणजे लंडन पाहाण्याचा कार्यक्रम आवरता घेणे आवश्यकच होते

तेव्हा म्हटले, चला थोड्या जड अंतःकरणानेच त्या प्रवासी मनाला आकर्षिणाऱ्या आणि सतत ढगाळ वातावरणातल्या लंडनचा निरोप घेतला

सध्याकाळी हॉटेलातून विमानतळावर पोहोचून श्री व सौ कोपर्डेकरांनी वेगवेगळी विमाने गाठण्यासाठी श्री साठे यांची जी तारांबळ उडवून दिली, ती त्यांच्या आयुष्यभर लक्षात राहील शेवट ज्याचा व्यवस्थित होते ते व्यवस्थित झाले म्हणायचे तर मी नैरोबीला व सौ थेट मुंबईला अडचणी न येता ११ तारखेस, पोहोचलो, तेव्हा सारे व्यवस्थितच झाले म्हणायचे

* *

प्रकरण : १२

# केनियाची सफारी

### नैरोबीत आगमन

आफ्रिका खंडातल्या देशाबद्दल प्रत्येकाच्या मनात शाळेतला भूगोल शिकत असताना टारझनच्या गोष्टी वाचताना एक प्रकारचे कुतुहल निर्माण केले जात असते असा जंगलाचा देश, त्यातील काळ्याकुट्ट रंगाच्या पण धाडसी लोकांचे आदिम काळातल्या चालीरीतींवर आधारीत जीवन वगैरे प्रकार आपल्याला पाहायला मिळतील का ? ब्रिटीश प्रवाशांनी केलेल्या सफारींची वर्णने व ते अनुभव अनुभवायला मिळतील का ? असे पुष्कळांच्या मनात येतच असेल मला तरी नक्कीच तसे वाटत होते जागतिक बँकेतर्फे आयोजित केलेल्या वॉशिंग्टनमधल्या अभ्याससत्राच्या शेवटी १२–१३ दिवस केनियात जायला मिळणार आहे हे कळल्यापासून माझे ते आफ्रिकेबद्दलचे कुतूहल जागृत झाले होते, व ते थोडेफार शमवले जाईल असे वाटू लागले होते. अर्थात मुख्य कार्यक्रम नैरोबीतच असेल असे सांगितल्यामुळे हेतू कितपत साध्य होईल याबद्दल मन जरा साशंक होते शिवाय नैरोबीला जायचे ते 'फील्ड वर्कशॉप'साठी, तेथे पत्नीस आणायचे नाही, काम खूप करावे लागणार आहे असेही सांगितल्यावर आपल्याला कितपत पाहायला मिळणार याची शंकाच वाटू लागली पुन्हा आफ्रिका हा विषुववृत्तावरचा उष्ण प्रदेश आम्ही भर जूनच्या पहिल्या आठवड्यात अखेरीस जाणार होतो म्हणजे ऊन वा पाऊस असेल असे

वाटले होते दिलेल्या माहितीपत्रकात थंड, असेल, स्वेटर्सही जवळ ठेवा वगैरे लिहिले होते. कशाचा कशाला मेळ वाटत नव्हता, मग एकदा नीट माहिती मिळाली तेव्हा कळले की, नैरोबी ६,००० फूटापेक्षा उंचावर आहे म्हणजे थंड हवेचे ठिकाणच आणि म्हणून तर ब्रिटिशांनी राजधानी तेथे बसवली असणार हे नंतर डोक्यात आले

केनियाला तसा समुद्रकिनारा व त्याजवळचा सपाटीचा प्रदेश आहे त्यातच मोंबासा हे प्रख्यात जुने बंदर व आता विमानतळ आणि प्रदूषण नसलेला प्रचंड समुद्रकिनारा म्हणून तेथे युरोपातील श्रीमंत पर्यटकांची ही झुंबड असते पोहायचे आणि किनाऱ्यावर पडून राहणे य साठी ! पण या समुद्राजवळच्या सपाटीशिवाय बरेच मोठे क्षत्र ४००० फूटाहून उंचावरचे आहे त्यात अनेक डोंगर, तळी, जंगले व मैदानी प्रदेश आहेत त्यात मोजकीच शहरे किंवा खेडी आहेत ती सोडून जरा बाहेर गेले की, जिराफ, हरणे, रानरेडे, झेब्रा यांचे कळप व पाण्याजवळ इतर वन्य प्राणी आणि पक्षी पाहायला मिळतात. सारा देशच त्यामुळे हौशी पर्यटकाचे आकर्षण स्थान आहे आणि छोटया मोटारी, मिनी बसेस, विमाने, बोटी इ सोयी उपलब्ध असून प्राणीजीवन पाहायला त्यांच्या सहली, नॅशनल पार्कच्या सहली, अशा अनेक तऱ्हेच्या सफारींची व्यवस्था करणाऱ्या कितीतरी कंपन्या व सरकारी विभागही आहेत वरच्या उंच भागात चहा–कॉफीचे मळेही आहेत तोही भाग नयनरम्य आणि पर्यटकांच्या आकर्षणाचा आहे नैरोबी हे तर आंतरराष्ट्रीय संस्थांचे मुख्यालय (युनोच्या दोन विभागाचे केंद्र आहे आणि बऱ्याच आंतरराष्ट्रीय परिषदा तेथे भरतात.) अलिकडेच औद्योगिकरणासाठी, शहरे व खेडयामधून देशाला भेट देण्याचा एकंदरीत चांगला योग आलेला आहे असे जाणवले

लंडनहून रात्री दहाच्या सुमारास विमान सुटले विमानात नैरोबीला कामासाठी जाणारी आतरराष्ट्रीय सस्थाची बरीच मडळी होती, तशीच पुढे जोहान्सबर्गला जाणारी काही गोरी मडळीही होती अतिउच्चावर विमानात रात्र लवकर सपून उजेड खूपच लवकर आला व थोड्याफार उघड्या खिडक्यांमधून उन्हाची तिरीप आल्यावर झोपेचे खोबरेच झाले. मग नैरोबी येण्याची वाट पाहात बसण्याखेरीज गत्यतर नव्हते जवळ आल्या-वर मध्येच कोणीतरी सागितले, खिडकीतून पाहा दूरवर प्रख्यात किलिमाजारू पर्वत दिसत आहे. तसे नीट स्पष्ट काहीच दिसत नव्हते कोठेतरी बोटे दाखवीत लोक पाहात होते इतकेच थोड्या वेळाने पट्टे बाधा, आपल्याबरोबर उड्डाणाचा आनद वाटला, परत उड्डाण करायला यालच, वगैरे घोषणा होऊ लागल्या व लोक नैरोबी विमानतळावर उतरण्याच्या तयारीला लागले.

विमानतळ अत्याधुनिक आहे अगदी इग्लड व अमेरिकेतल्या आधुनिक विमानतळासारखी व्यवस्था आहे. भरपूर गेटस्, विमान अगदी जवळ आणण्याच्या सोयी, दोन मजल्यावर निरनिराळ्या सोयी, तपासण्याच्या व्यवस्था, दुकाने, अनेक तऱ्हेचे विद्युत दर्शक किंवा सूचना फलक वगैरे गोष्टी तेथे आहेत. दिवसातून एकदर उड्डाणे थोडीच असतील आमच्या प्रा सिर्केन याच्यातला अर्थ-तज्ञ लगेच जागा होऊन त्याचे प्रतिष्ठेपायी असा खर्च कसा होतो व बेनिफिट कॉस्ट रेशो कसा पाहिला जात नाही, वगैरे विवेचन ऐकायला मिळाले पूर्वापार म्हणीप्रमाण शहरात जेथून शिरतो त्यावर शहराबद्दलचे मत तयार होते. त्यावरून सांगायचे तर नैरोबीबद्दल आपले मत चागलेच झाल होते एक तर तो अत्याधुनिक विमानतळ व त्याच्या सुनियो-जित, सुसज्ज परिसर व दूरवर उच्च इमारतीनी बनवलेली शह-राची आकाशरेषा व दुसऱ्या बाजूला दाट झाडीची पार्श्वभूमी यामुळे शहराबद्दल एक चागला ठसा मनावर आपोआपच तयार



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३५
भूप्रवास २४००८
१३।१०।८

झाला व अधिक जाणवणाऱ्या कुतूहलानेच त्यात शिरायच्या तयारीला मी लागलो

विमानतळ आधुनिक असला तरी तेथे काम करणारी माणसे आपल्यासारखीच अविकासित देशातली व वसाहतवादी काळातल्या वागणुकीचा, जीवन पद्धतीचा ठसा असलेली, नाना प्रकारचे नियम, बंधने असलेल्या शासकीय पद्धतीच्या वागणुकीची। तेथे सारे उपचार पुरे करून, सामान मिळून, बाहेर पडायला तसा बराच वेळ लागला. अर्थात मंत्रालय, नगरपालिका व इतर संस्थामधले अधिकारी हजर होते मदतीला पण सगळा उपचार तर पुरा झालाच पाहिजे, अशी तेथे कडक पद्धती आहे नंतर तर कित्येक असे अनुभव आले की राजशिष्टाचार सनदी आणि नोकरशाही पद्धतीची व्यवस्था व इतर उपचार सोपस्कार या गोष्टी येथेच निर्माण होऊन मगच ब्रिटिशांनी घेतल्या असाव्यात व इतरत्र पसरवल्या असाव्यात इतके त्या सर्व गोष्टींचा येथे महत्त्व होते व त्याचे पालन करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले जात असो तर विमानतळावरील उपचार पुरे करून सगळे गावात जाणाऱ्या बसमध्ये दाखल झाले आणि बस राजमार्गावरून शहराकडे धावू लागली जातानाही शहराची माहिती दिली जात होती मन ते शहर कसे असेल व आपला तेथला मुक्काम कसा पार पार पडणार आहे, याच्याच विचारात होते

थोड्या वेळातच आमचे उतरण्याचे ठिकाण 'सिक्स एटी हॉटेल' (त्यात ६८० खोल्या म्हणून तसे नाव दिले गेले व सुरुवातीच्या काळात बांधलेले व मध्यम प्रतीच्या दराचे म्हणून बरेच लोकप्रिय आहे वगैरे सांगितलेले होते) आले खोल्या वाटपाच्या सह्या बिह्या करून, खोली शोधण्याचा व सामान तेथे घेऊन लावण्याचा उपचार पार पडला. आणि प्रथम काय केले असेल तर छानपैकी 'टब बाथ' मधली आंघोळ आणि अर्धा पाऊण तास विश्रांती. कारण लंडनमधली धावपळ व विमानातली

अपुरी झोप यानी अंग अगदी आंबून गेले होते, थोडी विश्रांती घेतल्यानंतर बाहेर पडलो पोटपूजा करण्यासाठी हॉटेल शोधून एकात शिरलो येथे अमेरिकेसारखे नाही बरेचसे आपल्यासारखे! पण बरीच महागाई व पाश्चात्य पद्धतीची स्वयंसेवा पद्धतीची हॉटेले सकाळी १० ते ५ या वेळात उघडी असतात तशी प्रत्येक अलिशान हॉटलात नेहमीप्रमाणे महाग रेस्टॉरंटस, चिनी, जपानी आशियाई कॉंटिनेंटल वगैरे जेवण देणारी खूपच आहेत व त्याच्यातल्या जेवणाचा समाचार घेण्याची वेळ या ना त्या प्रसंगाने येतेच आणि सवड असेल तेव्हा जाऊ सध्या पोटभर खाण्याच्या साध्या हॉटेलातच बरे या विचाराने आम्ही २–३ सहकाऱ्यानी मिळून एक शोधून काढून तेथे गेलो होतो तेथले थंड वातावरण व थंड पदार्थ आणि सर्वसाधारण बेशिस्तपणा व मध्यम दर्जाचीच स्वच्छता व पदार्थांची चव यानी प्रथमतःच एकदर आफ्रिकी जेवणाची जी एक शिसारी आली ती पुढे गेलीच नाही, म्हणावे लागेल तरी समोसा, सँडविच असेच पदार्थ घेतले होते अनेक तऱ्हाची व अनेक ठिकाणींची जेवणे (काही घरचीही) घेतली, पण तेथली तयार करण्याची व खाण्याची पद्धती आपल्याशी जमणारी नाही हाच अनुभव आला काही मोजकी ठिकाणे सोडलीच तर! तशी आफ्रिकन माणसे खाण्यात व पिण्यात बहाद्दर दिसून आली. भात व मासाच्या तुकड्याचे वा अन्य पदार्थांचे ढीगच ढीग व दारूच्या बाटल्याच्या बाटल्या रिचवण्याची शक्ती त्याच्यात आहे व त्याना अगदी चवीने आणि मनापासून आपल्या समोरच्या पदार्थांचा फन्ना उडवताना पाहणे हा एक अनुभवच आहे तसे सगळे बार्स, उपाहारगृहे, कॉफीपानगृहे, सदोदित भरलेली असतात येथे परदेशी लोकही सतत व मोठ्या सख्येने येत असल्याने शहराच्या मध्य भागातली हॉटेले, दुकाने व रस्तेही नेहमीच भरले–फुललेले असतात

दुपारी लगेच नगपालिकेत, शहराची माहिती देणे, अधिकाऱ्यांशी परिचय व गटागटांनी जी पाहणी व अहवाल, सध्याची

लोकसंख्या सहा लाखावर असून ती १९८५ पर्यन्त १२ लाखांवर जाईल व शतकाच्या शेवटी ३० लाखावर जाईल, असा अंदाज आहे येणाऱ्या स्थलांतरितांना विशेषत गरिबांना घरे मिळवून देणे, सर्वसेवा/सोयीत वाढ करणे, वाहतूक वगैरे समस्यांचा उहापोह चालू होता त्यावर चर्चा वगैरे कार्यक्रम होते थोडा वेळ नाविन्याचा असला तरी असे कार्यक्रम कंटाळवाणे असतात. त्यातून सगळेच प्रवासातून आलेले. तेव्हा तो सगळा प्रकार केव्हा संपेल असेच सगळ्यांना झाले होते काहींनी हळूच मागे बसून डुलक्याही काढल्या असाव्यात अशी मला शंका आली.

तेथला कार्यक्रम संपल्यावर समोरच असलेल्या जोमो केनयाटा कॉन्फरन्स सेंटरला भेट होती केनयाटा हे या देशाचे पहिले राष्ट्रपती आणि स्वातंत्र्य लढ्यातले व देशाची नव्या प्रकारे जडण घडण बसविण्यात अग्रभागी असलेले पुढारी साऱ्या आफ्रिकेत त्यांना मान होता नेहरूंशीही त्यांचे चांगले मैत्रीसंबंध होते अशा केनयाटांचे नाव विमानतळ व एका प्रमुख रस्त्याला दिलेले आहेच. पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे हे 'कॉन्फरन्स सेंटर' नार्वेजियन वास्तुशिल्पकाराने त्याचा आराखडा खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण बनवलेला आहे एक उंच गोलाकार इमारत, दुसरी पाया गोल पण वर पिरॅमिडसारखी एका बिंदूकडे निमुळती होत जाणारी परिषदा भरवण्याच्या सभागृहाची इमारत, दुसऱ्या बाजूला बैठ्या, आडव्या व तिरप्या रेषांची लांबट इमारत यांची एक आकर्षक रचना तेथे केली गेली आहे.

नैरोबी शहराच्या मध्यभागी हे केंद्र आहे व दूर अंतरावरून दिसत राहिल्याने शहराची खूण म्हणून त्याची प्रतिमा निर्माण होत आहे १९७३ साली त्याचे उद्घाटन झाले आफ्रिकन एकता परिषदही तेथेच भरली होती जागतिक बँक व इतर मोठ्या संस्थांच्या परिषदा तर नेहमीच होतात दुसरा दिवस अधिक गडबडीचा होता. गृहनिर्माण खात्याच्या 'कायम सचिवा' बरोबर चर्चा, नगरपालिकेच्या अधिकाऱ्याबरोबर

चर्चा व शिवाय नैरोबीच्या पश्चिम आणि पूर्व अशा दोन्ही टोकाना बसवण्यात आलेल्या नव्या घरबांधणी प्रकल्पाना आणि त्या भागात असलेल्या झोपडपट्ट्यांना भेटी द्यायच्या होत्या. सकाळच्या दोन चर्चांच्या मधल्या काळात फक्त पाच—दहा मिनिटे चहाला मोकळी सोडल्यास, त्यातही चहाचे कप हातात धरून चर्चा विषयावरच बोलणी चालू होती सबंध सकाळ अगदी अकरा वाजेपर्यंत माहिती मिळवणारी चर्चाच होती अकरा ते दोन या काळात शहराच्या पूर्वेकडील भागाला भेट झाली त्यात एक पेठ वसवून घरे बांधून काही महिने तयार असलेली व बाजूने गवत—झाडोरा वाढलेला पाहायला मिळाला कारणे आपल्या-कडच्या सारखीच प्रशासकीय अडचणी, कंत्राटदाराबरोबरचे वाद, वाटपामधल्या अडचणी, सुरेख टुमदार रंगवलेली नवी कोरी घरे पण भोवती माणसे वावरण्याऐवजी झाडोरा वाढत होता व प्राणी वावरत होते. त्या भागातली एक मोठी झोपडपट्टी व ती सुधारण्याचे प्रयत्न म्हणजे गगनाला गवसणी घालण्याचा प्रयत्न वाटला इकडचा शहराचा इतर भाग मात्र सुरुवातीपासून युरोपियन व इतर उच्चभ्र लोकांच्या बंगल्यांचाच असल्याने अगदी शांत, रेखीव व स्वच्छ असा दिसत होता झोपड्या, रस्त्या-कडचे स्टॉल्स काही नव्हते तेथील फेरी संपवून शहराच्या मध्यभागात जेवणासाठी परतलो

पण मुख्य म्हणजे यूनोच्या एका संस्थेचे (हॅबिटाट सेंटर) मानवी वस्त्यांवरील अभ्यास, संशोधन वगैरेसाठी चालवण्यात आलेले केंद्र तेथेच वसवण्यात आलेले आहे मधल्या अठ्ठावीस मजली इमारतीत ते आहे वरच्या २७ व २८ व्या मजल्यावर उपहारगृहे आहेत व अगदी वर फिरते उपाहारगृहही आहे सबंध शहराचा देखावा तेथून दिसतो आम्ही गेलो तेव्हा मोकळी हवा व निरभ्र आकाश असल्याने सगळ्यांचे कॅमेरे क्लिक क्लिकत होते.

जवळचे ४००० माणसे बसू शकणारे सभागृह हे स्टेडियम-सारख्या निरनिराळ्या उचीवर बसवण्याच्या सोयी ध्वनिक्षेपण, भाषातर वगैरेंच्या वैशिष्टचपूर्ण सोयी व आतील उच कळसाकृती घुमटाची छप्पराची योजना यामुळे एक गभीर व परिषदेस योग्य वातावरण तयार होते शिवाय ७०० माणसे बसू शकतील अशी आणखी दोन सभागृहे व तितक्याच बैठकाचे एक प्रेक्षागृह तेथेही सहा भाषातून भाषातराची सोय असलेले असे ते सारे केंद्र वैशिष्टचपूर्ण व भारून टाकणारे आहे

सध्याकाळी हॉटेलकडे परत जाताना रस्त्याची व शहराच्या त्या भागाच्या भूगोलाची नीट माहिती करून घेतली मी एका अभ्यासगटाचा अध्यक्ष असल्याने गटाची पहिली सभा घेऊन कामाचे कसे काय करायचे त्याची चर्चा हॉटेलवर जाऊन ठरवून घेतली पुन्हा सध्याकाळच्या पोटपूजेची समस्या होती, ती एक भारतीय जेवण देणारे जरा थोडे दूरवरचे हॉटेल शोधून काढून तेथे राईस प्लेट खाऊन सोडवली आणि हॉटेलवर येऊन सामान थोडे नीट लावून नैरोबीतल्या पहिल्याच दिवसाची झोप घेण्यासाठी छानपैकी ताणून दिली

जेवणानतर शहराच्या पश्चिम भागाची फेरी होती. दडोरा हा अल्पउत्पन्न गटासाठी घरबाधणी प्रकल्प, मथारे व्हॅली ही प्रसिद्ध व फार मोठी झोपडपट्टी आपल्या मुबईतल्या धारावी सारखीच मथारे इझ एव्हरीव्हेअर इन द वर्ल्ड अशी एक म्हणच आमच्या अभ्यासस‌त्रात पडून गेली होती किबेरा, बुरु, उमोजा (अमेरिकन मदतीने उभारलेला) घरबाधणी प्रकल्प या भागाना भेटी होत्या माहिती घेताना पुष्कळ अडचणी, काही नव्या कल्पना, सामाजिक स्थितीची कल्पना, व्यवस्थापन व सामाजिक गटातले सघर्ष, जमीन मालकांचे हितसबध कायदेबाजी व सुधारणा कार्यक्रमातील इतर अडचणी व एकदर लोकाच्या राहाणीची स्थिती याबद्दल खूपच माहिती मिळत होती सपूर्ण शहर त्या दिवसात पाहून होणे शक्यच नव्हते पण प्रकल्पाच्या जागा व समस्यानी वेढलेले

भाग बरेचसे पाहून झाले होते शिवाय प्रत्येक अभ्यासगटाला आपल्या कामाची चर्चा करायची होती तेव्हा सध्याकाळी अधार पडू लागल्यावर त्या दिवसाच्या भेटीगाठी थाबवण्याचा निर्णय घ्यावाच लागला

हॉटेलवर परतल्यावर थोडा विश्राम व गटवार चर्चा झाल्यावर सगळेच थोड्या करमणुकीसाठी, पाय मोकळे करण्यासाठी बाहेर पडलेले दिसले तसे फार अधार झाल्यावर दूरवर एकटे दुकटे हिडू नका अशा सूचना आम्हाला दिलेल्या होत्या पण त्या मध्य भागात गटागटाने हिडणारे स्थानिक आफ्रिकन व बाहेरचे प्रवासी तसे ११–१२ वाजेपर्यंत आढळतात दिव्याचा लखलखाट कॅसिनो, नाईट क्लब्स, पब्स व रेस्टॉरन्टमधून जाणारे–येणारे स्त्रीपुरुष, नुसतेच विडो शॉपिग करणारी माणसे व आमच्यासारखी एखादे बऱ्यापैकी हॉटेल शोधून चटकन् जेवून परत हॉटेलमधल्या उबदार वातावरणाच्या आश्रयाला येणारे; असे सर्वच तऱ्हेचे लोक हिडत असतात

कोणत्याही विकसनशील देशासारखेच येथेही वातावरण आहे गोऱ्या प्रवाशाच्या मागे लागणारे इतर लोक व स्थानिक उच्चभ्रू आणि मध्यम वर्ग या सर्वांच्या वेगवेगळ्या करमणूक, उपाहार वगैरेच्या सोयीच्या दृष्टीने पाहिले तर ! प्रवाशाकडून वस्तूच्या किमती व सेवा शुल्काच्या नावावर भरपूर पैसेही काढले जातात काही प्रमाणित किमतीची दुकाने सोडली तर ! साध्या स्थानिक टेलिफोनला पण दोन शिलिग (साधारण रु १–८४) व आतर-राष्ट्रीय कॉलवर तर तीस टक्के सेवा शुल्क तेही पूर्वसूचना न देता ! मुबईला फोन लावला तर १३० शिलिंग बिल लावले गेले, अशी तऱ्हा आहे

* *

प्रकरण : १३

# नैरोबी आणि नकुरूचा फेरफटका आणि परतीच्या प्रवासाची तऱ्हा

पहिले दोन दिवस औपचारिक कार्यक्रम, सर्वसाधारण माहिती मिळवणे व शहराचा फेरफटका यात गेले, तर पुढचे तीन दिवस अभ्यासगटाच्या कामात अगदी गडबडीचे गेले खूप माहिती मिळवायची होती 'रोजगार प्रवर्तन' कार्यक्रमांचा, शहर व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून अभ्यास करून, मूल्यमापन, शिफारशी वगैरेंचा अहवाल तयार करायचा होता काम जरा मोठ्या आवाक्याचे व थोड्या वेळात न होणारे होते मिळालेली माहिती व दिलेल्या भेटी मात्र फारच उद्‌बोधक वाटल्या. लोकामध्ये 'आन्त्रप्रेनरशिप' उद्योजकता निर्माण होऊन त्यानी कारखाने काढावेत–चालवावेत व उत्पादन वाढवावे यासाठी चालवलेले प्रयत्न स्पृहणीय वाटले केनिया इडस्ट्रियल इस्टेटस ही सरकारी पातळीवर वरच्या पातळीवरच्या उद्योजकतेसाठी प्रयत्न करणारी सस्था, तर नॅशनल ख्रिश्चन कौन्सिल ऑफ केनिया ही गरीब–गुरीब, झोपडपट्टीत राहाणारे यांच्यामध्ये, आर्थिक पातळी वाढवून, व्यापार, उद्योग, रोजगारी वाढवण्यासाठी प्रयत्न करणारी सस्था, तसेच सरकारी व नगरपालिकेचे कायदेकानू याचा अभ्यास करायला मिळाला. त्यातली काही निरीक्षणे व निष्कर्ष नोंद घेण्यासारखे आहेत

आफ्रिकनाची, पूर्वी आलेल्या आशियाई लोकानी, पिळवणूक केली व सर्व व्यापारधदा स्वत कडे ठेवला, अशी एक सर्वसाधारण

भावना लोकामध्ये आहे त्यामुळेच आफ्रिकन व्यापार, उद्योग व एकदर उपक्रमशीलता वाढवून औद्योगिक व सामाजिक प्रगती करण्यासाठी खास प्रयत्न करण्यात येत आहेत प्रशिक्षण, परवाने, साह्य या साऱ्या बाबतीतच, आफ्रिकनांना झुकते माप देण्यात येत आहे. केनिया इडस्ट्रियल इस्टेटस ही संस्था, औद्योगिक वसाहती स्थापन करते इतकेच नव्हे तर प्रकल्पाचे अहवाल तयार करते. परदेशातून यंत्रे खरेदी करून, कर्जाऊ म्हणून देते, यंत्र दुरुस्ती करून देते, बाजारपेठ मिळवायला मदत करते, जरा लहान उद्योजकाना यंत्रशाळेत, भाड्यावर यंत्रे व जागा वापरायला उपलब्ध करून देते व शक्य असेल ती सारीच मदत करून ग्रामीण उद्योग केंद्रातून वा शहरी औद्योगिक वसाहतीतून औद्योगीकरणाला व समाजाच्या आधुनिकीकरणाला मदत करीत असते त्यासाठी, भारत व युरोपीय देशाचे पुष्कळ साह्य त्यानी मिळवलेले आहे व मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे बरेच युरोपीय तज्ञ तेथे आहेत व हळूहळू स्थानिक तज्ञ तयार होत आहेत भारतातल्या प्रगतीबद्दल बरेच आस्थेने बोलले जाते व आपल्याकडून तांत्रिक मदत हवी असल्याचेही जाणवते

दुसऱ्या टोकाला नॅशनल ख्रिश्चन कौन्सिलने गरिबामध्ये, झोपडपट्टीनिवासियामध्ये उद्योजकता वाढविण्यासाठी बरेच प्रयत्न चालवले असल्याचे दिसून आले दोन यंत्रशाळामध्ये एकात गरजू स्त्रिया व दुसऱ्यात तरुणाना निरनिराळ्या तऱ्हेची खेळणी, कपडे, दागिने वगैरे तयार करण्यासाठी सर्व साह्य उपलब्ध करून देण्यात आले आहे, तयार माल विकण्यासाठीही मदत केली जाते आणि छोटा व्यापार सुरू करण्यासाठी बिनव्याजी कर्जहि मिळवून दिले जाते शिक्षण, कर्ज बाजारपेठ मिळवणे व यंत्रसामुग्री व जागा मिळवणे अशा सर्व तऱ्हेच्या कामासाठी साह्य उपलब्ध होत आहे अर्थात् गरजेच्या मानाने ते बऱ्याच लहान प्रमाणावर आहे. पण स्वयसेवी संस्था ते करीत आहेत हेही लक्षात घ्यायला हवे अजून व्यापारी बँका या क्षेत्रात पडलेल्या नाहीत, पण सहकारी बँका थोडीफार कर्जे देतात.

दोन संस्थाचे कार्य, नगरपालिकेचे छोटे व्यापारी, हातगाडी-वाले व लहानसहान रस्त्याकडेचे बाजार याबद्दलची धोरणे वगैरे गोष्टींचा तपशीलवार अभ्यास करणे, त्यावर विचार करून शिफारशी तयार करणे, त्याच्यावर होणारा काथ्याकूट, जागेला भेटी असे आमचे ३ दिवस धादलीत चालले होते तेव्हा सप्ताहान्त विश्रांतीसाठी, नकुरू नॅशनल पार्क व केरिचो या थंड हवेच्या ठिकाणच्या चहामळ्याच्या गावाला भेट असा कार्यक्रम ठरल्या-वर आम्हा सर्वांनाच बरे वाटले अर्थात तेथेही नगरपालिका कमिशनर यांना भेटी, चर्चा वगैरे होतेच जागतिक बँकेतर्फे आलेले लोक म्हणजे त्याचे स्वागत-राजशिष्टाचार पाळून, राष्ट्रीय पोषाख घालून, स्वागत–निरोप भाषणे करून अधिकारी व लोकनियुक्त प्रतिनिधींनी त्यांच्या दर्जाला शोभेल अशा तऱ्हेने करणे अत्यावश्यक, असा तेथे दंडकच असल्यासारखे दिसले

शनिवारी सकाळी आठच्या सुमारास बसने आम्ही सगळे निघालो हवा एकदम पावसाळी, धुक्याने कुंद झालेली व एकंदर कार्यक्रमास अगदी अनुत्साहकारक होती बसने नैरोबी सोडून, ग्रामीण भागातला पहिला घाट चढल्यावर थोडी विश्रांती घ्यायचे ठरवले दरीचा सुंदर देखावा पण तो धुक्याने फारसा नीट दिसू शकत नव्हता. मात्र कुठूनसे तिथे काथ्याच्या अनेक शोभेच्या वस्तू विकणारे जमले आणि त्याच्याशी किंमतींचा काथ्याकूट व थोडीफार खरेदी यात दहा मिनिटे छान गेली पुन्हा पुढचा प्रवास सुरू झाला वाटेत रस्ता थोडा खराब असल्याने नकुरूला पोचायला उशीर झाला व तेथे वाट पाहात थांबलेल्या नगराध्यक्षाना व कमिशनराना दुसऱ्या कार्यक्रमासाठी जायचे असल्याने त्यानी त्यांच्या प्रतिनिधींना थांबवून ठेवले होते सामूहगीत, स्वागत, परिचय, चहा वगैरे झाले व त्या छोट्या पण डिव्हिजनच्या मुख्यालय असलेल्या गावातून फेरफटका मग नॅशनल पार्कमधल्या एकमेव हॉटेलमध्ये अतिशय चवदार पण फार महागडे जेवण

अशा कार्यक्रम क्रमाने पार पडत गेला व त्यानंतर नकुरू पार्कच्या तळ्याभोवतीच्या फेरीला सुरुवात झाली

अधुनमधून विविध झाडांची जंगले, हरणांचे कळप व पक्ष्यांचे थवे दाखवले जात होते, त्यांच्या राहणीच्या पद्धती सांगितल्या जात होत्या काही भाग केवळ नरांचे-ब्रह्मचारी आश्रम, तेथे माद्यांना हाकून लावले जाते काही भागात खूप माद्यांचा कळप व एकच नर, दुसरा आला तर त्याला हाकून लावले जाते फ्लेमिंगो पक्षांचे कळपच्या कळप-लक्षावधींच्या संख्येने तेथे उतरतात, विहार करतात असे सांगितले जाई पण हल्ली संख्या कमी होऊ लागली आहे, त्याचे कारणही मोठे विचार करण्यासारखे आहे तळ्याच्या काठी फार डास होऊ लागले, तेंव्हा त्यांची अंडी खाऊन टाकणारे विशिष्ट जातीचे मासे तेथे आणून सोडण्यात आले तर त्या माशांनी फ्लेमिंगो पक्षांना आवडणारे छोटे मासे किडेही खाऊन टाकायला सुरुवात केली. त्यामुळे ते पक्षी कमी येऊ लागले आहेत जंगलात जिराफ, माकडे व इतर काही प्राणीही आहेत तळ्याच्या पाण्याच्या पातळीत सतत वाढ होत असल्याने आजुबाजूचा भाग व रस्ता यांच्यावर सतत आक्रमण होत आहे त्यावर करावयाच्या उपाययोजनेवरही विचार करावा लागत आहे नकुरु नॅशनल पार्कची सहल, तशी, प्राणी व पक्षी फार पाहायला न मिळाल्याने लाभदायक ठरली नाही व पावसाळी हवा व चिखल असल्याने बसच्या बाहेर हिंडताही आले नाही पण नैसर्गिक मोकळ्या हवेत २-४ तास फेरफटका केव्हाही चांगलाच असे मानून आमची बस केरिचोच्या वाटेला लावण्यात आली पण तिने तिथूनच कटकट करायला सुरुवात केली आणि पुरता अंधार पडून गेल्यावर ती एका ठिकाणी चक्क बंदच पडली मग येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्या थांबवायचे प्रयत्न सुरू झाले ! कोणी जरा वेग कमी करी व भरधाव निघून जाई, कोणी भीतीने थांबवतच नसे वगैरे अनुभव आले. अखेरीस एका मोठ्या ट्रकने सर्वांना घेतले व सिमेंट-चुन्याच्या माखलेल्या व उंच ट्रकातून सारी मंडळी

एकदाची केरिचो टी हॉटेल या मुक्कामाला पोहोचली. तेथील खोल्या घेणे, सध्याकाळचे जेवण, विश्रातीच्या दिवसानिमित्त थोडीफार गाणी–गप्पा वगैरे कार्यक्रम होऊन झोपेच्या आधीन झालो

८००० फूट उचीवरच्या त्या निसर्गरम्य ठिकाणची, दुसऱ्या दिवशीची रविवारची सकाळ. हवा जरी ढगाळ असली तरी ताजी टवटवीत वाटत होती, टेनिस खेळू इच्छिणारे कोर्टाकडे पळाले होते माझ्यासारखे प्रदेश पाहू इच्छिणारे, क्षितिजापर्यंत पसरलेले चहामळे व जगले पाहात दुर्बिण व कॅमेरा घेऊन प्रभात-फेरी काढायला निघाले होते तर काहींनी, स्थानिक दगडी व स्मरणवस्तू विकणाऱ्याची दुकाने धुडाळायला सुरुवात केली होती काही अजून साखरझोपेत लोळत असावेत, काही केरिचो टी हॉटलमधल्या रुचकर नाश्त्याचा आस्वाद घेत रेस्टॉरटमध्येच बसून होते त्या आवारात, १९२८ साली प्रथम लावलेले व आता मोठे झालेले चहाचे झाड मला पाहायला मिळाले, तशीच हिरव्यागार व दाट चहामळ्याची शोभाहि

नऊ साडेनऊच्या सुमारास सगळे एकत्र जमले एव्हाना स्थानिक अधिकाऱ्यानी धडपड करून एका बसचीहि व्यवस्था केली होती मग सगळे चहा मळा व चहाचा कारखाना पाहायला गेलो वाटेत क्विनाईनची लागवडही पहायला मिळाली, कोणी फादी घेऊन औषध म्हणून चघळायला सुरुवात केली आणि कडू म्हणून टाकून दिली, चहाची लागवड, तोडणी, गुणवत्ता नियत्रण व एकंदर पॅकबद चहा निर्मिण्याची प्रक्रिया यावर तेथे चहातज्ञ गोऱ्या साहेब ने लांबलचक व्याख्यानच दिले व चहाची चवही प्रयोगशाळत कशी तपासली जाते ते दाखवले हिरव्या पानावर विशिष्ट चाळण्यातून नेऊन ठराविक तपमानात ठेव-ण्याने विशिष्ट सेद्रिय प्रक्रिया होऊन त्याचे आपल्याला परिचित चहापत्तीत कसे रूपातर होते, हे पाहणे हे मनोरजक असले तरी त्यापेक्षा आपला चहा पिणे हे अधिक रुचकर व रजक यात

शका नाही पण ही आमच्या मनातली भावना त्यानी जाणली असावी कारण लगेच जिल्हाध्यक्षाच्या हस्ते प्रत्येकाला एकेक चहापुडा देण्यात आला दार्जिलिंग व सिलोन चहाच्या तोडीला आम्हीही उतरतो व केनियन चहा लडनच्या बाजारात चांगला ठरतो हेही वर आवर्जून सागण्यात आले आपल्याकडे तयार झालेली यत्रसामुग्रीही तेथे आढळली आणि माणसेही भारतात प्रशिक्षण घेऊन येतात असे समजले शिवाय ब्रुकबाँड, लिप्टन या कपन्या जगभरचा चहा घेऊन विशिष्ट मिश्रणे वा खास पॅकिग्ज आपल्या नावावर करतात याचाही हळूच पत्ता लागला

चहा मळयानतर, नगरपालिकेत एक अधिकृत स्वागत समारभ, परिचय विधी होता व नतर गावाचा छोटासा फेरफटका आणि दुपारचे जेवण जिल्हाध्यक्षानी त्याच्या बगल्यावर माडव घालून आयोजित केलेले होते सुदैवाने तेव्हा पाऊस आला व कार्यक्रम छान पार पडला

दुपारी पुन्हा वाहतूक व्यवस्था करण्यासाठी धावपळ करून अधिकाऱ्यानी चांगल्या 'टुरिस्ट कार्स' मिळवून दिल्या व त्या अलिशान गाड्यातून आमचा सगळा काफिला परत निघाला आता गट छोटे झाले होते व ज्याला जसे आले तसे सहप्रवासी घ्यावे लागल्याने प्रथम थोड्या कुरबुरी, मग तडजोडी व एकदर प्रवासात आजुबाजूचे सृष्टीसौंदर्य पाहात गप्पा, आतापर्यंतच्या कार्यक्रमावर टीकाटिप्पणी, नकला वगैरेंनी प्रत्येक गाडीत मडळी रगून गेल्याचे आढळले वेगावर जरा बधन घातल्याने चालक मडळी मात्र कुरकुरत होती त्यांना जाऊन परतायची इच्छा होती, तर आमच्या गतीने त्याना नैरोबीत मुक्काम करावा लागणार होता गाड्यातून टेपरेकॉर्डवर, पाश्चात्य व थोडे आफ्रिकन सगीत ऐकणे, आफ्रिकन प्रवासव्यवस्थाची माहिती मिळवणे वगैरेही त्या चालकामुळे शक्य झाले नैरोबीत शिरताना आता आपण नैरोबी शहरात उतरत आहोत, आपल्या बरोबरील प्रवासात आनद वाटला, पुन्हा योग येवो, वगैरे हवाईसुदरींच्या

पद्धतींच्या घोषणा आम्ही गाडीत करून तो विश्रांतीचा सप्ताहान्त संपवला

पुढचे दोन दिवस अभ्यासगटाचा अहवाल पुरा करणे, त्यासाठी राहिलेली माहिती मिळवणे, एखाद्या राहिलेल्या जागेला भेट देऊन येणे व चर्चा आणि मसुदे, पुन्हा अंतिम मसुदे अशा धावपळीत गेले अहवाल टंकलेखनासाठी रवाना झाल्यावर थोडे हायसे वाटले त्यानंतरच्या दिवसासाठी युनोच्या दोन संस्थांना भेट देण्याचा भरगच्च कार्यक्रम होता, एक शहरातच केनयाटा सेंटरमध्ये व दुसरी दूरवर उपनगरात होती तेथील चर्चा माहितीपूर्ण होत्या व बरेच साहित्य वाचायला देण्यात आले आणि लघुपट, स्लाईडसही दाखवण्यात आले.

युनोच्या संस्थांचा पसारा आणि एकंदर व्यवस्था बघण्यासारखीच असते बरीच सुसज्ज कार्यालये, तज्ज्ञ मंडळी, त्यांना सर्व सोयी यामुळे अशा संस्था शहरात येऊन शहराच्या वाढीला बराच हातभार लागतो (घरभाडी भरमसाठ वाढताच ही गोष्ट अलाहिदा) इतर तज्ज्ञ येत–जात असतात, परिषदा होतात, स्थानिक प्रश्नांना प्रसिद्धी मिळून कोठून तरी मदत वा कर्ज मिळू शकते. नवे नवे उपक्रम घेतले जातात व शहर प्रसिद्धीच्या झोतातच राहते काल स्टॉकहोमहून आलो, पुढच्या आठवड्यात न्यूयॉर्क, पुढच्या महिन्यात दिल्ली, मनिला असा कार्यक्रम सांगणारे बडे लोक तेथे भेटत असतात. अशा एकदोन यूनोच्या संस्था आपल्याला नव्या मुंबईत आणता आल्या, तर त्या शहराच्या वाढीला केवढी चालना देता येईल असा विचार माझ्या मनात चमकून गेला, त्यासाठी फार वरच्या पातळीवरून प्रयत्न करावे लागतील. पण युनोत म्हणे खूपच भारतीय मंडळी आहेत, मग ते आपल्याला का जमू नये असे आपले वाटत राहिले (कदाचित तीच आपली अडचण असू शकेल !)

युनोची दुसरी संस्था युनायटेड नेशन्स एन्व्हायरमेंट प्रोग्रॅम ही नैरोबीच्या एका उपनगरात, अतिशय नैसर्गिक वातावरणाच्या

परिसरात वसवण्यात आलेली आहे टेकड्या, झाडी, छोटी तळी यानी विनटलेल्या परिसरात अतिशय कार्यावर्ती (फक्शनल) अशा सुबक एक वा दोन मजली सलग लाब रागेच्या इमारतीची रचना करून अतर्भागात फारच चागले असे पर्यावरण तेथे निर्मिण्यात आले आहे पर्यावरणाचे सशोधन, विश्लेषण वगैरे प्रकारचे काम तेथे चालत असते बरीच मोठमोठी अनुभवी व निरनिराळ्या देशामधली तज्ञ मडळी तेथे आहेत, गणकयत्रे आहेत वृक्षतोड व मलेरिया याच्यावर दोन चागले लघुपट, प्रदूषण नियत्रणावर एक स्लाईडशो व छोटी व्याख्याने आणि चर्चा असा बराच मोटा कार्यक्रम तिथे आमच्यासाठी पार पडला अशा वातावरणात, असे सशोधनात्मक काम करणाऱ्याचा खरोखरच हेवा वाटला केनियात अजून प्रदूषणाची समस्या फारशी उद्भवलेली नाही त्यामानाने आपल्याकडे खूपच मोठी आहे, तेव्हा असे काम आपल्या इथे झाले असते तर आपल्याला खूप उपयोग तरी झाला असता, असेही वाटले

त्यानतरचा दिवस, अभ्यासगटाच्या अहवालाचे वाचन, केनियन अधिकाऱ्याबरोबर चर्चा आपल्या अहवालावरच्या इतराच्या शेऱ्याना उत्तरे देणे वगैरे कार्यक्रमात बुडून गेला त्याचबरोबर आपला कार्यक्रम व येथील मुक्काम सपत आल्याचीही जाणीव झाली त्या दिवशीच्या कार्यक्रमात, दुपारी मधल्या वेळात हॅबिटॅट सेंटरमधील एक पाकिस्तानी अधिकारी (पूर्वी बिहारात वाढलेले व मूळच्या भारतीय प्रशासन सेवेतले) श्री करीम यांनी घरी नेऊन आग्रहाने दिलेले जेवणही लक्षात राहण्यासारखे होते त्याच्या घरी जगभरच्या निरनिराळ्या धार्मिक मूर्तींचे कलात्मक असे प्रदर्शनच पहायला मिळाले. ते रहात असलेला भाग मुबईच्या मलबार हिलसारखा वैशिष्ट्यपूर्ण रचनेचा व नीटनेटका होता सारे बंगलेच होते त्या भागात जाण्या येण्यात मात्र वाहतुकीने बराच खोळबा केला. त्याच दिवशी गृहनिर्माण विभागाच्या सचिवानीही घरी निरोपाची पार्टी दिली व स्वत. आफ्रिकन गाणी म्हटली

मुक्काम सपत आल्याची जाणीव झाल्यावर मिळेल तेवढ्या वेळात, न पाहिलेले भाग पाहणे, नैरोबीच्या वैशिष्टचपूर्ण कलात्मक वस्तू पाहून काही खरेदी, ओळखीच्याचे निरोप याची गडबड उडून गेली अभ्यासस‌त्राच्या शेवटच्या दिवशी एकूण सत्राचे मूल्याकन करणारे एक सकाळचे अधिवेशन होते, दुपारी नैरोबीची नॅशनल पार्कला अधिकृत भेट व सध्याकाळी अभ्याससत्राच्या प्रमाणपत्राचा वितरण समारभ होता

दुपारची नॅशनल पार्कची भेट काहीशी सस्मरणीयच ठरली. एक तर तीन कोम्बी (मिनी बसेस) पैकी नेमक्या आमच्या कोम्बीचा काही भाग जळायला लागून तीतून वाटेत उतरून अडकून पडावे लागले. मग दुसरे वाहन मिळेपर्यंत बराच वेळ वाया गेला नतर पार्कमध्ये फिरण्यापूर्वी, अधिकृत सहल म्हणून भले थोरले व्याख्यान ऐकावे लागले त्यात नॅशनल पार्कची राखण करण्यातल्या अडचणी व इतर नागरी भू-वापराचे आणि विमानतळ वगैरेचे त्याच्यावरील आक्रमण व प्रभाव याची चर्चाच अधिक होती अर्थात नागरी व्यवस्थापन क्षेत्रातले म्हणून आम्हाला मुकाटपणे ऐकून घेणे भागच होते नतरही आत फिरायला गाड्याची सोय होईपर्यंत म्हणून शेजारचे 'अनाथालय' पाहायला नेण्यात आले ते होते, आईबाप नसलेल्या वन्य प्राण्याचे बछडे वाढवण्यासाठी केलेले छोटेसे उपवन त्यात छोटे वाघ, सिंह, झाडावर चढून बसलेले चित्ते, अस्वल चिंपाझी, काही पक्षी असे सर्वच प्रकारचे प्राणी होते व अगदी लहान जाळ्याच्या कुपणातून खूपच जवळून पहायला मिळत होते पण खरे लक्ष लागले होते मोकळ्या वातावरणातले वन्य प्राणी पाहण्याकडे अखेर एकदाच्या गाड्या आल्या व त्यातून आमच्या सफाऱ्या निघाल्या कोठे कोणता प्राणी दिसला की सारा गाड्याचा काफिला उभा राही, दुर्बिणी, कॅमेरे सरसावत बरेच हरणाचे, जिराफाचे, रानरेड्याचे कळप, एक दोन हिप्पो, काही पक्षी असे

प्र।णी पहायला मिळाले. वाघ, सिंह क्वचित दिसतात असे सांगितले गेले पुरता अंधार पडपर्यंत सारा पार्क धुंडाळून मग आम्ही परत फिरलो

हॉटेलवर येऊन जरा ताजेतवाने होतो न होतो तोच प्रमाणपत्र वितरण व अधिकृत भोजन समारंभासाठी जाण्याची वेळ झाली इतराप्रमाणे मीही यावेळी पारंपारिक वेष घालायचे ठरवले होते टायसूट याएवजी तेव्हा नेहरूशर्ट–पायजमा घालून गेलो एक ब्राझिलीयन सरदारजीच्या वेषात आला होता, तर मेक्सिकन मुलीने साडी नेसली होती आफ्रिकनांनी ही आपले पारंपारिक वेष घातले होते समारंभ थोडा भावनाप्रधान भाषणांचा आणि शानदार होता अभ्याससत्राचे संचालक श्री शिवराम कृष्णन इतके भावविवश होऊन बोलतील असे वधीच वाटले नव्हते आमच्यातल्याच एका मलेशियातल्या प्रतिनिधीने आभाराच्या भाषणात प्रत्येकाची स्वभाववैशिष्टये एक दोन वाक्यात पण हसत खेळत, चिमटे घेत सांगितली व नंतर गलबलून येऊन जो तो प्रत्येकाचा निरोप घेऊ लागला ओळख ठेवा असे सांगू लागला, नंतर पावसात भिजत हॉटेलात यावे लागल्याने तो निरोप समारंभ चांगलाच लक्षात राहिला

दुसऱ्या दिवशी जो तो आपले सामान बांधणे, विमानातील सीटची व वेळेची खात्री करून घेणे, शहराचे उरलेसुरले फोटो बिटो काढून घेणे, वगैरे गडबडीत होता माझे व आणखी ५–६ जणांचे संध्याकाळी ६।। चे विमान होते म्हणून खात्री करून घेऊन आम्ही ३।। वाजता बाहेर पडलो तर विमानतळावर पोचल्यावर सांगण्यात आले, विमान उशीरा सुटणार, वेळ सांगता येत नाही बरीच वादावादी करून मग सामान त्यांना स्वीकारायला लावले नाहीतर ते घेऊन फिरायला लागत होते नंतर आणखी वाद घालून चहा मग जेवण वगैरेंची सोय करून घ्यावी लागली तेथील नियमाप्रमाणे पैसे बाहेर नेता येत नाहीत व त्याचे डॉलरही

करता येत नाहीत. तेव्हा जे काही थोडे केनियन शिलिंग कोणा-जवळ होते, त्याच्या विमानतळावरच्या दुकानातून ते खर्च करून टाकण्यासाठी फेऱ्या चालू होत्या मधूनच येऊन सागत आता अमूक घेतले, (कॉफी, खेळणी, स्मरणवस्तू, पुस्तके वगैरे) आता इतके राहिले, बर का ! ते ऐकण्यात व पाहाण्यात आणि गप्पात आमचा वेळ बरा जात होता रात्री २॥ पर्यंत असे तगवले गेले होते अनिश्चिततेने ! बसायला धड आरामशीर खुर्च्याही नव्हत्या. एवढेच की प्रचंड विमानतळावर फिरायला खूप जिने, कॉरिडॉर्स व हॉल्स होते.

अखेर एकदाचे, दुसरीकडून कुठून तरी आलेले केनिया एअर-वेजचे एक विमान, मुबईसाठी म्हणून ३ वाजता सोडण्याचे ठरले व सारे उपचार (तपासणी वगैरे) करून आम्हाला आत बसवण्यात आले झोपेचा विचकाच झाला होता पण गप्पातही मन नव्हते गप्पा भरपूर झाल्या होत्या व उद्या २ महिन्यानंतर मायदेशात परतणार ही जाणिव एक अस्वस्थ उत्सुकता निर्माण करीत होती शिवाय बदललेली वेळ मुबईत मडळींना माहीत झालेली असेल की नाही, हीही एक चिंता वाटत होती

सकाळी ९॥ वाजता मुबई जवळ आली. पण सोसाटयाचा वारा व पाऊस याच्यामुळे विमानाने दोन वेळा उतरायचा प्रयत्न करून परत उड्डाण केले व पेट्रोल सपेल म्हणून सरळ कराचीला नेले तेथे गरम हवा होती व आफ्रिकेतून आलेले म्हणून साऱ्या-वर जतुनाशक फवारा मारला गेला खायला-प्यायला मात्र काहीच मिळाले नाही कसेतरी पेट्रोल विमानाने मिळवले व पुन्हा मुबईकडे झेप घेतली. बारा तास झाले तर त्याना असेल तेथे सोडावे लागते म्हणे तेव्हा त्यापूर्वी मुबईला उतरायचा प्रयत्न करण्याचा त्यानी निर्णय घेतला तीन वेळा प्रयत्न केल्यावर चौथ्यादा एकदाचे उतरले. सातात्रूझ, वसई खाडी-डोंबिवली पार-सिक टेकड्या-ठाणे खाडी-घाटकोपर सातात्रूझ या प्रदेशावरून

जाणारी ही तीन उड्डाणे अगदी जीव मुठीत धरून आम्ही आपले पाहात होतो व एकदाचे जमिनीला लागलो ही दैवाची खैरच ! पण एव्हाना नीट माहिती न मिळाल्याने घ्यायला आलेली मडळी परत गेली होती व ३ वाजता विमान प्रत्यक्ष उतरले तरी ७ च्या बातम्यात विमान कराचीला गेल्याचे सागितल्याने घरीच थाबून होती त्या पावसात व गोंधळात सामान कसे बाहेर काढले व ते बाद्रचाला नेऊन ठेऊन पैसे उसने घेऊन घरी रात्री आठ वाजता कसा पोचलो त्याची एक सुरस कथाच झाली त्याहून दुसरी सुरस चमत्कारिक कथा झाली अनअकपनीड बॅगेज सोड-वून घेण्यात तिथे कोणी फिकीर करीत नाही व कसे वागवले जाते ते आणि इतर गोष्टी पाहिल्यावर निष्कर्ष हाच की शहाण्याने अनक्षकपनीड बॅगेज पाठवू नये पाठवल्यास त्यात महत्त्वाचे काही ठेऊ नये, ठेवल्यास आणलेल्या सामानाच्याबद्दलचे व किमतीचे प्रमाणपत्र बरोबर, विमानतळावरून बाहेर पडताना घ्यायला चुकू नये, चुकल्यास अनअकपनीड बॅगेजपायी होईल तो त्रास सहन करावा हे करावे अन् हे करू नये इतकी सगळी बधने, मग पर-देशी जावेच कशाला आणि यावेच कशाला (निदान पुन्हा सधी येईपर्यंत) न जाण्याचा माझा निश्चय पक्का आहे.

REFBK-0024004

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३७
भू-प्रवास २४००४
१३।१०८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)